





# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १८ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या तहसीलदार लोखंडेंसाठी मंत्रालयातून फिरतेय 'जादुची कांडी'

## अकोल्यातील एसीबी खटल्याला मंत्रालयाकडून 'रेड सिग्नल'

## अमरावतीची विभागीय चौकशी २ वर्षांपासून थंडबस्त्यात ? चौकशी अहवाल गुलदस्त्यात

**ॲड.समीर ठाकूर**

**अमरावती-अकोला :** 'जनमाध्यम'ने अमरावती येथील २०० कोटी रुपयांचा भूखंड घोटाळा आणि तहसीलदार विजय लोखंडे यांच्या कारभारावर प्रकाश टाकल्यानंतर संपूर्ण महसूल वर्तुळ हादरले आहे. परंतु, या प्रकरणाच्या मुळाशी जाताना जे धक्कादायक वास्तव समोर आले आहे, ते महाराष्ट्राच्या प्रशासकीय पारदर्शकतेच्या आणि 'झिरो टॉलरन्स'च्या चिंधड्या उडविणारे आहे. मंत्रालयातील शक्तिशाली महाभागाने या दागी अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी चक्क 'सुरक्षा कवच' पुरवल्याचे उघड दिसते आहे. अकोला येथे सन २०२१ मध्ये लाच प्रकरणात अडकलेल्या तहसीलदार विजय लोखंडे याचे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यासाठी मागण्यात आलेली परवानगी महसूल विभाग मंत्रालयाने नाकारल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे अमरावती येथील लेआऊट ला



नियम धाब्यावर बसवून नाहरकत प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी २२ मे रोजी तहसीलदार विजय लोखंडे यांच्यावर थेट मंत्रालयातून तीन वर्षांच्या कालावधीत दुसऱ्यांदा निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. मात्र 'स्पेशल व्हिटो' वापरत तहसीलदार लोखंडे यांनी त्या आदेशावर सुद्धा मंत्रालयातून काही तासांतच स्थगिती प्राप्त केली. सदर प्रकरणी विभागीय चौकशी त्याच वेळी सुरू करण्यात आली. मात्र दोन वर्ष उलटूनही त्या विभागीय चौकशीचे नेमके काय झाले हे अद्याप कळू शकले नाही. या चौकशीवरही मंत्रालयातून दबाव आला की काय ? असा प्रश्न त्यामुळे उपस्थित होतो.

### अमरावतीची विभागीय चौकशी २ वर्षांपासून 'थंडबस्त्यात'!

मे २०२४ मध्ये अमरावतीला रुजू होताच मौजे वडद येथील अवैध लेआउट प्रकरणात मंत्रालयाने लोखंडे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती. मात्र, प्रशासकीय इतिहासातील सर्वात मोठा चमत्कार घडवत त्यांनी अवघ्या २४ ते ४८ तासांत त्या निलंबनाला मंत्रालयातूनच 'स्थगिती' मिळवली आणि ते पुन्हा दिमाखात अमरावतीच्या तहसीलदार खुर्चीवर कायम राहिले. त्यावेळी या घोटाळ्याची 'विभागीय चौकशी' सुरू करण्यात आली होती. शासकीय नियमांनुसार ही चौकशी ६ महिन्यांत पूर्ण होणे बंधनकारक असताना, आज तब्बल दोन वर्षे उलटून गेली (२०२४ ते २०२६) तरीही ही चौकशी अनिर्णित आहे! ही चौकशी आटोपली का? तिचा अंतिम अहवाल मंत्रालयाकडे पाठवला का? यावर संपूर्ण जिल्हा प्रशासन आणि महसूल विभागाने अद्यापही गुळमुळीत मौन बाळगले आहे. दोन वर्षांपासून फाईल दाबून ठेवण्यामागे नेमके कोणाचे आर्थिक हितसंबंध गुंतले आहेत, हा खरा प्रश्न आहे.

### एसीबी खटल्याला मंत्रालयाची 'ना-परवानगी'!

*विजय सुखदेव लोखंडे यांना २०२१ मध्ये अकोला येथे असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. एसीबीने तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी नियमानुसार महसूल विभाग (मंत्रालय, मुंबई) यांच्याकडे अधिकृत 'अभियोग मंजुरी' मागितली होती. परंतु, अत्यंत विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंत्रालयातील 'त्या' अदृश्य शक्तीने आपली जादूची कांडी फिरवत तहसीलदार लोखंडे यांच्यावर न्यायालयात खटला चालवण्याची परवानगीच नाकारली आहे! लाचखोरीत अटक व तुरुंगवारी झालेल्या अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी मंत्रालयाने कायद्याचा गळा घोटण्याचा हा प्रकार संशयास्पद आणि गंभीर आहे.*

### ३ दिवसांत २०० कोटींचा खेळ; तरीही 'तो मी नव्हेच' !

याच पार्श्वभूमीवर, नुकताच चव्हाट्यावर आलेल्या २०० कोटींच्या नव्या भूखंड घोटाळ्यात त्यांच्या अधीनस्थ कनिष्ठ नायब तहसीलदार टीना चव्हाण यांच्यावर तडकाफडकी निलंबनाची गाज पडली. मात्र, मुख्य नियंत्रण अधिकारी असलेल्या तहसीलदार लोखंडे यांनी चक्क 'आश्चर्य' व्यक्त करत 'तो मी नव्हेच'ची भूमिका घेतली आहे. परंतु, या घोटाळ्याची तारीखवार क्रिमिनल टाईमलाईन पाहिली तर सामान्य नागरिकांची कशी थट्टा केली जाते, हे स्पष्ट होते. अवघ्या ७२ तासांत २०० कोटींच्या फाईलला पंख फुटतात, खरेदी-विक्रीसाठी निबंधकांना शासकीय पत्रे पाठवली जातात आणि संपूर्ण तालुक्याचा महसूल प्रमुख असलेले तहसीलदार लोखंडे म्हणतात, 'मला काही माहीतच नाही!' कनिष्ठ अधिकाऱ्याला बळीचा बकरा बनवून पडद्यामागून या संपूर्ण खेळात अनेक महाभागांचा हस्तक्षेप असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अकोल्यातील एसीबी कारवाईनंतर अमरावतीत मोक्याची पोस्टिंग मिळणे, निलंबनावर २४ तासांत 'स्टे' येणे, एसीबी खटल्याची परवानगी नाकारणे आणि विभागीय चौकशी २ वर्षे रेंगाळत ठेवणे; या सर्व अति-सुपरफास्ट घडामोडी बघता विजय लोखंडे यांच्या सेवेसाठी मंत्रालयातील कोणत्या महाभागाने जादूची कांडी फिरविली आहे, याचा शोध घेणे मुख्यमंत्र्यांसाठी आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांसाठी मोठे आव्हान आहे.

## ऊज्जैनच्या महाकाल मंदिर परिसरात तुफान गर्दी







**ऊज्जैन//वृत्तसंस्था :** श्रावणातील तिस-या सोमवारी आणि वर्षातून एकदा उघडणा-या नागचंद्रेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी ऊज्जैनमध्ये प्रचंड गर्दी उसळली. याच दरम्यान हरसिद्धी मंदिरासमोर बॅरिकेडिंग केलेल्या परिसरात गर्दीचा दाब वाढल्याने अनेक भाविकांची तब्येत बिघडली. यानंतर सुमारे १३ जणांना त्यांचे कुटुंबीय आणि सुरक्षा कर्मचारी रुग्णालयात घेउन गेले. सध्या सर्वांवर ऊज्जैन जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रुग्णालयात दाखल असलेल्या भाविकांच्या प्रकृतीवर डाक्टरांची नजर आहे.श्रावणातील तिस-या सोमवारी भगवान महाकाल आणि नागचंद्रेश्वर मंदिराच्या विशेष दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक ऊज्जैनमध्ये पोहोचले. यामुळे मंदिर परिसर आणि आसपासच्या मार्गांवर प्रचंड गर्दी झाली. मंदिरात दुपारपर्यंत सुमारे ५.५० लाख भाविकांनी दर्शन घेतले.

**13 जणांची तब्येत बिघडली; 40 हजार लोक रांगेत**

प्रशासनाकडून मदत मिळण्यास विलंब-चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या सागरने सांगितले की, घटनेपूर्वी तो महाकाल मंदिरात दर्शनासाठी रांगेत उभा होता. हरसिद्धी चौकापर्यंत पोहोचायलाच त्याला ७-८ तास लागले. तिथे त्यांना दोन तास उभे राहावे ➪(पान २ वर)

## श्रावणी सोमवारी अशोकधाम मंदिरात मोठी दुर्घटना

# चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू

**पाटणा/वृत्तसंस्था :**बिहारमधील लखीसराय येथील अशोक धाम मंदिरामध्ये श्रावणी सोमवारी झालेल्या चेंगराचेंगरीत सात भाविकांचा मृत्यू झाला असून डझनभर भाविक जखमी झाले आहेत. श्रावण महिन्यातील तिस-या सोमवारनिमित्त भगवान शिवाचे दर्शन घेण्यासाठी आणि जलाभिषेक करण्यासाठी सोमवारी सकाळी मंदिरात मोठ्या संख्येने भाविक जमले असताना ही घटना घडली. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. प्राथमिक माहितीनुसार, प्रचंड गर्दीच्या वेळी मंदिरात सुमारे ५० हजार भाविक उपस्थित होते. स्थानिक प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, अशोक धाम रेल्वे स्टेशनला मंदिराशी जोडणा-या रस्त्यावर ही घटना घडली. रात्रीच्या वेळी या मार्गावर विजेचा खांब पडल्याने भाविकांमध्ये घबराट पसरली होती. या पडलेल्या खांबात विद्युत प्रवाह असल्याची अफवा पसरल्यामुळे सोमवारी सकाळी भाविकांमध्ये गोंधळ उडाला.



भाविक वेगवेगळ्या दिशेने धावू लागल्याने चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली.या गोंधळात अनेक जण एकमेकांवर पडले आणि स्थानिक रहिवासी तसेच इतर भाविकांनी गर्दीत अडकलेल्या लोकांना मदत करण्यास सुरुवात केली. जखमी झालेल्या सर्व भाविक महिला असून, त्यापैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे. सर्व जखमींना उपचारासाठी लखीसराय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेनंतर प्रशासकीय अधिकारी आणि आरोग्य विभागाची पथके घटनास्थळी पोहोचली असून त्यांनी मदत व वैद्यकीय सेवा सुरू केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय अधिका-यांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोग्य आणि बचाव पथकेही परिस्थितीवर लक्ष ठेवून असून जखमींना मदत करत आहेत. ➪(पान २ वर)

# भाजपची 'नवीन' टीम जाहीर

## तावडे, पवारांवर मोठी जबाबदारी, 2 दिग्गज महिला नेत्याही संघटनेत




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष नितीन नवीन यांची नवी टीम जाहीर झाली आहे. नितीन नवीन यांच्या नव्या टीममध्ये राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे सिंधिया यांना स्थान देण्यात आलं आहे. प्रदिर्घ कालावधीनंतर त्यांना संघटनेत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांना राष्ट्रीय उपाध्यक्षपद देण्यात आलं आहे. याशिवाय राम माधवदेखील भाजपमध्येही परतले आहेत. त्यांनाही उपाध्यक्षपद देण्यात आलेलं आहे. माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनाही संघटनेत स्थान देण्यात आलं आहे. त्यांच्याकडे राष्ट्रीय महामंत्री पदाची धुरा देण्यात आलेली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून स्मृती इराणी आणि वसुंधरा राजे ➪(पान २ वर)

### *नितीन नबीन यांच्या टीममधून अमित मालवीय यांना डच्चू*

**भाजपाच्या IT सेलची दीपक म्हस्केंना जबाबदारी**



नवी दिल्ली - भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या नव्या टीमची घोषणा करण्यात आली आहे. ज्यात अनेक बड्या चेह-यांचा समावेश आहे. वसुंधरा राजे, राम माधव यांच्यासह १३ जणांना राष्ट्रीय उपाध्यक्ष बनवले आहे. तर आयटी सेल प्रमुखपदावरून अमित मालवीय यांना डच्चू देण्यात आला आहे. मालवीय यांच्या जागी छत्तीसगड भाजपाचे दीपक म्हस्के यांना नवीन आयटी सेल प्रमुखपदी नियुक्त केले आहे. पक्षाने डिजिटल नेटवर्क मजबूत करण्यासाठी ४ राज्यांमधून नवीन सोशल मिडिया समन्वयक नेमले आहेत. महाराष्ट्रातून प्रिती गांधी, दिल्लीतून शिवानंद द्विवेदी, उत्तराखंडहून आलोक भट्ट आणि हरियाणातून अरूण यादव यांची सोशल मिडिया समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अनिल बलूनी हे पक्षाच्या माध्यम समन्वयक आणि मिडिया इन चार्जपदावर कायम ➪(पान २ वर)

### श्रावण सोमवारी तारापीठ मंदिरात पोहोचले होते भाविक

# हॉटेलला आग, 7 ठार

**बीरभूम-**पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यात एका हॉटेलला आग लागली. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. आग लागण्याचे कारण एसीमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रावण सोमवारच्या निमित्ताने मोठ्या संख्येने भाविक तारापीठ मंदिरात पोहोचले होते. ते येथील एका हॉटेलमध्ये थांबले होते. सकाळी ते झोपले असतानाच पहाटे ४.३० च्या सुमारास हॉटेलला आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकाने आगीवर नियंत्रण मिळवले आहे. हॉटेलमध्ये अडकलेल्या भाविकांना बाहेर काढण्यात येत आहे. जखमींना रामपुरहाट सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात नेण्यात आले. या दुर्घटनेतून वाचलेल्या कोलकाता येथील एका महिलेने सांगितले की, अचानक संपूर्ण हाटेलमध्ये धूर भरला. आम्हाला श्वास घेणे कठीण झाले होते आणि बाहेर पडण्याचा मार्ग शोधणे अवघड होते.



# सरकारचे सल्लागार म्हणाले- E20 इंधनामुळे गाड्यांचे नुकसान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांचे म्हणणे आहे की, E२० पेट्रोलमुळे गाड्यांचे नुकसान होत आहे. जुन्या दुचाकींसाठी ई१० पेट्रोलची विक्री पुन्हा सुरू केली पाहिजे. नागेश्वरन यांनी 'द इंडियन एक्सप्रेस'मध्ये लिहिलेल्या त्यांच्या लेखात म्हटले आहे की, भारताने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे उद्दिष्ट वेळेपूर्वीच साध्य करून कच्च्या तेलाच्या आयातीवरील अब्जावधी रुपये वाचवले, पण आता एक नवीन संकट उभे राहिले आहे. इथेनॉलची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उस, मका आणि तांदूळ यांसारख्या अन्नधान्य पिकांना मोठ्या प्रमाणावर इथेनॉल कारखान्यांमध्ये पाठवले जात आहे.मक्याचा मुख्य वापर पोल्ट्री आणि पशुधनाच्या चा-यासाठी होतो. जर इथेनॉल बनवणा-या कंपन्या जास्त किंमत देउन मका खरेदी करू लागल्या, तर ➪(पान २ वर)



**E10 पेट्रोल पुन्हा सुरू करा; इंधनात 30% इथेनॉल मिसळल्यास अन्नसंकट शक्य**

# 14 राज्यांमधून 253 जण ताब्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्वातंर्त्यदिनाच्या आधी सुरक्षा यंत्रणांनी पाकिस्तानच्या आयएसआय समर्थित शहजाद भट्टी नेटवर्कविरोधात मोठी कारवाई केली. या कारवाईत १४ राज्यांमधून २५३ जणांना ताब्यात घेण्यात आले. या नेटवर्कविरोधात आतापर्यंत ८० हून अधिक एफआयआर दाखल करण्यात आले असून २०० हून अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, मोदी सरकारने स्वातंर्त्यदिनाच्या आसपास देशात दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया करण्याचा कट उधळून लावला.मोदी सरकारने आयएसआय-समर्थित दहशतवादी गट शहजाद भट्टी नेटवर्क स्वातंर्त्यदिनाच्या आधी उद्ध्वस्त केला आणि २०० हून अधिक दहशतवाद्यांना अटक करून त्यांचे घातपात व हल्ल्यांचे मनसुबे उधळून लावले. भारतीय सुरक्षा दलांनी १४ राज्यांमधील विविध ठिकाणी समन्वय साधून कारवाया केल्या आणि हे नेटवर्क उद्ध्वस्त केले. दहशतवादाप्रती भारताच्या शून्य-सहिष्णुतेचे हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे. या गटाकडून आयएसआयच्या फंडमधून घेतलेले आयईडी स्फोटके, पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीची खूण असलेले ग्रेनेड, पिस्तूल, ➪(पान २ वर)



# झारखंड सरकारने JSSC-CGL परीक्षा रद्द केली

## ■ मुख्यमंत्री सोरेन म्हणाले- 2014 पासून आतापर्यंत सर्व परीक्षांची सीआयडी चौकशी होईल ■

**रांची/नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :JPSC नंतर आता JSSC-CGL ची परीक्षा देखील रद्द करण्यात आली आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सोमवारी रात्री माध्यमांना ही माहिती दिली. मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांसोबत ४ तास चाललेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री सोरेन म्हणाले-SIT आणि CID या दोन्हीच्या चौकशीत अनेक धक्कादायक तथ्ये समोर आली आहेत. चौकशी सुरू असल्याने, प्रत्येक गोष्ट उघडपणे सांगणे शक्य नाही. यात अनेक कंपन्यांचे एक जटिल आणि एकमेकांशी जोडलेले नेटवर्क समाविष्ट आहे, ज्यांनी वेगवेगळ्या वेळी येथे काम केले आहे. २०१४ पासून आतापर्यंत आयोजित सर्व परीक्षांची चौकशी CID मार्फत केली जाईल.मुख्यमंत्री म्हणाले- तरुणांची सर्वात मोठी आणि



महत्त्वाची मागणी JPSC नागरी सेवा परीक्षेसंबंधी आहे. आम्ही एका निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली याची पूर्ण चौकशी करू. **२४ दिवसांपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू** - झारखंडमध्ये विद्यार्थी JPSC-JSSC परीक्षा रद्द करण्याच्या आणि दक्ष चौकशीच्या मागणीसाठी २४ दिवसांपासून उपोषण करत आहेत. आज विद्यार्थ्यांसोबत सरकारची चर्चा होणार होती. परंतु मंत्रिमंडळातील मंत्र्यांसोबत बैठक असल्यामुळे विद्यार्थ्यांशी चर्चा अजूनपर्यंत होउ शकलेली नाही.

**काल NTA ने UGC-NET च्या ३ परीक्षा रद्द केल्या होत्या-** काल UGC-NET च्या इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ने रविवारी मान्य केले की, या विषयांच्या प्रश्नपत्रिकेत स्पेलिंग आणि प्रिंटिंगच्या चुका होत्या.NTA ने सांगितले - प्रश्नपत्रिकांमध्ये यापूर्वी विचारले गेलेले प्रश्न पुन्हा आले होते. उत्तरतालिका (आन्सर-की) जारी केल्यानंतर विद्यार्थ्यांनी चुकांचा उल्लेख केला होता. केवळ प्रश्न काढून टाकून त्या दुरुस्त करता आल्या नसत्या.NTA ने तिन्ही विषयांच्या ➪(पान २ वर)



जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती शहरात हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी

## पोलीस प्रशासनाची अंतिम अधिसूचना जारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात वाढती लोकसंख्या, वाहनांची मोठी वर्दळ आणि त्यामुळे होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने शहरातील प्रमुख मार्गावर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदीची अंतिम अधिसूचना जारी केली आहे.

पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांनी हे आदेश पारित केले आहेत, शहरात सन २०२४ ते जुलै २०२६ या काळात एकूण १,१०८ अपघात झाले आहेत, यातील २१२ प्राणघातक अपघातांमध्ये २४६ निष्पाप नागरिकांचा बाळी गेला असून ९१३ व्यक्ती गंभीर व किरकोळ जखमी झाल्या आहेत. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आले आहे.

दररोज सकाळी ६.३० ते रात्री ९.३० वाजेपर्यंत वाहनांना शहरात प्रतिबंध असणार असून या वाहनांमध्ये मालविरहित (खाली गाडी) बजन २,०००) किग्रॅ (२ टन) पेक्षा जास्त असणारी सर्व हलकी व जड व्यावसायिक वाहने, ज्या वाहनांची भारसहित वहन क्षमता २ टनांपेक्षा जास्त आहे अशी सर्व वाहने, सर्व प्रकारच्या अति अवजड (मल्टी-ॲक्सल) वाहनांचा समावेश आहे.

यावेळेत शहरातील जे मार्ग बंद राहतील यामध्ये मुख्य चौक व बायपास मार्ग गोरी इन बा पॉइंट, वेलकम टी पॉइंट, पंचवटी, इविन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गद्रे चोक, नवाथे चोक, बेनाम चोक, अलमास गेट, बडनेरा ते



यवतमाळ वाथ पॉइंट यांचा समावेश असेल. तसेच नाका व अंतर्गत मार्गामध्ये राजुरा नाका, विद्यापीठ चौक, बियागी चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, इविन चौक, दीपक चौक, चित्रा चौक, टांगा पढ़ाव, नागपुरी गेट चौक ते ट्रान्सपोर्ट नगर व भातकुली जकात नाक्यापर्यंत या मार्गाचा समावेश आहे. इतर महत्त्वाच्या मार्गामध्ये आर.टी.ओ. कार्यालय, शेगाव नाका, कठोरा नाका, पोटे पाटील चोक, रहाटगाव बस स्टॉप, विभागीय आयुक्त कार्यालय मार्ग तसेच एम. आय. डी. सी. परिसराचा समावेश आहे. कायमस्वरूपी बंद राहणाऱ्या मार्गांमध्ये गांधी चौक ते रविनगर, गांधी चौक ते राजापेठ आणि गांधी चौक ते अंबापेठ मार्ग, तसेच बजरंग टेकडो ते विलासनगर, पटवा घोक, मोरबाग, मसानगंज, गर्ल्स हायस्कूल चौक ते इर्विन चौक, शहरातील परकोटाच्या आतील दाट लोकवस्तीतील सर्व अंतर्गत मार्गाचा समावेश आहे.

अत्यावश्यक सेवांना प्रवेशबंदीतून सूट देण्यात आली आहे. यात पेट्रोल, डिझेल, गॅस, शासकीय धान्य वितरण वाहने, महापालिका कचरा संकलन, अतिक्रमण विभाग, पोलीस, रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांना प्रवेशबंदीतून पूर्ण सूट असेल. तसेच या वाहनांना ताशी २० किमीची वेग मर्यादा पाळण्याचे बंधन घालण्यात आले आहे. अन्नधान्य व कृषी माल वाहतूकीला सूट देण्यात आली असून याअंतर्गत दररोज दुपारी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेदरम्यान ठरवून दिलेल्या मार्गावरून वाहतुकीस परवानगी राहील.

गौण खनिज वाहतूकीसंदभांत काही सूचना देण्यात आल्या असून यानुसार दररोज सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत तसेच सर्व रविवारी सकाळी ६.०० ते ११.०० आणि दुपारी २.०० ते ४.०० या कालावधित विशिष्ट निर्धारित मार्गावरून वाहतुकीस सूट देण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाच्या वाहनांवर मोटर वाहन कायदा १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ नुसार कठोर कारवाई केली जाईल असेही सांगण्यात आले आहे. यापूर्वी १० ऑगस्ट २०२६ रोजी अधिसूचना काढून नागरिकांकडून आक्षेप व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

## ऊच्च न्यायालयाच्या सुनावणीला सर्वोच्च स्थगिती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने बेहिशोबी मालमत्तेच्या प्रकरणात राहुल गांधींना दिलासा दिला आहे. न्यायालयाने सोमवारी या प्रकरणाबाबत अलाहाबाद ऊच्च न्यायालयात सुरू असलेल्या कार्यवाहीला स्थगिती दिली. तसेच, सीबीआय आणि ईडी यांना ऊच्च न्यायालयात कोणताही अहवाल सादर न करण्याचे निर्देशही दिले.

सुनावणीत अतिरिक्त सालिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी सांगितले की, हे आरोप गंभीर आहेत. सीबीआय सध्या केवळ एकाच तक्रारीची चौकशी करत आहे. हे प्रकरण खरोखरच इतके गंभीर होते, तर चौकशी करण्यासाठी सीबीआय आणि ईडीला न्यायालयाच्या आदेशाची वाट का पाहावी लागली, असा प्रश्न खंडपीठाने ऊपस्थित केला. ऊच्च न्यायालयाने सीबीआय आणि ईडीला आरोपांची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशाला राहुल गांधींनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तसेच, त्यांनी या प्रकरणाची कारवाई दुस-या ऊच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात वर्ग करण्याची मागणीही केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० ऑगस्ट रोजी होणार आहे. अलाहाबाद ऊच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २० जुलै रोजी सीबीआयच्या ऊत्तरावर नाराजी व्यक्त केली होती.न्यायालयाने एजन्सीच्या वरिष्ठ अधिका-याला आतापर्यंतच्या तपासाची स्थिती स्पष्ट करणारे नवीन प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले होते. ऊच्च न्यायालयाने म्हटले होते की, सीबीआयने यापूर्वी सादर केलेले प्रतिज्ञापत्र त्याच्या जुन्या आदेशानुसार नव्हते. न्यायालयाने पुढील सुनावणीपूर्वी सीबीआयच्या नवी दिल्ली येथील भ्रष्टाचारविरोधी मुख्यालयाच्या संबंधित विभागाच्या सहसंचालकांनावैयक्तिकरित्या नवीन प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते.

**भाजप कार्यकर्ते विग्नेश शिशिर- यांनी दाखल केली याचिका**

कर्नाटकचे भाजप कार्यकर्ते विग्नेश शिशिर यांनी ऊच्च न्यायालयात याचिका दाखल करून राहुल गांधींवर ऊत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता असल्याचा आरोप केला होता. त्यांनी सीबीआय आणि ईडी कडून याची चौकशी करण्याची मागणी केली होती.

पान १ व १० वरून

## ऊज्जैनच्या महाकाल मंदिर

लागले. गर्दी वाढत होती आणि 'आरती'ची वेळ झाल्यामुळे त्यांना तिथेच थांबवून ठेवण्यात आले होते.सागरच्या म्हणण्यानुसार, अचानक बॅरिकेड्स ऊघडण्यात आले आणि त्यामुळे चेंगराचेंगरी झाली. एक तंबू कोसळला आणि बॅरिकेड्सही खाली पडले. त्याचे दोन्ही पाय बॅरिकेड्सखाली अडकले; एका पायाचे हाड मोडले. मंदिरातील व्यवस्था अत्यंत खराब होती. त्याला कोणीही मदत केली नाही; केवळ एका व्यक्तीने पुढाकार घेउन त्याला वैद्यकीय शिबिरात दाखल केले.

**पैसे भरून व्हीआयपी दर्शनाची सोय केली जात होती-**सागरने सांगितले की, या काळात व्हीआयपी दर्शन सुरूच होते; ३०० रुपये शुल्क भरल्यावर व्हीआयपी प्रवेश दिला जात होता. सागर पुढे म्हणाला, 'मी कालही महाकाल मंदिरात गेलो होतो. तेव्हाही प्रचंड गर्दी असताना व्हीआयपींना प्रवेश दिला जात होता, तर सामान्य लोक मानसरोवर गेटवर चार तासांपासून वाट पाहत होते.' ऊज्जैनचे रहिवासी मनोहर भावसार, जे सागरच्या जखमी मुलाला पाहण्यासाठी रुग्णालयात आले होते, त्यांनी रुग्ण दाखल झाले नसल्याच्या दाव्यांवर प्रश्न ऊपस्थित केले. ते म्हणाले, 'मी ऊज्जैनचा रहिवासी आहे. माझ्या मित्राचे मूल आज सकाळी महाकाल मंदिरात दर्शनासाठी गेले होते.'

'माध्यमांमधील बातम्यांनुसार रुग्णालयात कोणतेही रुग्ण दाखल झालेले नाहीत, पण माझ्या मित्राचे मूल महाकालच्या रुग्णवाहिकेतून (अम्ब्युलन्स) इथे आल्याचे मी स्वत? पाहिले आहे. त्याच्या पायाचे हाड मोडले आहे आणि तो सध्या रुग्णालयात दाखल आहे.'

भावसार यांनी असाही आरोप केला की, मंदिरात कोणतीही घटना घडली नसल्याचे प्रशासन नाकारत आहे. 'अहवालांमध्ये म्हटले आहे की महाकालमध्ये काहीही घडले नाही, पण आमच्याकडे पैसे असते तर आम्ही त्याला खाजगी रुग्णालयात नेले असते. डॉक्टरांनी सांगितले आहे की शस्त्रक्रियेसाठी दोन-तीन दिवस लागतील.' महिला म्हणतेः मुलगी बोलू शकत नाही, दात तुटले आहेत

ग्वाल्हेरहून दर्शनासाठी आलेल्या आरती या आणखी एका भाविकाने सांगितले की, या घटनेत तिची मुलगीही जखमी झाली आहे. त्या म्हणाल्या, 'आम्ही ग्वाल्हेरहून दर्शनासाठी आलो होतो आणि आता आम्ही संकटात सापडलो आहोत.' 'तिने पाणीही प्यायलेले नाही. ती बोलू शकत नाही. तिचे दात तुटले आहेत. तिथे चेंगराचेंगरी झाली; तिला चक्कर आली आणि ती रेलिंगवर जाउन आदळली. ती बेशुद्ध पडल्यानंतर आम्हाला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले.'

**नागपंचमीलाच ऊघडतात नागचंद्रेश्वर मंदिराचे दरवाजे-** आज नागपंचमी आणि श्रावण महिन्यातील सोमवार यांचा दुर्मिळ योग जुळून आला आहे. यानिमित्ताने महाकालेश्वर मंदिर परिसराच्या अगदी वरच्या भागात असलेल्या नागचंद्रेश्वर मंदिराचे दरवाजे ऊघडण्यात आले आहेत. हे मंदिर वर्षातून केवळ एकदा, म्हणजेच नागपंचमीच्या दिवशी २४ तासांसाठी ऊघडले जाते. भगवान नागचंद्रेश्वरांचे दर्शन घेण्यासाठी आणि त्यांचा आशीर्वाद मिळवण्यासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली आहे.

## चेंगराचेंगरीत 7 भाविकांचा

बिहारमध्ये चेंगराचेंगरी कशी झाली?

लखीसराईचे एसडीपीओ शिवम कुमार यांनी सांगितलं, आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे, तर सुमारे १० जण जखमी झाले आहेत. जखमींची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं सांगण्यात येत आहे. एका व्यक्तीला पुढील ऊपचारासाठी मोठ्या रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे. प्राथमिक तपासात असं समोर आले आहे की, एका शेतात विजेचा खांब पडला होता. मागून येणा-या लोकांनी ओरडण्यास सुरुवात केली की विजेचा खांब पडला आहे. तिथून सुमारे १०० मीटर पुढे महिला रांगेत ऊभ्या होत्या. या घोषणेमुळे एकच घबराट पसरली आणि काही लोकांनी स्वत?चा बचाव करण्यासाठी शेताकडे जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते खाली पडले. मागून येणारे इतर लोक त्यांच्या अंगावरून पुढे निघून गेले, ज्यामुळे हा अपघात झाला. पुढील तपासानंतरच घटनेचा नेमका क्रम आणि इतर तपशील स्पष्ट होतील.

एका भाविकाने पीटीआयला सांगितलं, महिला रांगेत ऊभ्या होत्या. सुमारे १०-१२ महिलांनी गर्दीत घुसून आम्हाला ढकलण्यास सुरुवात केली. आम्ही खाली पडलो आणि सुमारे २०-२५ महिला एकावर एक पडल्या. गर्दीत अडकल्यामुळे अनेक महिला बेशुद्ध झाल्या. प्रचंड गर्दी असल्यामुळे हे घडले. बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी सोमवारी लखीसराई येथील अशोक धाम मंदिरात घडलेल्या चेंगराचेंगरीसारख्या घटनेत सात भाविकांच्या मृत्यू बद्दल शोक व्यक्त केला. ही शोकांतिका अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एक्सवरील एका पोस्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबियांबद्दल संवेदना व्यक्त केल्या आणि घटनेतील जखमींवर योग्य आणि तातडीने ऊपचार सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचं सांगितलं.सम्राट चौधरी म्हणाले, लखीसराईच्या अशोक धाममधील घटना अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. या अपघातात भाविकांच्या मृत्यूच्या बातमीने माझं मन अत्यंत व्यथित झालं आहे. शोकाकुल परिवाराप्रति माझ्या तीव्र संवेदना आहेत.जखमींवर योग्य आणि जलद वैद्यकीय ऊपचार करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आल्याचं त्यांनी पुढे सांगितले. ते म्हणाले, जखमींवर योग्य आणि तात्काळ ऊपचार करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांती देवो आणि जखमींना लवकर बरे करो.

## भाजपची 'नवीन' टीम

पक्षात साईडलाईन झाल्या होत्या. पण आता त्यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भाजपनं एकूण ११ जणांना राष्ट्रीय ऊपाध्यक्षपद दिलं आहे. यात वसुंधरा राजे सिंधिया (राजस्थान), तीरथ सिंह रावत (ऊत्तराखंड), राम माधव (दिल्ली), डॉ. भारती पवार (महाराष्ट्र), बैजयंत पांडा (ओडिशा), डी. पुरंदरेश्वरी (आंध्र प्रदेश), रेखा वर्मा (ऊत्तराखंड), वर्षाबेन दोशी (गुजरात), सरदार मनप्रीत सिंह बादल (पंजाब), लाल सिंह आर्य (मध्य प्रदेश), प्रो. एम. नागराज (कर्नाटक) यांचा समावेश आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी एक्सवर एक पोस्ट करत भाजपच्या नव्या राष्ट्रीय टीममधील सगळ्या नवनियुक्तपदाधिका?यांचं अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. अनुभव आणि उर्जेनं समृद्ध असलेली ही टीम आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या मार्गदर्शनात संघटनेला नवी गती प्रदान करेल, असा विश्वास नवीन यांनी पोस्टमधून व्यक्त केला आहे. भाजपच्या राष्ट्रीय महामंत्री (संघटन) पदावर बी. एल. संतोष यांची नियुक्ती झाली आहे. तर राष्ट्रीय सह महामंत्री (संघटन) पदी शिवप्रकाश आणि सौदान सिंह यांची वर्णी लागलेली आहे. भाजपनं ८ जणांकडे राष्ट्रीय महामंत्रिपदाची जबाबदारी दिली आहे. विनोद तावडे (महाराष्ट्र), सुनील बन्सल (दिल्ली), बिप्लब कुमार देब (त्रिपुरा), स्मृती इराणी (ऊत्तर प्रदेश), सतीश पुनीया (राजस्थान), गजेंद्र पटेल (मध्य प्रदेश), हरिश द्विवेदी (ऊत्तर प्रदेश), संजय भाटिया (हरियाणा) यांच्याकडे राष्ट्रीय महामंत्रिपदाची धुरा सोपवण्यात आलेली आहे.

## नितीन नबीन यांच्या टीममधून

आहेत. देशभरात सोशल मिडिया संघटना अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने भाजपाने हे बदल केले आहेत. अमित मालवीय २०१५ पासून भाजपाचे आयटी सेल प्रमुख होते. परंतु आता त्यांच्याऐवजी छत्तीसगडचे दीपक म्हस्के यांच्या खांद्यावर ती जबाबदारी टाकण्यात आली आहे.

कोण आहेत दीपक म्हस्के?

छत्तीसगडचे दीपक म्हस्के हे याआधी भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते होते. पक्षाच्या संघटनात्मक आणि माध्यमातील सक्रियता यात ते भूमिका निभावतात. अलीकडेच त्यांची छत्तीसगड मेडिकल सर्व्हिसेज क?र्पोरेशनच्या अध्यक्षपदी निवड झाली. दरम्यान, आगामी ऊत्तर प्रदेश, पंजाबसह अनेक राज्यात होणा-या विधानसभा निवडणुका पाहता भाजपाने संघटनात्मक बदल केले आहेत. या नव्या टीममध्ये माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचा समावेश करून त्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणले आहे. राष्ट्रीय कार्यकारणीसोबतच वेगवेगळ्या मोर्चाच्या अध्यक्षपदांचीही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. ज्यात हेमंत जोशी यांना भाजपा युवा मोर्चाची आणि रूप कुमारी चौधरी यांना भाजपा महिला मोर्चाची जबाबदारी दिली आहे. राम माधव यांनाही पक्षाने राष्ट्रीय ऊपाध्यक्ष बनवले आहे. एकूण १३ ऊपाध्यक्षांपैकी ६ महिलांना संधी मिळाली आहे.

## 14 राज्यांमधून 253 जण

जिवंत काडतुसे आणि हेरगिरीसाठी वापरले जाणारे सीसीटीव्ही कॅमेरे यांसारखा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हे नेटवर्क अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सामील होते, अशी महत्त्वाची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक्स पोस्टवरून दिली.

१४ राज्यांमध्ये एकाच वेळी कारवाई

सुरक्षा यंत्रणांनी १२ ऑगस्ट रोजी राज्य पोलिसांसोबत रिअल-टाइम इंटेलिजन्स शेअरिंग सिस्टीमद्वारे ही कारवाई सुरू केली. ही कारवाई ऊत्तर प्रदेश, हरियाणा, दिल्ली, पंजाब, राजस्थान, महाराष्ट्र, ऊत्तराखंड, कर्नाटक, गुजरात, बिहार, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि केरळमध्ये करण्यात आली. सर्वाधिक ६२ जणांना ऊत्तर प्रदेशात, त्यानंतर हरियाणात ५२, दिल्लीत ५१ आणि पंजाबमध्ये ४४ जणांना ताब्यात घेण्यात आले. राजस्थानने १५, महाराष्ट्राने ८ आणि ऊत्तराखंडने ५ जणांना ताब्यात घेतले. कर्नाटक, गुजरात आणि बिहारमध्ये प्रत्येकी तीन जणांना, तर तेलंगणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि केरळमध्ये प्रत्येकी दोन जणांना अटक करण्यात आली.

## सरकारचे सल्लागार म्हणाले-

पोल्ट्री आणि डेअरी ऊद्योगासाठी चारा महाग होईल. याचा परिणाम असा होईल की अंडी, चिकन आणि दुधाचे दर वाढतील, ज्यामुळे थेट अन्नधान्य महागाईला प्रोत्साहन मिळेल.

**कोटी गाड्यांना E२० पेट्रोलमुळे धोका-** व्ही अनंत नागेश्वरन यांच्या मते, देशात सध्या सुमारे ८ कोटी जुन्या बाईक-स्कूटर धावत आहेत. या जुन्या 'कार्बोरेटर' तंत्रज्ञानावर चालतात, जो BS-IV इंजिन नियम लागू होण्यापूर्वी बनवल्या गेल्या होत्या. समस्या काय आहेः सरकार आता पेट्रोलमध्ये २०% इथेनाल मिसळून विकत आहे. पण जुन्या कार्बोरेटर असलेल्या गाड्या या क२० पेट्रोलवर व्यवस्थित चालत नाहीत.

**इंजिन गरम होणेः** इथेनालमध्ये ऑक्सिजन जास्त असते. जुन्या गाड्या हवा आणि पेट्रोलच्या या नवीन मिश्रणाला आपोआप अडजस्ट करू शकत नाहीत, ज्यामुळे इंजिन लवकर आणि जास्त गरम होउ लागते. पार्ट्स खराब होणेः E२० पेट्रोलच्या वापरामुळे गाड्यांच्या आत असलेले रबरचे पाईप आणि पार्ट्स हळूहळू खराब होण्याचा किंवा गळण्याचा धोका असतो. काय सल्ला दिला आहेः मुख्य आर्थिक सल्लागारांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत या ८ कोटी जुन्या गाड्यांमध्ये बदल (माडिफिकेशन) केले जात नाहीत, तोपर्यंत पेट्रोल पंपांवर जुन्या E१० पेट्रोलची विक्री सुरू ठेवली पाहिजे. यामुळे जुन्या गाड्या खराब होण्यापासून वाचू शकतील.

**इथेनलमुळे साखर आणि पाण्याचे संकट-** पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचा परिणाम आता स्वयंपाकघरातील बजेट आणि पाण्यावरही दिसू लागला आहे. रायटर्सच्या एका अहवालानुसार, या हंगामात देशाच्या एकूण वार्षिक ऊत्पादनापैकी सुमारे १०% (सुमारे ३० लाख टन) साखरेचा वापर इथेनाल बनवण्यासाठी करण्यात आला. याच कारणामुळे आता सरकार आगामी हंगामात इथेनलसाठी ऊसाच्या वापराला प्रतिबंध घालण्याचा विचार करत आहे, जेणेकरून देशात साखरेची कमतरता भासू नये आणि तिचे दर नियंत्रणाबाहेर जाउ नयेत.यासोबतच, इथेनाल बनवण्याच्या नादात देशातील पाण्याची पातळीही वेगाने खाली येत आहे. उस हे असे पीक आहे ज्याला पिकवण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात पाणी लागते. मुख्य आर्थिक सल्लागारांचे म्हणणे आहे की, आपण केवळ इथेनाल कारखान्यांमध्ये लागणा-या पाण्याकडेच नव्हे, तर तो उस पिकवण्यासाठी जो अब्जावधी लिटर भूजल खर्च होत आहे, त्याचा हिशेब लावणेही अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या पाण्याने इतर गरजा पूर्ण होउ शकल्या असत्या, ते पाणी गाड्यांचे इंधन बनवण्यासाठी वाया जात आहे.

**सरकारने म्हटले- E२० सुरक्षित, वेगळा पेट्रोल पर्याय देणे सोपे नाही-**दुसरीकडे, सरकारने इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाचे सातत्याने समर्थन केले आहे. सरकारचा युक्तिवाद आहे की E२० मुळे परकीय चलनात मोठी बचत होत आहे आणि शेतक-यांना पिकांची चांगली किंमत मिळत आहे. सरकारी चाचणीच्या आधारे असेही म्हटले आहे की E२० मुळे वाहनांच्या इंजिनला मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पुरावे मिळालेले नाहीत.

यासोबतच, सरकारने देशभरात वेगवेगळ्या प्रकारचे पेट्रोल (E१० आणि E२०) एकाच वेळी ऊपलब्ध करून देण्याची मागणी फेटाळून लावली होती, कारण यामुळे लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेनचा खर्च खूप वाढेल असे म्हटले होते.

पुढील मार्गःE२० वर कायम रहा, घाईघाईने बदल करणे टाळा

सीईए नागेश्वरन असे म्हणत नाहीत की इथेनॉल योजना बंद करावी, तर २०% नंतर सावधगिरी बाळगावी. उर्जा सुरक्षेमुळे होणा-या फायद्यांची तुलना कृषी क्षेत्र आणि अन्न अर्थव्यवस्थेला सहन कराव्या लागणा-या अदृश्य नुकसानीशी केली पाहिजे. ही चर्चा केवळ मायलेज किंवा इंजिनच्या आयुष्यापुरती मर्यादित नाही, तर ती यावर अवलंबून आहे की भारत इंधन ऊत्पादनासाठी आपली किती जमीन आणि पाणी समर्पित करण्यास तयार आहे.

## झारखंड सरकारने

पुन्हा परीक्षेची तारीख जाहीर केली आहे. इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या परीक्षा ९ आणि १० सप्टेंबर रोजी होतील. NTA ने २२ ते ३० जून दरम्यान UGC-NET परीक्षा घेतली होती.

**राहुल गांधींनी हेमंत सोरेन यांना पत्र लिहिले-** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. त्यात लिहिले आहे की - काँग्रेस पक्षाचे मत आहे की भारताच्या संविधानात दिलेला शांततापूर्ण निषेध करण्याचा अधिकार आपल्या लोकशाहीच्या मुख्य स्तंभांपैकी एक आहे. त्यामुळे, आम्ही गेल्या काही महिन्यांपासून पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील गोंधळांविरोधात आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांना आमचा पूर्ण पाठिंबा दिला आहे. मी तुम्हाला हे सुचवण्यासाठी लिहित आहे की, तुम्ही आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींना वैयक्तिकरित्या भेटावे. यामुळे त्यांच्या इतर चिंता दूर करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला बळकटी मिळेल. भारताचे तरुणच त्याचे भविष्य आहेत. या संकटाच्या वेळी आपण त्यांच्याशी एकजूट दाखवली पाहिजे आणि त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. कृपया त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी आणि या समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य पावले ऊचलण्यासाठी सर्वतोतोपरी प्रयत्न करा.

**राहुल गांधींच्या पत्रावर भाजपने प्रश्न ऊपस्थित केले**

भाजपने राहुल गांधींच्या पत्रावर प्रश्न ऊपस्थित केले आहेत. भाजप नेते अमित मालवीय यांनी पत्रासंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट केले आहे. लिहिले आहे की- हे पत्र केवळ सल्ला देणारेच नाही, तर अपमानजनक देखील आहे. हे पत्र लोकशाही पद्धतीने निवडलेल्या मुख्यमंत्र्यांकडून केलेल्या विनंतीसारखे कमी आणि एखाद्या सहका-याला स्वतःहून ठरवलेल्या अधिकाराखाली दिलेल्या निर्देशानुसार जास्त वाटते. जर राहुल गांधींना खरंच आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांची काळजी असेल, तर ते स्वत? रांचीला का गेले नाहीत? दिल्लीहून रांचीसाठी थेट विमानसेवा आहे. जेव्हा ते विद्यार्थ्यांना भेटू शकले असते, त्यांच्या तक्रारी ऐकू शकले असते आणि मुख्यमंत्र्यांशी समोरासमोर बोलू शकले असते, तेव्हा दिल्लीत आरामात बसून निर्देश का लिहिले?

## बसची धडक लागून एकाचा मृत्यू,

लांबच लांब रांगा लागल्याने काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली.घटनेची माहिती मिळताच खल्लार पोलीस स्टेशन आणि दर्यापूर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, उपजिल्हा रुग्णालयात जखमींना मदत करण्यासाठी अंकुश कावडकर, नितेश वानखडे, राहुल भुम्बर, शुभम होले, हेमंत उमाळे यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते.अपघाताचे नेमके कारण आणि मृतक व जखमींची अधिकृत ओळख याबाबत पोलिसांच्या तपासानंतर अधिक माहिती समोर येणार आहे.

## रिंग रोडवर स्कार्पिओची

अब्दुल समीर (वय ३८) आणि शमशाना परवीन (वय ४५) यांच्यासह अन्य प्रवाशांचा समावेश आहे. सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींचे जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून स्कार्पिओ चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलिसांकडून सुरू आहे.

## टाकळी तलावात तिघांचा

, अशी प्राथमिक शक्यता व्यक्त केली जात आहे. पाण्याची खोली लक्षात न आल्याने ते खोल पाण्यात गेले आणि बुडाल्याची माहिती आहे.घटनेची माहिती मिळताच तलाव परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने स्थानिक बचाव पथकाच्या मदतीने शोधमोहीम राबविली. अथक प्रयत्नांनंतर तिन्ही मुलांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

**दोन दिवसांत पाच जणांना जलसमाधी-**यवतमाळ परिसरात जलाशयांमधील दुर्घटनांची मालिका सुरू असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी शहरालगतच्या बोरगाव धरण परिसरात सैर-सपाट्यासाठी गेलेल्या वाधवाणी कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या टोळीतील दोन युवतींचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्यानंतर आता टाकळी तालवात तीन मुलांचा मृत्यू झाल्याने दोन दिवसांत पाच जणांचा जलसमाधीने मृत्यू झाला आहे.

## मुथूट फिनकॉर्प फसवणूक

यांना अटक केली आहे.आरोपींच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई केली. राहुल हरिभाऊ विंचूरकर याच्याकडून ४९.२ ग्रॅम, सचिन देवेंद्र भेरडे याच्याकडून ४० ग्रॅम, तर नीलेश चव्हाण याच्याकडून १ किलो २६० ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. त्यामुळे जप्त सोन्याचे एकूण वजन १ किलो ३४९.२ ग्रॅम झाले आहे.दरम्यान, या प्रकरणात आणखी मोठ्या सोन्याच्या व्यवहाराचा संशय पोलिसांना आहे. करुले नामक सराफाकडे सुमारे तीन किलो सोने तारण ठेवण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली असून, घोटाळा उघडकीस आल्यानंतर संबंधित सराफ फरार झाला आहे. त्याच्या शोधासाठी पोलिसांची स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली आहेत.सुरुवातीला या प्रकरणात सुमारे ७०० ग्रॅम सोने आणि ४७ लाख रुपयांच्या गैरव्यवहाराचा अंदाज होता. मात्र तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी प्रकरणाची व्याप्ती वाढत आहे. आतापर्यंत सुमारे ६० नागरिकांनी पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्याची माहिती आहे. त्यामुळे गैरव्यवहाराची रक्कम कोट्यवधी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी शाखेतील कर्मचाऱ्यांचीही चौकशी सुरू केली असून, ग्राहकांच्या तारणातील सोन्याच्या व्यवहारात नेमकी कोणाची भूमिका होती, याचा शोध घेतला जात आहे. अटक केलेल्या आरोपींच्या जबाबांसह आर्थिक व्यवहार, तारण कागदपत्रे आणि सराफांकडील नोंदी तपासल्या जात आहेत. या प्रकरणात एमपीआयडी कायद्याच्या कलम ३ अन्वयेही कारवाई करण्यात आली आहे. फरार सराफाचा शोध आणि त्याच्याकडे असल्याचे सांगितले जाणारे सुमारे तीन किलो सोने हस्तगत करणे, हे सध्या पोलिसांसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे.

मुथूट फिनकॉर्प, विमको टॉवर शाखेत तारण ठेवलेल्या सोन्याबाबत अथवा या कथित गैरव्यवहारात आपली फसवणूक झाल्याचे कोणत्याही नागरिकाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी सिटी कोतवाली पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## तीन महिन्यांपासून फरार खुनाच्या

मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. हल्ल्यानंतर आदिल रस्त्यावर पडला असताना तेथून जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराने त्याला आपल्या वाहनावर बसवून पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी त्याला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्याच्या जबाबावरून इझानोद्दीन पठाण व त्याच्या साथीदारांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेतली. त्यातून इतर आरोपी निष्पन्न झाले असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. मात्र, मुख्य आरोपी इझानोद्दीन पठाण हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. पोलिसांकडून सातत्याने त्याचा शोध घेतला जात होता.

दरम्यान, गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे फ्रेजरपुरा पोलिसांनी इझानोद्दीनला पोलिस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्या निवेदनावरून पंचनामा करून गुन्ह्यात वापरलेला चाकू, दुचाकी आणि मोबाईल असा ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त तथा परिमंडळ-१ चे यशवंत सोळंके आणि सहायक पोलीस आयुक्त, फ्रेजरपुरा विभाग नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समाधान वाठोरे, डीबी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलीस उपनिरीक्षक वैभव काळपांडे यांच्यासह पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

## २०० सीसीटीव्हींच्या

त्याच्याकडील मुद्देमालाची झडती घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने आणि रोकड मिळून आली.

**४७० ग्रॅम सोने आणि रोकड हस्तगत-**पोलिसांनी त्याच्याकडून विविध प्रकारचे सोन्याचे हार, चैन, मंगळसूत्र, बांगड्या, अंगठ्या, कानातील दागिने आणि लॉकेट जप्त केले. याशिवाय चांदीची रिंग, घड्याळ, नकली बांगड्या तसेच १ लाख ७० हजार रुपये रोख हस्तगत करण्यात आले. जप्त मुद्देमालाचे एकूण मूल्य ७२ लाख २७ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अतुल वर, दिनेश दहातोंडे व गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने केली.

## जेवण मिळण्यास उशीर झाल्याने

दाखल करण्यात आले आहे. माहितीनुसार, ग्राहक रोहित तिवारी जेवणासाठी हॉटेल मध्ये गेले होते.जेवण मिळण्यास उशीर झाल्याने त्यांच्यात आणि हॉटेल संचालकामध्ये वाद झाला. ही बोलाचाली लवकरच हाणामारीत बदलली. आरोप आहे की, याच दरम्यान दुसऱ्या टेबलवर बसलेल्या एका ग्राहकाने रोहित तिवारी यांच्या डोक्यावर पाण्याचा जग मारला. या हल्ल्यात रोहित तिवारी जखमी झाले.जखमी रोहित तिवारी यांना तात्काळ उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.रोहित तिवारी यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.तर दुसरीकडे हॉटेल संचालकाचे म्हणणे आहे की, संपूर्ण घटना हॉटेल मध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाली आहे. फुटेजच्या आधारे घटनेची खरी परिस्थिती स्पष्ट होईल, असा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## गवळीपुरात अवैध दारू विक्रीवर

आल्या. या तिन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त तथा परिमंडळ-१ यशवंत सोळंके आणि सहायक पोलीस आयुक्त फ्रेजरपुरा विभाग नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समाधान वाठोरे, पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन तसेच पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागात ८६ हजार कोटींची देयके रखडली

## १८-१९ ऑगस्टला कंत्राटदारांचा आझाद मैदानात एल्गार
## राज्यातील सर्व कंत्राटदारांनी बहूसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्याच्या विकासकामांचा गाडा पुढे नेणाऱ्या शासकीय कंत्राटदारांची तब्बल ८६ हजार ६६२ कोटींची देयके शासनाच्या विविध विभागांकडे रखडल्याने कंत्राटदारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वारंवार निवेदने, बैठका आणि पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी न लागल्याने महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशनने आता आक्रमक पवित्रा घेतला असून, १८ आणि १९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा दिला आहे. कामे करूनही बिले मिळत नसतील तर कंत्राटदारांनी व्यवसाय कसा करायचा? असा सवाल उपस्थित करीत प्रलंबित देयकांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी फेडरेशनने केली आहे. तसेच या आंदोलनात राज्यातील शासकीय कंत्राटदारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र स्टेट गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनचे पश्चिम विदर्भ संघटक सुधीर जाधव, वाशिम जिल्हा कंत्राटदार संघाचे अध्यक्ष राजू अग्रवाल, उपाध्यक्ष मुकेश ठाकूर आणि सचिव स्वप्नील सरनाईक यांनी केले आहे.



शासनाला दिलेल्या निवेदनात फेडरेशनने नमूद केले आहे की, राज्याच्या विविध विकासकामांसाठी शासकीय यंत्रणांकडून कंत्राटदारांमार्फत मोठ्या प्रमाणावर कामे करून घेतली जातात. रस्ते, पूल, शासकीय इमारती, पाणीपुरवठा, सिंचन, ग्रामीण विकास, पर्यटन तसेच अन्य पायाभूत सुविधांची कामे पूर्ण करण्यासाठी कंत्राटदार स्वतःचे भांडवल, बँक कर्ज आणि उपलब्ध आर्थिक साधनांचा वापर करतात. मात्र कामे पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून देयके वेळेत मिळत नसल्याने कंत्राटदारांची आर्थिक कोंडी होत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशनने केला आहे.

फेडरेशनच्या माहितीनुसार, १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुमारे १७ हजार ५०० कोटी, आदिवासी विकास विभागाकडे ९ हजार ८८१ कोटी, ग्रामविकास विभागाकडे १ हजार १८१ कोटी, पाणीपुरवठा विभागाकडे तब्बल ४० हजार कोटी, जलसंपदा विभागाकडे ७ हजार कोटी, पर्यटन विभागाकडे १ हजार १०० कोटी, तर इतर विविध विभागांकडे सुमारे १० हजार कोटींची देयके प्रलंबित आहेत. या सर्वांचा एकत्रित आकडा तब्बल ८६ हजार ६६२ कोटींवर पोहोचला असल्याचा दावा फेडरेशनने केला आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणावर देयके रखडल्याने कंत्राटदारांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे व्याज, कामगारांचे वेतन, बांधकाम साहित्य पुरवठादारांची देणी, यंत्रसामग्रीचा खर्च, जीएसटी तसेच अन्य वैधानिक देणी वेळेत भागवावी लागतात. मात्र शासनाकडून कोट्यवधी रुपयांची देयके मिळत नसल्याने या सर्व आर्थिक जबाबदाऱ्यांचा भार कंत्राटदारांवर पडत आहे. स्वतःच्या पैशातून कामे सुरू ठेवून शासनाच्या बिलांची प्रतीक्षा करण्याची वेळ कंत्राटदारांवर आली असल्याने त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावर फेडरेशनने शासनाकडे अनेक वेळा निवेदने सादर केली असून संबंधित विभागांचे मंत्री, अधिकारी तसेच वरिष्ठ प्रशासकीय यंत्रणेचे लक्ष वेधले आहे. विविध बैठका घेऊन प्रलंबित देयकांचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणीही करण्यात आली. मात्र १५ ऑगस्टपर्यंत मोठ्या प्रमाणावर बिले अद्याप प्रलंबित असल्याने केवळ आश्वासनांवर समाधान मानण्यास कंत्राटदार तयार नसल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रलंबित असलेली सर्व पात्र बिले तातडीने अदा करावीत, प्रत्येक विभागातील थकीत बिलांचा विभागनिहाय आढावा घेऊन निश्चित कालमर्यादेत देयके देण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, आवश्यक निधीची तातडीने तरतूद करावी आणि भविष्यात कंत्राटदारांची बिले दीर्घकाळ प्रलंबित राहणार नाहीत, यासाठी कायमस्वरूपी आर्थिक व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री, वित्तमंत्री, संबंधित विभागांचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत फेडरेशनच्या प्रतिनिधी मंडळाची तातडीने संयुक्त बैठक घेऊन प्रलंबित देयकांवर ठोस निर्णय घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# रिसोडमध्ये निवासी अतिक्रमण धारकांचे पट्टे वाटपासाठी उपोषण सुरू

## पात्र कुटुंबांचा प्रशासनाविरोधात एल्गार

■ प्रतिनिधी | वाशिम ■



रिसोड शहरातील भाग-१, सर्वे क्रमांक ९ येथील १ जानेवारी २०११ पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या पात्र निवासी कुटुंबांच्या अतिक्रमणांचे नियमानुकूलन करून त्यांना निवासी पट्टे वाटप करावेत, या मागणीसाठी संबंधित कुटुंबांकडून १४ ऑगस्टपासून उपोषण सुरू करण्यात आले आहे. शासनाच्या विविध निर्णयांनुसार पात्र असूनही गेल्या अनेक वर्षांपासून पट्टे वाटपाचा प्रश्न प्रलंबित असल्याने प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, नगररचना विभाग, उपविभागीय अधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच रिसोड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी निर्देशांची अंमलबजावणी करून पात्र कुटुंबांना त्यांच्या घरांच्या जागेचे पट्टे देण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. निवेदनानुसार, सर्वे क्रमांक ९ मधील निवासी अतिक्रमणाबाबत २८ मार्च २००२ रोजी कार्यवाही करून प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. त्यानंतर शासन निर्णयानुसार निवासी अतिक्रमणांचे नियमानुकूलन करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या आदेशाने उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कालबद्ध कार्यक्रमासाठी समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या माध्यमातून रिसोड नगरपरिषदेकडून संबंधित रहिवाशांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करण्यासाठी भूमिअभिलेख विभागामार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २०२० मध्ये मोजणी करण्यात आली. त्यानंतर पुन्हा २०२५ मध्ये मोजणी करण्यात आली असून, २९ सप्टेंबर २०२५ रोजी मोजणीशीट नगरपरिषदेकडे सादर करण्यात आल्याचे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे.

गठित समितीच्या कालबद्ध कार्यक्रमानुसार नगरपरिषद प्रशासनाने लेआउट तयार करून त्यास सभेची मान्यता घेण्यासाठी विषय सभेसमोर ठेवणे अपेक्षित होते. मात्र, त्याऐवजी संबंधित जागा शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी आरक्षित करण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. या आरक्षणासंदर्भातील मोजणी प्रस्ताव ५ फेब्रुवारी २०२६ रोजी भूमिअभिलेख कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. १ जानेवारी २०११ पूर्वी महसूल क्षेत्र अथवा गावठाण हद्दीत केवळ निवासी प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या अतिक्रमणांचे शासनाच्या विविध निर्णयांनुसार नियमानुकूलन करून पट्टे वाटप करण्याची तरतूद असताना पात्र लाभार्थ्यांना अद्याप त्याचा लाभ मिळालेला नसल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. दरम्यान, प्रशासनाकडून मागण्यांची दखल घेऊन तातडीने पट्टे वाटपाची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. मागणी मान्य होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार पात्र कुटुंबांनी व्यक्त केला असून, प्रशासन या प्रश्नावर काय निर्णय घेते याकडे रिसोडवासीयांचे लक्ष लागले आहे. या आंदोलनात राघमित्रा महिला बचत गट, समता नगर, रिसोडच्या वतीने संगीता विलास पडघान यांच्यासह मेघना बंडू सेजुळ, रोशनी नितेश इंगळे, रोहिणी अतिश धवसे, गंगुबाई श्रीपत अल्हाट, रामकोर भाऊराव भवाळ, अनिता जीवन सावळे, लक्ष्मीबाई श्रीराम पोपळघट आणि रुख्मिना संतोष वानखेडे यांचा सहभाग आहे. यावेळी वंचित चे रंगनाथ धांडे, ज्योती ताई इंगळे यांच्यासह कार्यकर्त्यांनी भेटी दिल्या.

# दुःखाच्या प्रसंगीही माणुसकीचा दीप उजळला
## स्व. राजेन्द्र धारशी लोडाया यांचे मरणोत्तर नेत्रदान

■ प्रतिनिधी | कारंजा ■



मृत्यूच्या दुःखद प्रसंगातही सामाजिक बांधिलकी जपत लोडाया कुटुंबीयांनी स्व. राजेन्द्र धारशी लोडाया यांचे मरणोत्तर नेत्रदान करून माणुसकीचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या या निर्णयामुळे दोन गरजू व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाशाची नवी आशा निर्माण होणार आहे.

कांचन विहार, कारंजा (लाड) येथील रहिवासी राजेन्द्र धारशी लोडाया (वय ७२ वर्षे) यांचे रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने लोडाया परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र, या दुःखाच्या प्रसंगीही परिवाराने सामाजिक भान जपत 'आपल्या जाण्यानंतरही कोणाच्या तरी आयुष्यात रंग भरता यावेत', या उदात्त भावनेतून नेत्रदानाचा निर्णय घेतला. त्यांचे पुत्र जिग्नेश लोडाया व जिनन लोडाया यांच्या पुढाकाराने नेत्रदानाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. अमरावती येथील दिशा इंटरनॅशनल आय बँकेशी डॉ. उल्हास काटोले यांनी संपर्क साधला. दिशा इंटरनॅशनल आय बँकेचे सचिव स्वप्नील गावंडे तसेच डॉ. शार्दूल डोंणगावकर, डॉ. राम गुंजाटे आणि डॉ. विजय जवाहरमलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली हिमांशू बंड व अनिल देशमुख यांनी तत्काळ कारंजा येथे येऊन मरणोत्तर नेत्रकमळ दानाची प्रक्रिया पूर्ण केली. या सेवाभावी कार्यावेळी दिशा ग्रुप कारंजाचे विजय पाटील काळे, उमेश माहितकर, भैरूसेठ केसवाणी, शितल देवडा आदी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त गोविंद स्कूलमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

देशासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची जाणीव ठेवत, त्यांच्या स्वप्नातील भारत घडविण्याची जबाबदारी आजच्या पिढीची आहे,' या भावनेने गोविंद स्कूल, कारंजा (लाड) येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर सादरीकरणांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष किरण चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत पाटील डहाके, फुलाडी सर, निनाद बन्नोरे , संजयजी मिसाळ तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा कदम मॅडम, अर्चना काकडे मॅडम व पर्यवेक्षिका किरण व्यास मॅडम यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे संचालक संतोष चौधरी यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी शाळेच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडून सांगितला. शाळेत राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधा तसेच विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या उल्लेखनीय यशाची त्यांनी सविस्तर माहिती दिली. 'विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा, संस्कारांना भक्कम पाया आणि स्वप्नांना उंच भरारी देण्याचे व्यासपीठ म्हणजे शाळा,' या भावनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर गीत, नृत्य, विविध सांस्कृतिक सादरीकरणे आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अधिकच रंगतदार झाला. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम, भारतीय संस्कृती आणि राष्ट्रभक्तीची भावना प्रभावीपणे व्यक्त झाली.

विशेषतः 'ए वतन तेरे लिए' या देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भक्तीपर गीत-नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणात माहीन फातिमा, राजनंदनी गुप्ता, वैष्णवी तांडेकर, श्रावणी चौहान आणि मनस्वी राऊत या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कलागुणांचे सुंदर दर्शन घडविले. त्यांच्या भावपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# स्वातंत्र्यदिनीच ग्रामसभेच्या हक्कासाठी तरुणांचा एल्गार!
## करंजीत आमरण उपोषण ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील करंजी ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता यावी गावातील विकासकामांचा हिशेब जनतेसमोर मांडला जावा आणि ग्रामसभेच्या अधिकारांचा सन्मान व्हावा या मागणीसाठी करंजी ग्रामपंचायतीसमोर दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजता आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आली या आंदोलनाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ गावकरी आणि जागृत नागरिकांचा पाठिंबा मिळत असून युवकांच्या या लढ्याकडे आता संपूर्ण तालुक्यासह वाशिम जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या आमरण उपोषणात हनुमान उर्फ गोपाल भागवत खाडे विठ्ठल शंकर लहाने आणि गोपाल गजानन खाडे हे तिघे युवक सहभागी झाले आहेत

१५ ऑगस्ट हा भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस देश स्वतंत्र झाला नागरिकांना आपले हक्क मिळाले आणि लोकशाही व्यवस्थेत ग्रामसभेला महत्त्वपूर्ण अधिकार देण्यात आले. मात्र याच स्वातंत्र्यदिनी गावातील विकासकामांची माहिती खर्चाचा हिशेब आणि ग्रामपंचायतीच्या कारभारातील कागदपत्रे जनतेसमोर यावीत यासाठी उद्याचे भविष्य असणाऱ्या तरुणांना आमरण उपोषणाला बसावे लागणे ही लोकशाही व्यवस्थेसाठी लाजीरवाणी बाब असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे गावाचा विकास गावातील सुख-सुविधा आणि पुढील पिढीचे भविष्य यासाठी प्रश्न विचारणारे हे युवक आहेत त्यांच्या मागण्यांकडे केवळ आंदोलन म्हणून न पाहता गावाच्या विकासाची आणि पारदर्शक कारभाराची मागणी म्हणून प्रशासनाने गांभीर्याने पाहावे अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. युवकांनी सुरू केलेल्या या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ गावकरी मंडळी आणि जागृत नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे गावातील विकासकामांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळावी ग्रामपंचायतीच्या निधीचा विनियोग कुठे आणि कसा झाला हे स्पष्ट व्हावे आणि ग्रामसभेत प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळावे अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.



**गावासाठी आवाज उठवणाऱ्या तरुणांना साथ द्या**

गावातील सुख-सुविधा, रस्ते, पाणी, विकासकामे आणि शासकीय योजनांबाबत प्रश्न विचारण्यासाठी युवा पिढी आता पुढे येत आहे. गावाबद्दल प्रेम आणि आपुलकी असणाऱ्या तरुणांनी गावाच्या भविष्यासाठी पुढाकार घेतला आहे.

ग्रामपंचायतीअंतर्गत झालेल्या विकासकामांची माहिती त्यावर झालेला खर्च आणि विविध शासकीय योजनांचा लाभ नेमका कोणाला मिळाला याचा स्पष्ट हिशेब ग्रामसभेसमोर उपलब्ध करून द्यावा अशी उपोषणकर्त्यांची मागणी आहे.


## नगर परिषद कार्यालय, खामगाव जि. बुलडाणा

दुरध्वनी क्र. ०७२६३-२५४१५५ ई मेल: comckhamgaon@gmail.com
वेबसाईट: https:\\khamgaonmahaulb.maharashtra.gov.in

जा.क्र. खानप/विवि/........./०८/२०२६ दि. .........../२०२६

### निविदा सुचना

मुख्याधिकारी, न.प. खामगाव जि. बुलडाणा यांच्या वतीने अनुज्ञापक मंडळाचे व सा. बा. विभागाचे विद्युत नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता विहित मुदतीत निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदा प्रपत्र किंमत. | इसारा अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Providing for Electrical Installation to tower Gardan Khamgaon Under Municipal Council Khamgaon Dist. Buldhana. | 419968/- + GST | 500/- | 10000/- | ९० दिवस |
| २ | Providing E.I. to School Room And Passage at School Barde Plot Under Municipal Council Khamgaon Dist - Buldhana | 423119/- + GST | 500/- | 10000/- | ९० दिवस |

शर्ती व अटी :
१. वरील कामाची माहिती अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत पाहणेकरिता व विक्री करिता विद्युत विभाग, न.प. खामगाव येथे उपलब्ध राहतील.
२. सदर निविदेचे कोरे निविदा प्रपत्र विक्री करिता दिनांक १७/८/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.२४/८/२०२६ दुपारी ४.०० वाजे पर्यंत विद्युत विभाग, न.प. खामगाव येथे उपलब्ध राहतील.
३. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या सीलबंद निविदा दिनांक १७/८/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक २४/८/२०२६ दुपारी ४.०० वाजे पर्यंत न. प. आवक-जावक मार्फत पोहचतील या बेताने पाठवावीत.
४. सदर सर्व निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे बाबतचे सर्व हक्क मुख्याधिकारी, न.प.ने राखुन ठेवले आहेत. ५. निविदा शक्यतो दिनांक. २४/८/२०२६ रोजी ठिक.४.०० वाजेनंतर मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यात येतील.

**मुख्याधिकारी**
नगर परिषद खामगाव


# शिवसेना जिल्हा प्रमुख निवडीकडे लक्ष



■ प्रतिनिधी | वाशिम ■

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये शिवसेना पक्षाची वाशीम जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यात नवीन जिल्हाप्रमुख निवडीकडे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

या पदासाठी युवासेनेचे जिल्हाप्रमुख रवी भांदुर्गे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. मागील २० वर्षांपासून शिवसेना पक्षाशी एकनिष्ठ राहून त्यांनी विविध पदांवर सक्रिय काम केले आहे. शाखाप्रमुख, भारतीय विद्यार्थी सेना शहर प्रमुख ते युवा सेना जिल्हाप्रमुख असा त्यांचा प्रवास राहिला आहे. विद्यार्थी, कामगार तसेच आरोग्यविषयक प्रश्नांवर ते सातत्याने सक्रिय भूमिका घेत असल्याने त्यांना जिल्हाप्रमुखपदाची संधी मिळावी, अशी कार्यकर्त्यांमध्ये अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रवी भांदुर्गे यांची निवड झाल्यास पक्षाला जिल्ह्यात नवी उभारी मिळेल, असा विश्वासही व्यक्त होत आहे.

# कारंजात ११ किलो ३३५ ग्रॅम गांजा जप्त
## शेलूबाजार मार्गावर शहर पोलिसांची कारवाई ; ऑटो व मोबाईलसह ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शेलूबाजारकडून कारंजाकडे येणाऱ्या मार्गावर कारंजा शहर पोलिसांनी धडक कारवाई करीत तब्बल ११ किलो ३३५.२ ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत गांजा, ऑटो व मोबाईल असा एकूण ८ लाख १ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी एका संशयितास अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.४५ ते ६.५५ वाजताच्या सुमारास शेलूबाजारकडून कारंजाकडे येणाऱ्या रस्त्यावर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाजवळ पोलिसांनी कारवाई केली. अमली पदार्थांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारंजा शहर पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. पंचांसमक्ष संशयिताची झडती घेतली असता त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला.

या कारवाईत डंकेमिद खान अफसर खान (वय ३४, रा. तन्हाळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून ११ किलो ३३५.२ ग्रॅम गांजा, अंदाजे किंमत ५ लाख ९६ हजार ७६० रुपये, जप्त करण्यात आला.

गांजासोबत एमएच १७ एजे ०३८८ क्रमांकाचा ऑटो जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजे किंमत २ लाख रुपये आहे. तसेच एका जुन्या वापरातील मोबाईलचीही पोलिसांनी जप्ती केली. अशाप्रकारे गांजा, वाहन व मोबाईल असा एकूण सुमारे ८ लाख १ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक महेश नेवरेड यांच्या फिर्यादीवरून कारंजा शहर पोलीस ठाण्यात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला १५ ऑगस्ट रोजी रात्री अटक करण्यात आली असून, जप्त केलेला गांजा नेमका कुठून आणण्यात आला, कोणाला विक्री करण्यासाठी नेण्यात येत होता तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर करीत आहेत. पोलीस निरीक्षक अमर चोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी अजय धनकर, उमेशकुमार बिबेकर, मयुरेश तिवारी, मोहंमद परसुवाले, अमित भगत, नितीन पाटील व अनिस निनसुरवाले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

कारंजा शहर व परिसरात अमली पदार्थांची अवैध विक्री व वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाई सुरू असतानाच मोठ्या प्रमाणात गांजा जप्त झाल्याने या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जप्त केलेला गांजा कोणत्या मार्गाने कारंजात आणण्यात आला आणि त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६१ ■ मंगळवार १८ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# नागपंचमीच्या पूजेलाच वाघाचा हल्ला

## शेतकऱ्याचा बळी

### नरसिंगपूर शिवारातील थरारक घटना आष्टी परिसरात भीतीचे वातावरण

**आष्टी (शहीद) जनमाध्यम** : नागपंचमीच्या पूजेसाठी शेतात गेलेल्या ७० वर्षीय शेतकऱ्यावर वाघाने हल्ला करून त्यांचा बळी घेतल्याची धक्कादायक घटना सोमवारी नरसिंगपूर शिवारात घडली. या घटनेने आष्टी तालुक्यात खळबळ उडाली असून नरसिंगपूर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.





आष्टी शहरातील कवठीपुरा येथील शेतकरी रामभाऊ उदेभान भोयर (७०) हे नागपंचमीच्या निमित्ताने शेतात पूजा करण्यासाठी गेले होते. पूजा सुरू असतानाच दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे त्यांना बचावाची संधीही मिळाली नाही.

अर्ध्यावरच पूजा थांबली आणि वाघाच्या हल्ल्यात रामभाऊ भोयर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच मृताचे नातू, शेजारी तसेच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत वनविभागाला माहिती दिली. त्यानंतर तळेगाव वनक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी गजानन लांबाडे, वनपाल रोहिणी पडोळे, वनरक्षक इंद्रपाल भगत यांच्यासह पोलिस ठाण्याचे ठाणेदार राजेश जोशी आणि इएध हर्षल नगराळे यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली.

या घटनेमुळे नरसिंगपूर शिवारात वाघाची दहशत पसरली आहे. शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वनविभाग आणि पोलिस प्रशासनाकडून घटनास्थळाची पाहणी करून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी शेतात जाताना विशेष खबरदारी घ्यावी, एकट्याने शेतात जाणे टाळावे आणि वन्यप्राण्यांच्या हालचालींबाबत सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---

### आईचे छत्र हरपले ; दोन चिमुकल्यांवर दुःखाचा डोंगर

# पतीसोबत माहेरी जाताना दुचाकीवरून पडली

## उपचारादरम्यान ३२ वर्षीय विवाहितेचा मृत्यू

**पवनार जनमाध्यम** : माहेरी जाण्याचा आनंद मनात घेऊन पतीसोबत दुचाकीवरून निघालेल्या सुषमा गणेश नौकरकर (वय ३२) यांच्यावर काळाने अचानक घाला घातला. दुचाकीचे संतुलन बिघडून रस्त्यावर पडल्याने गंभीर जखमी झालेल्या सुषमा यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. १६ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेने दोन चिमुकल्यांच्या डोक्यावरचे आईचे मायेचे छत्र कायमचे हरपले.



१३ ऑगस्ट रोजी सुषमा या पती गणेश यांच्यासोबत दुचाकीने माहेरी केळझर येथे जात होत्या. बाबूजीवाडी परिसरातील खालवर मार्गावर दुचाकीचे अचानक संतुलन बिघडले आणि त्या रस्त्यावर कोसळल्या. अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना प्रथम सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी सावंगी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही नियतीपुढे उपचार अपुरे ठरले.

१६ ऑगस्टच्या रात्री सुषमा यांनी अखेरचा श्वास घेतला. १७ ऑगस्ट रोजी दुपारी पवनार येथील स्थानिक स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

सुषमा यांच्या पश्चात पती, दोन लहान मुले, सासू-सासरे, आई-वडील आणि मोठा आप्तपरिवार आहे. आईच्या अकाली निधनाने चिमुकल्यांचा आधार हिरावला असून नौकरकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

---

### पत्नीला भेटण्याची आस अधुरीच

# दुचाकी दुभाजकावर आदळून तरुणाचा जागीच मृत्यू

## नागलवाडी शिवारातील भीषण अपघात

**आष्टी शहीद जनमाध्यम**

नागपंचमीच्या दिवशी पत्नी आणि दोन लहान मुलांना भेटण्यासाठी निघालेल्या तरुणावर नियतीने वाटेतच घाला घातला. कारंजा (घा.) तालुक्यातील नागलवाडी शिवारात दुचाकी दुभाजकाला धडकून झालेल्या भीषण अपघातात मोई तांडा येथील ३८ वर्षीय विनेश धनराज जाधव यांचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी दुपारी सुमारास हा अपघात घडला.



विनेश जाधव हे राजकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. दोन दिवसांपूर्वी त्यांची पत्नी दोन लहान मुलांसह नातलगांकडे गेली होती. नागपंचमी असल्याने पत्नी व मुलांना भेटण्यासाठी विनेश दुचाकी क्रमांक एमएच ३२ बीसी २१८० वरून मोई येथून सुसुंद्रा मार्गे कारंजाकडे निघाले. तेथून राष्ट्रीय महामार्गाने कोंढाळीकडे जात असताना नागलवाडी शिवारात त्यांचा दुचाकीवरील ताबा सुटला.

भरधाव दुचाकी थेट दुभाजकावर आदळली. धडक एवढी जोरदार होती की विनेश हे दुचाकीवरून दूरवर फेकले गेले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच कारंजा (घा.) पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस उपनिरीक्षक सतीश जायभाये व कालोकर यांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर मृतदेह ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला.

भेटीची वाट ठरली अखेरची

पत्नी आणि मुलांना भेटण्यासाठी घरातून निघालेल्या विनेश यांची ही वाटचाल अखेरची ठरली. सणाच्या दिवशीच कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले आणि कुटुंबीय असा परिवार आहे.

---

# कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी

## खासदार अमर काळेंची शोकाकुल कुटुंबीयांना आधाराची हाक



**हिंगणघाट जनमाध्यम** : स्वातंत्र्यदिनाची सकाळ... देशभर तिरंगा फडकत असताना हिंगणघाट शहरात मात्र काळाने तीन कुटुंबांवर घाला घातला. भीषण अपघातात तीन शाळकरी विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण शहरावर शोककळा पसरली. मिसबा जावेद शेख (१७), समृद्धी रूपक धामसे (१६) आणि आरोही अनुप चौरे (१६) या तीन जिवलग मैत्रिणींच्या अकाली जाण्याने हिंगणघाट सुन्न झाले आहे.शिक्षणासाठी घराबाहेर पडलेल्या या तिन्ही मुलींचा प्रवासच अखेरचा ठरला. त्यांच्या मृत्यूची बातमी कुटुंबीयांपर्यंत पोहोचताच आक्रोशाने आसमंत दणाणून गेला. लहान वयात मुलींना गमावण्याचा आघात पालकांसाठी असह्य ठरला असून, तीनही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या हृदयद्रावक घटनेची माहिती मिळताच वर्धा जिल्ह्याचे खासदार अमर काळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी मृत विद्यार्थिनींच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यांनी शोकाकुल कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या दुःखात सहभागी असल्याचे सांगितले. अचानक घडलेल्या या दुर्घटनेने प्रत्येकाला हादरवून सोडले आहे. तीन निरागस लेकींचे अकाली जाणे ही कुटुंबीयांसाठी कधीही न भरून येणारी पोकळी आहे. खासदार काळे आणि वांदिले यांनी विद्यार्थिनींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी भावना व्यक्त केली.

---

### न्यायपालिकेची अवहेलना भोवली

# नितेश कराळेवर गुन्ह्याचा फास

## सोशल मीडियावरील कथित आक्षेपार्ह व्हिडीओने खळबळ राकाँ (श.प.)च्या प्रदेश प्रवक्त्यावर कारवाई

**वर्धा जनमाध्यम** : सोशल मीडियावर देशाच्या न्यायपालिकेबाबत कथितरीत्या अभद्र व आक्षेपार्ह टिप्पणी करणे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते नितेश कराळे यांना चांगलेच भोवले आहे. त्यांच्या इन्स्टाग्रामवरील व्हिडीओची दखल घेत वर्धा शहर पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

नितेश कराळे हे सोशल मीडियावरील आपल्या आक्रमक शैलीतील व्हिडीओंसाठी परिचित आहेत. सामाजिक, राजकीय तसेच विविध ज्वलंत विषयांवर ते भाष्य करीत असतात. त्यांच्या इन्स्टाग्राम पेजवर प्रसारित करण्यात आलेल्या एका व्हिडीओमध्ये न्यायपालिकेबाबत कथितरीत्या आक्षेपार्ह व अभद्र भाषेचा वापर करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. गुप्तचर विभागाकडून याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी संबंधित व्हिडीओची पाहणी केली. व्हिडीओतील मजकूर व वक्तव्यांची पडताळणी केल्यानंतर वर्धा शहर पोलिस ठाण्यात कराळे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.

कराळे यांच्या सोशल मीडिया व्हिडीओंवरून यापूर्वीही वाद निर्माण झाले आहेत. काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे यांच्या उपस्थितीत त्यांचा एक वादग्रस्त व्हिडीओ समोर आला होता. त्यावरूनही चर्चा रंगली होती.

---

# प्रवाशांशी मराठीतून बोला, आरटीओचा ऑटोचालकांना सल्ला

## महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा उपक्रमात अमराठी चालकांना प्रमाणपत्रांचे वाटप

**वर्धा जनमाध्यम** : प्रवाशांशी नम्रपणे संवाद साधताना मराठी भाषेचा योग्य वापर करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती स्नेहा मेढे यांनी ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांना केले. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने 'महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा' पाठ्यक्रमांतर्गत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अमराठी ऑटोचालकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.




वर्धा शहरातील ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी रस्ता सुरक्षा कक्षात या पाठ्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी यशवंत कनिष्ठ महाविद्यालयाचे रितेश निमसाडे यांनी चालकांना व्यवहारातील मराठी भाषेचे ज्ञान, योग्य वापर आणि प्रवाशांशी प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर चालकांच्या मराठी भाषेच्या ज्ञानाचे मूल्यमापन करण्यात आले.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती स्नेहा मेढे होत्या. मार्गदर्शक रितेश निमसाडे, प्रमोद खाडे, ऑटो युनियनचे अध्यक्ष देवा निखाडे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. संदीप मुखे आणि मोटर वाहन निरीक्षक श्री. अजय चौधरी उपस्थित होते.

श्री. निमसाडे यांनी प्रवाशांशी नम्रतेने संवाद साधण्याचे महत्त्व पटवून दिले. श्रीमती मेढे यांनी योग्य संवाद व नम्र वर्तनामुळे प्रवाशांचा विश्वास वाढतो, असे सांगत दैनंदिन व्यवहारात मराठीतून संवाद साधण्याचे आवाहन केले.

गडकरी रंगायतन, ठाणे येथे झालेल्या प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. उत्तीर्ण चालकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

---

## जाहीर नोटीस

कृष्णाजी पांडूरंग युवनाथे यांचा दिनांक १८.३.२०१३ ला व ज्योत्स्ना कृष्णाजी युवनाथे यांचा दिनांक ३.१०.२०२० ला मृत्यू झाल्यामुळे यांचा नावावर असलेली गाडी क्र: एम.एच - ३२-ऐजी-२३१५ त्यांची मुलगी नाव कु. तेजस्विनी कृष्णाजी युवनाथे यांचे नावाने करायचे आहे, करिता जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

मुलीचे नाव . कु. तेजस्विनी कृष्णाजी युवनाथे

पत्ता: प्रियदर्शनी महाविद्यालय रोड शंभुषेश मंदीर जवळ द्वारका नगर वार्ड न.१ आलोडी वर्धा. ४४२००१

---

महाराष्ट्र शासन

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**

**कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा यांचे कार्यालय**

पत्ता - निमन वर्धा प्रकल्प विभाग, आर्वी रोड, पिंपरी (मेघे), वर्धा-४४२००१

ई-मेल -eelwpdn@gmail.com दुरध्वनी - ०७१५२-२४१९४३

**निविदा सूचना क.०४/२०२६-२७**

Main Portal : https://wrd.maharashtra.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन) मागवित आहे. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | वाढोणा येथे पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी सर्वेक्षण काम (पूर रेषा) करणे ता.आर्वी, जि.वर्धा | रुपये ८४४६३४ | रुपये ८५०० | रुपये १०००/-जीएसटी १८ टक्के रु.१८०/- = रु.११८०/- | वर्ग ७ व त्यावरील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव | ०६ महिने पावसाळा धरुन |
| २. | मदना येथे पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी सर्वेक्षण काम (पूर रेषा) करणे, ता.आर्वी, जि.वर्धा | रुपये ८४४६३४ | रुपये ८५०० | रुपये १०००/- जीएसटी १८ टक्के रु.१८०/- = रु.११८०/- | वर्ग ७ व त्यावरील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव | ०६ महिने पावसाळा धरुन |
| ३. | नांदपूर येथे पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी सर्वेक्षण काम (पूर रेषा) करणे, ता.आर्वी, जि.वर्धा | रुपये ८४४६३४ | रुपये ८५०० | १०००/- जीएसटी १८ टक्के रु.१८०/- = रु.११८०/- | वर्ग ७ व त्यावरील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव | ०६ महिने पावसाळा धरुन |
| ४. | खडकी येथे पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी सर्वेक्षण काम (पूर रेषा) करणे, ता.आष्टी, जि.वर्धा | रुपये ८४५५२१ | रुपये ८५०० | १०००/- जीएसटी १८ टक्के रु.१८०/- = रु.११८०/- | वर्ग ७ व त्यावरील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव | ०६ महिने पावसाळा धरुन |
| ५. | हिवरा येथे पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी सर्वेक्षण काम (पूर रेषा) करणे, ता.आर्वी, जि.वर्धा | रुपये ८३९५९२ | रुपये ८४०० | १०००/- जीएसटी १८ टक्के रु.१८०/- = रु.११८०/- | वर्ग ७ व त्यावरील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव | ०६ महिने पावसाळा धरुन |

| | | |
|---|---|---|
| अ) | निविदा उपलब्ध कालावधी | दि.१८.०८.२०२६ वेळ १०.०० वाजता ते दि.२५.०८.२०२६ वेळ १७.४५ पर्यंत |
| ब) | निविदा सादर करण्याचा दिनांक | दिनांक ३१.०८.२०२६ वेळ १७.४५ पर्यंत |
| क) | निविदा उघडणे दिनांक | दिनांक ०१.०९.२०२६ (वेळ १०.०० वाजता) |

१) कार्यकारी अभियंता कार्यालयातून निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार आहेत. तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.

२) निविदेमध्ये दर्शविण्यात आलेल्या तारखा व वेळेनुसार (तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा) उघडतांना निविदाकाराने किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीने विभागीय कार्यालयात उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडण्याबाबतची कोणतीही तकार स्विकारली जाणार नाही.

**जा.क.१७३५/निली/निवप्र/२०२६**
**दिनांक १४.०८.२०२६**

(क्र.जिमाका-वर्धा/१२३/२०२६-२०२७)

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता**
**निम्न वर्धा प्रकल्प विभाग,**
**वर्धा**

# ओबीसी नेत्यांची सुंदर मुले आणि पैसा पाहून मराठा समाजाच्या तरुणी त्यांच्या घरात घुसतात

## नवनाथ वाघमारेंचे मराठा समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य

**मुंबई/ प्रतिनिधी-** ओबीसी समाजाचे नेते नवनाथ वाघमारे यांनी मराठा समाजाच्या तरु णींबद्दल अत्यंत आक्षेपार्ह आणि धक्कादायक विधान केले आहे. ओबीसी नेत्यांची सुंदर मुले आणि पैसा पाहून मराठा समाजाच्या तरु णी त्यांच्या घरात घुसतात, असे संतापजनक वक्तव्य वाघमारे यांनी केले आहे. त्यांच्या या आक्षेपार्ह विधानाने राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरू न बोलताना नवनाथ वाघमारे यांनी थेट नेत्यांच्या घरातील महिलांना लक्ष्य केले. ते म्हणाले, स्वत: चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे की, माझी सून मराठा आहे आणि बायको कुणबी आहे. त्यांच्या घरात सगळे सोयरे घुसले असतील. फक्त बावनकुळेच नाही, तर अनेक ओबीसी मंर्त्यांच्या घरात मराठ्यांच्या मुली घुसल्या आहेत. ओबीसी मंर्त्यांची गोंडस, सुंदर मुले आणि पैसा दिसला की मराठा मुली त्यांच्या घरात घुसतात. जर हे मंत्री मराठ्यांच्या मुलींचे ऐकून ओबीसी समाजाचे वाटोळे करत असतील, तर त्यांनी थेट समोर येउन सांगावे की आम्हाला ओबीसींशी काहीही देणेघेणे नाही. मराठा समाजाला टार्गेट करण्यासाठी थेट महिलांचा अपमान केल्याने मराठा महिला संतप्त झाल्या आहेत. वाघमारे यांच्या विधानाचा निषेध करण्यासाठी नांदेडमध्ये सकल मराठा समाजाच्या महिलांनी मोठा मोर्चा काढला. मनोज जरांगे पाटील यांच्यावरील द्वेषापोटी राजकारणात महिलांना ओढले जात असल्याचा आरोप करत, नवनाथ वाघमारे नांदेडमध्ये आल्यास त्यांच्या तोंडाला काळे फासू, असा थेट इशारा महिला आंदोलकांनी दिला आहे.



**माढ्यात (सोलापूर) गुन्हा दाखल करण्याची मागणी**

सोलापूर जिल्ह्यातील माढा येथेही मराठा समाज आक्रमक झाला असून, वाघमारे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.

**राजकीय पातळी खालावली : रेखा कोंडे**

शिवसेना नेत्या रेखा कोंडे यांनी नवनाथ वाघमारे यांना सडेतोड शब्दांत उत्तर देत त्यांच्यावर घणाघात केला. हा फक्त मराठा नाही, तर सर्व महिला वर्गाच्या सन्मानाचा विषय आहे. कोणत्याही समाजातील स्त्रीचा अपमान करणे हा खूप मोठा गुन्हा आहे. केवळ मराठा समाजातीलच मुली ओबीसी मुलांसोबत लग्न करतात असे नाही, तर आज अशी परिस्थिती आहे की कित्येक ओबीसी समाजातील मुली मराठा समाजातील मुलांसोबत लग्न करतात. राजकीय नेत्यांना टार्गेट करण्यासाठी तुम्ही त्यांच्या घरातल्या महिलांपर्यंत पोहोचता, यावरू न तुमची राजकीय आणि सामाजिक पातळी किती खालावली आहे हे स्पष्ट दिसते. स्वत:ला महात्मा फुलेंचे वारसदार म्हणवून घेता आणि जातीय राजकारणासाठी महिलांना टार्गेट करता. तुम्ही खोट्या आणि तकलादू विचारांवर जगणारी लोक आहात. असेही त्या म्हणाल्या.



## आमच्या लेकी-बाळींवर बोलाल, तर याद राखा!

**अंतरवाली सराटी : प्रतिनिधी**

ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी मराठा मुली ओबीसी मंर्त्यांच्या घरात घुसतात या केलेल्या विधानाचा जरांगे यांनी आक्रमकपणे समाचार घेतला. मी आतापर्यंत सगळ्या नेत्यांवर बोललो, पण मी कधीच कोणत्याही जाती-धर्माच्या, हिंदू-मुस्लिम-बौद्ध कुणाच्याही लेकी-बाळींवर कधीच बोललो नाही. पण जर कोणी मराठ्यांच्या लेकी-बाळींवर असे बोलत असेल, तर ती १०० टक्के वड्या-वघळीचीच औलाद आणि घुरट पैदास आहे. जर तुम्ही आमच्या गरीब मराठ्यांच्या लेकींबद्दल असे बोलणार असाल, तर मग आम्ही तुमच्याबद्दल बोलू का? मराठ्यांची पोरं आता शांत बसणार नाहीत, आम्हीही यापेक्षा वाईट थराला जाउ शकतो.मराठा समाजाला न्याय मिळाला नाही, तर वेळ आल्यास मराठे हे सरकार पाडतील. सरकारने मराठ्यांच्या ५८ लाख नोंदींचे कुणबी प्रमाणपत्र आणि व्हॅलिडिटी (जात पडताळणी) द्यायलाच हवी. जर यातील एकही नोंद सरकारने कमी केली, तर गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा थेट इशारा जरांगे यांनी दिला आहे.

आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे २० ते २५ ऑगस्टदरम्यान दौरा करणार आहेत. ते म्हणाले, माझी तब्येत बरी नसली, तरी मी मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांचा (अकोला, बुलढाणा, यवतमाळ) दौरा करणार आहे. जर तब्येतीमुळे दौरा शक्य झाला नाही, तर मराठा समाजाने आणि युवकांनी घराघरांत जाउन ही जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घ्यावी. २९ ऑगस्टला आपण अंतरवाली सराटीत आमरण उपोषण करणार आहोत, पण हे उपोषण शांततापूर्ण असेल. जिथे अन्याय होईल, तिथे मराठ्यांच्या पोरांनी आक्रमकपणे आवाज उठवायलाच पाहिजे.

**बावनकुळे, शिरसाटांनी मराठ्यांचा तळतळाट घेतलाय**

भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांच्यावर जरांगे यांनी घणाघात केला. बावनकुळे आणि शिरसाट यांनी मराठ्यांचा इतका तळतळाट घेतला आहे की ते गोरगरिबांचे वाटोळे करत आहेत. हे लोक जाणीवपूर्वक याचिका करायला लावत आहेत आणि नाटके करत आहेत. पण ५८ लाख नोंदींपैकी एकही नोंद कमी केली, तर आम्ही सरकारला सोडणार नाही.

**राधाकृष्ण विखे-पाटलांच्या भूमिकेवर संशय-** मनोज जरांगे यांनी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट लक्ष्य केले. विखे-पाटलांनी एक नवीनच प्रकार सुरू केला आहे. ज्यांची कुणबी प्रमाणपत्रे व्हॅलिड झाली आहेत, त्यांच्या फेरतपासण्या लावल्या जात आहेत. सरकारने सांगावे, फक्त मराठ्यांच्याच फेरतपासण्या लावल्या आहेत की ओबीसी, एससी, एसटी सर्वांच्याच? असे जाणीवपूर्वक करू न मराठ्यांचा उद्रेक होईल असे वागू नका. फडणवीस साहेब, तुमचे मंत्री माजल्यासारखे करत आहेत. तुमच्या सरकारविषयी सध्या विद्यार्थी, शेतकरी, दलित, मुस्लिम, आदिवासी आणि मराठा समाजात प्रचंड खदखद आहे. केव्हा सत्तेतून निसटून जाल, हे तुम्हाला कळणारही नाही.

**अभ्यासकांना त्यांची जागा दाखवली**

काल १६ ऑगस्ट रोजी जरांगे यांनी राज्यातील अभ्यासकांना बोलावले होते, मात्र अनेक जण उपस्थित राहिले नाहीत. यावर जरांगे म्हणाले, मी माझे कर्तव्य पार पाडले. मला कुणीही म्हणू नये की जरांगे आम्हाला बोलू देत नाही. पण जे लोक आले नाहीत, त्यांनी सिद्ध केले आहे की त्यांना गोरगरिबांशी आणि मराठा समाजाशी एकनिष्ठ राहायचे नाहीये, त्यांना फक्त मीडियात जाउन स्वत:चे ज्ञान पाजळायचे आहे.

# एसडीओंचा अंतिम आदेश प्रलंबित; तरीही अप्पर आयुक्तांकडे अपील दाखल

### ● महसूल प्रक्रियेलाच 'बगल' की भूमाफिया सिंडीकेटला वेळकाढूपणाची संधी?
### ● अकोटच्या पाच लेआउट प्रकरणांवरून अमरावती महसूल विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

**अकोला** : अकोट तालुक्यातील पाच कृषक भूखंडांच्या अकृषकीकरण प्रकरणाने आता महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. अकोटच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीओ) सुनावणी पूर्ण होऊन प्रकरणे अंतिम आदेशासाठी राखून ठेवण्यात आलेली असताना, संबंधित लेआउटधारकांनी थेट अप्पर आयुक्त (न्याय शाखा), अमरावती यांच्याकडे अपील दाखल केले. विशेष म्हणजे, एसडीओंचा अंतिम आदेशच झालेला नसताना ही अपील याचिका सुनावणीसाठी दाखल करून घेण्यात आल्याने 'अंतिम निर्णयापूर्वी अपील नेमके कोणत्या आधारावर?' असा सवाल उपस्थित झाला आहे.

अकोट तालुक्यातील बळेगाव, देवरी, नखेगाव, लखमापूर आणि केसोरी येथील पाच कृषक भूखंडांच्या अकृषकीकरण आदेशावर आक्षेप घेत पर्यावरणप्रेमी तथा आरटीआय कार्यकर्ते विठ्ठल गावंडे यांनी तत्कालीन एसडीओ बळवंत अरखराव यांच्याकडे तक्रार केली होती. एप्रिल २०२३ मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २५७ अन्वये पुनर्निरीक्षण म्हणून प्रकरणे दाखल करण्यात आली. त्यानंतर सुनावण्या घेऊन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि प्रकरणे अंतिम आदेशासाठी ठेवण्यात आली.दरम्यान, लेआउटधारकांनी महत्त्वाची कागदपत्रे व अतिरिक्त म्हणणे सादर करण्यासाठी स्वतंत्र अर्ज केला. मात्र एसडीओंनी तो अर्ज फेटाळून प्रकरणे अंतिम आदेशासाठी बंद केली. यानंतर अंतिम आदेशाची प्रतीक्षा करण्याऐवजी संबंधितांनी अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाविरोधात तत्कालीन अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले.

एसडीओंचा अंतिम निकाल अस्तित्वात नसताना दाखल झालेल्या या अपीलवर तब्बल ११ महिने सुनावण्या झाल्या. तक्रारदाराने या प्रक्रियेच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करत जोरदार आक्षेप घेतल्यानंतर अखेर अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकरणे विना अंतिम आदेश निकाली काढत तक्रारदाराचा अर्ज मंजूर केला.

यानंतरही वाद थांबलेला नाही. संबंधित लेआउटधारकांनी अकोट एसडीओंच्या अंतिम आदेशाची प्रतीक्षा करण्याऐवजी पुन्हा अप्पर आयुक्त (न्याय शाखा), अमरावती यांच्याकडे धाव घेतली. धक्कादायक बाब म्हणजे एसडीओंचा अंतिम आदेश अद्याप प्रलंबित असतानाच ही अपील याचिका सुनावणीसाठी स्वीकारण्यात आली असून त्यावर तारखांवर तारखा देणे सुरू झाले आहेत. त्यामुळे महसूल न्यायप्रक्रियेत आधी कनिष्ठ प्राधिकरणाचा अंतिम निर्णय होणे आणि त्यानंतर त्याविरुद्ध वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपील जाणे, या मूलभूत प्रक्रियेलाच येथे बगल देण्यात आली का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**अकृषकीकरणाच्या आदेशांवरही गंभीर आक्षेप-** या पाच प्रकरणांतील मूळ अकृषकीकरण आदेशांवरही तक्रारदाराने गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. नगररचना विभागाच्या अहवालानुसार काही ठिकाणी निवासी वापर अनुज्ञेय नसतानाही निवासी वापरासाठी अकृषकीकरण आदेश देण्यात आल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी औद्योगिक व वाणिज्यिक वापरासाठी कृषक जमिनींचा वापर बदलण्यात आला. नखेगाव, देवरी आणि केसोरी येथेही नियमबाह्य पद्धतीने जमीन वापरबदल करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. काही जमिनी ग्रीन झोनमध्ये असतानाही त्यांचे निवासी वापरासाठी अकृषकीकरण झाल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे, तर कुठे रस्ता गिळंकृत झाल्याचा आरोप, तर कुठे रस्त्यावरच प्लॉट टाकून विक्री केल्याचे प्रकार समोर आल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

**'अपील की वेळकाढूपणा?' हा कळीचा प्रश्न-**

एकाच प्रकरणात आधी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील, त्यावर तब्बल ११ महिने सुनावणी आणि त्यानंतर पुन्हा अप्पर उपायुक्तांकडे अपील. या घटनाक्रमामुळे संपूर्ण प्रकरणाच्या हेतूबाबतच प्रश्न उपस्थित होत आहेत. अंतिम आदेश होण्यापूर्वीच वारंवार वरिष्ठ प्राधिकरणांकडे धाव घेण्याच्या या प्रकारामुळे प्रकरणे लांबणीवर पडत असून, त्याचा थेट फायदा संबंधित लेआउटधारकांना होत असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

महसूल प्रकरणाचा अंतिम निकाल होण्याआधीच अपीलांची दारे उघडत असतील, तर महसूल न्यायप्रक्रियेतील अंतिमतेचे महत्त्व नेमके कुठे राहते? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर सखोल चौकशी करून, अंतिम आदेश प्रलंबित असताना अपील याचिका कोणत्या कायदेशीर निकषांवर दाखल करून घेण्यात आली, याची स्पष्टता करावी आणि नियमबाह्य प्रक्रिया आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदार विठ्ठल गावंडे यांनी केली आहे.

# युक्रेनचा रशियाच्या क्षेपणास्त्र निर्मिती कारखान्यावर हल्ला

**मास्को /वृत्तसंस्था :** युक्रेनने रशियाविरोधात युद्ध सुरू झाल्यापासूनचा आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला चढवला आहे. युक्रेनच्या सैन्याने रशियन राकेट सेंटर आणि एका लष्करी धावपट्टीला (एअरबेस) लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. युक्रेनने केलेल्या या भीषण हल्ल्यात रोस्तोव भागातील क्षेपणास्त्रे आणि राकेटसाठी घन इंधन (सालिड फयुएल) तयार करणारा मुख्य कारखाना उद्ध्वस्त झाला आहे. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी रात्रभरात ८२२ युक्रेनियन ड्रोन नष्ट केले, ज्यातील ६०० हून अधिक ड्रोनचा रोख राजधानी मास्कोच्या दिशेने होता. या हल्ल्यात रोस्तोव आणि मास्को परिसरात किमान ६ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. युक्रेनियन सैन्याने टेलिग्रामावर दिलेल्या माहितीनुसार, ही कंपनी मल्टिपल लाँच राकेट सिस्टीमसह विविध प्रकारच्या क्षेपणास्त्र प्रणाली आणि हवेत मारा करणा-या शस्त्रास्त्रांसाठी सालिड राकेट प्रोपेलेंट (घन इंधन) बनवते.



**तीन शहरांवर हल्-ला-** संबंधित भागाच्या राज्यपालांनी युक्रेनियन क्षेपणास्त्राने एका औद्योगिक युनिटला लक्ष्य केल्याचे सांगितले आहे. स्थानिक राज्यपाल युरी स्ल्यूसार यांनी माहिती दिली की, रशियाच्या नैऋत्येकडील रोस्तोव भागात तीन शहरांवर झालेल्या हल्ल्यात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर मास्को परिसरात एक युक्रेनियन ड्रोन एका खासगी घरावर आदळल्याने ८३ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला.

**लष्करी धावपट्टीवर थेट निशाणा-** युक्रेनियन सैन्याने रशियातील निजनी येथील लष्करी एअरबेसला लक्ष्य करू न त्याचे मोठे नुकसान केले आहे. याच एअरबेसवरू न रशियन लढाउ विमाने उड्डाण करू न युक्रेनवर हल्ले करत असत. युक्रेनने दावा केला आहे की, या हल्ल्यांमुळे रशियाच्या दोन्ही ठिकाणांना भीषण आग लागली आहे.

# देणगी चोरीवरून सरकार आणि सर्वोच्च न्यायालयात जुंपली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अयोध्येतील राम मंदिर देणगी चोरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणी वेळी एसआयटी तपासाबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आले. एका वकिलांनी एसआयटी आणि ट्रस्टच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह उभे केले. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की एसआयटी आम्ही गठीत केलेली आहे आणि ती न्यायालयास उत्तरदायी आहे. एसआयटीला त्यांच्या चौकशी रिपोर्ट न्यायालयाला सादर करावा लागेल. दरम्यान, केंद्र सरकारच्या वतीने युक्तिवाद करताना स?लिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, एसआयटीचा रिपोर्ट कोणत्याही अज्ञात पक्षकाराला देता येणार नाही.



सर्वोच्च न्यायालय म्हणाले एसआयटीला तपास अहवाल सादर करावा लागेल. याचिकाकर्त्यांबरोबरच लोकांनाही याची परवानगी आहे की, एसआयटीने आणखी कोणत्या बाबींचा तपास करायला हवा, हे ते सांगू शकतात. स?लिसिटर जनरल यांच्या कार्यालयात हे सल्ले पाठवण्यात यावेत. त्यानंतर ते एसआयटीकडे पाठवण्यात येतील. एसआयटी आपला तपास अहवाल सीलबंद पाकिटात सर्वोच्च न्यायालयाला सादर करेल. आधी आम्ही तो रिपोर्ट बघू आणि त्यानंतर ठरवू की, तर पक्षकारांसमोर ठेवायचा आहे की नाही असेही न्यायालय म्हणाले.

**केंद्र सरकारने काय म्हटले आहे?**

केंद्र सरकारच्या वतीने बाजू मांडताना स?लिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की सर्व निर्देशाचे पालन केले जात आहे. गुन्हेगारी प्रकरणाचा तपासाची माहिती फक्त पक्षकार, न्यायालय, पीडित आणि आरोपींना देता येउ शकतो. इतर बाहेरच्या कोणालाही देत येत नाही.

**प्रकरणाचा तपास सुरू -** सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, तपास स्थितीचा रिपोर्ट सीलबंद पद्धतीने न्यायालयाला सादर करण्यात आला आहे. अजून प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे आम्हाला सांगण्यात आले असून या प्रकरणाची सुनावणी पुढील तारीख देण्यात येत आहे. मागील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयानेच तपासाबद्दलचा रिपोर्ट मागवला होता. न्यायालयात चार याचिका दाखल असन, यात एक सीबीआयकडून स्वतंत्रपणे तपास करणे, श्रीराम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या आर्थिक व्यवहाराची कॅग ऑडिट करणे, ट्रस्टच्या आर्थिक व्यवहाराच्या सर्व नोंदी सुरक्षित ठेवणे आणि तपास पूर्ण होईपर्यंत मोठे आर्थिक निर्णय घेण्यास बंदी घालण्याच्या मागण्या या याचिकांमधून करण्यात आलेल्या आहेत.

# शाळांमध्ये फोटो, व्हीडीओ आणि प्रवेशावर पूर्ण बंदी

**जयपूर /वृत्तसंस्था :** राजस्थानमधील सरकारी शाळांमध्ये शिक्षकांची टंचाई आणि मूलभूत सुविधा नसल्यामुळे सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. शिक्षण विभागाने जारी केलेल्या नव्या आदेशानुसार, आता मुख्याध्यापकांच्या परवानगीशिवाय कोणत्याही बाहेरील व्यक्तीला शाळा परिसर, वर्ग किंवा वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही. याशिवाय, शाळांमध्ये फोटोग्राफी आणि व्हीडीओग्राफी पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

क?करोच जनता पार्टीने रविवारी सकाळी राज्यातील सरकारी शाळांच्या दुरवस्थेची पाहणी करण्यासाठी राज्यव्यापी स्कूल ठीक करो अभियान सुरू करण्याची घोषणा केली होती. या घोषणेनंतर काही तासांतच रविवारी संध्याकाळी शिक्षण विभागाने हे परिपत्रक जारी केले. काकरोच जनता पार्टी पक्षाचे सह-संयोजक आणि राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांनी याबाबत घोषणा केली होती. जयपूर, अजमेर, जोधपूर, उद्भयपूर, धोलपूर, भरतपूर, कोटा, बाडमेर आणि हनुमानगड या ९ जिल्ह्यांमधून शाळांच्या खराब परिस्थितीबाबत तक्रारी आल्या आहेत. प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने पुढील काही दिवसांत आम्ही स्वत: य शाळांची पाहणी करणार आहोत.



शुक्रवारी अलवर जिल्ह्यातील ठाणागाजी येथील एका सरकारी शाळेत झालेल्या आंदोलनापासून या अभियानाची सुरु वात झाली आहे असे रांका यांनी सांगितले. राज्यातील ८० हजार जीर्ण वर्गांच्या दुरु स्तीचा आराखडा सादर न झाल्यास शिक्षण मंर्त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करण्याचा इशारा पक्षाने दिला आहे.

**नव्या नियमावलीत काय?**

मुख्याध्यापक किंवा संस्थाप्रमुखांच्या लेखी परवानगीशिवाय कोणालाही प्रवेश मिळणार नाही. केवळ शासकीय कामासाठी आलेल्या अधिकृत अधिका-यांना यातून सूट असेल. तसेच सर्व भेट देणा-या व्यक्तींना स्वत:च्या माहितीची नोंद रजिस्टरमध्ये करणे अनिवार्य असणार आहे. वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय, वसतिगृह, क्रीडांगण आणि शौचालय अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना एकटे भेटता येणार नाही. तिथे मुख्याध्यापक किंवा शिक्षक असणे गरजेचे आहे. चित्रीकरण व मुलाखतींवर बंदी: विद्यार्थ्यांचे किंवा शिक्षकांचे फोटो, व्हीडीओ, ऑडिओ रेकार्डिंग, मुलाखती, लाइव्ह स्ट्रीमिंग करण्यासाठी मुख्याध्यापकांची पूर्वपरवानगी आवश्यक असणार आहे.

**नियम मोडल्यास पोलिस कारवाई-** शाळेची सुरक्षा, शिस्त आणि शैक्षणिक वातावरणावर परिणाम होत असल्याचे आढळल्यास मुख्याध्यापकांना कोणत्याही व्यक्तीला प्रवेश नाकारण्याचा पूर्ण अधिकार देण्यात आला आहे. अनधिकृतपणे प्रवेश करणा-या, व्हीडीओ काढणा-या किंवा कामात अडथळा आणणा-या व्यक्तींविरोधात पोलीस आणि जिल्हा शिक्षण अधिका-यांकडे तक्रार करू न कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# आता दिमागी नक्षल पार्टी ची हवा

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंर्त्यादिनाच्या भाषणात दिमागी नक्षल (बौद्धिक नक्षलवाद) या शब्दाचा उल्लेख केल्यानंतर सोशल मीडियावर याचे मोठे पडसाद उमटत आहेत. इन्स्टाग्रामवर रातोरात तयार झालेल्या दिमागी नक्षल पार्टी नावाच्या अकाउंटने अवघ्या २४ तासांत १.६ लाखांहून अधिक फालोअर्सचा टप्पा ओलांडला आहे. इन्स्टाग्रामावरील माहितीनुसार, हे अकाउंट याच महिन्यात सुरू करण्यात आले असून यापूर्वी त्याचा युझरनेम एकदा बदलण्यात आला आहे. सध्या या अकाउंटवर ६२ पोस्ट्स असून ते ३५ जणांना फॅलो करत आहे. मात्र, हे अकाउंट नक्की कोण चालवत आहे, याची कोणतीही माहिती समोर आलेली नाही.




**काय म-हणाले होते पंतप्रधान मोदी?-** स्वातंर्त्यदिनाच्या भाषणात पंतप्रधानांनी माओवादाविरोधातील कारवाईचा उल्लेख करताना म्हटले होते, आम्ही जंगलातील सशस्त्र नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात यश मिळवले असून देशाला या संकटातून मुक्त केले आहे. मात्र, सशस्त्र नक्षलवादी गेले असले, तरी दिमागी नक्षल अजूनही सक्रिय आहेत


**मोदींच्या वक्तव्यानंतर नवीन अकाउंट-** पंतप्रधानांच्या या विधानानंतर सोशल मीडिया प्लॅटफार्म (पूर्वीचे ट्विटर) वर दिमागी नक्षल जनता पार्टी नावाचे नवीन अकाउंट तयार झाले. हे अकाउंट सध्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव, आपचे नेते अरविंद केजरीवाल, युट्यूबर ध्रु व राठी, हास्यकलाकार कुणाल कामरा, अभिनेते प्रकाश राज आणि फॅक्ट-चेकर मोहम्मद झुबेर यांच्यासह १३ प्रमुख अकाउंट्सना फॉलो करत आहे.

**प्रकाश राज यांची पोस्ट रिट्विट-** दिमागी नक्षल जनता पार्टी या अकाउंटवरू न अभिनेता प्रकाश राज यांची एक पोस्ट रिट्विट करण्यात आली आहे. यात प्रकाश राज यांनी लिहिले होते, दिमागी बना.. मूर्ख बनू नका. प्रश्न विचारा.. गुलामगिरी करू नका. दरम्यान, पंतप्रधानांच्या विधानावरू न राजकीय वाद पेटला असून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी, मला दिमागी नक्षल असल्याचा अभिमान आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे.

**किरेन रिजिजू यांनी दिले होते स्पष्टीकरण-** केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी पंतप्रधानांच्या वक्तव्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सांगितले की, पंतप्रधानांनी विरोधी पक्षनेत्यांना थेट दिमागी नक्षल म्हटलेले नाही. हा शब्द अशा लोकांसाठी वापरला गेला आहे जे माओवाद्यांचे समर्थन करतात, तसेच भारतीय संविधानाचा अनादर करतात, फुटीरतावाद्यांची बाजू घेतात किंवा ईशान्य भारताला उर्वरित भारतापासून वेगळे करणा-या चिकन नेक भागाची नाकेबंदी करण्याचे समर्थन करतात. रिजिजू यांनी शरजील इमाम यांच्या चिकन नेकबाबतच्या जुन्या वक्तव्याचा व्हीडीओ शेअर करत, अशा विचारसरणीला पाठिंबा देणारे लोकच दिमागी नक्षल असल्याचे म्हटले होते.

# इमरान हाश्मीच्या 'आवारापन २'चा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

**मुंबई :** इमरान हाश्मीचा 'आवारापन २' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करत आहे. रिलीजपूर्वीच या चित्रपटाची चांगली चर्चा होती आणि थिएटरमध्ये दाखल होताच जोरदार कमाई केली आहे. अवघ्या तीन दिवसांत चित्रपटाने ८२ कोटी रुपयांची नेट कमाई केली आहे. विशेष म्हणजे 'आवारापन २'ने सनी देओलच्या बंटवारा १९४७लाही कमाईच्या बाबतीत मागे टाकल्याचे सांगितले जात आहे. 'आवारापन २'ने पहिल्याच दिवशी २२ कोटी रुपयांची कमाई केली. दुस-या दिवशी चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली आणि तब्बल ३३.७५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. तिस-या दिवशी म्हणजेच रविवारी चित्रपटाच्या कमाईत दुस-या दिवसाच्या तुलनेत काहीशी घट झाली. मात्र तरीही चित्रपटाने चांगली कमाई केली. सॅकनिल्कच्या अर्ली ट्रेंड रिपोर्टनुसार, 'आवारापन २'ने रविवारी २६.५ कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे तीन दिवसांतील चित्रपटाची एकूण नेट कमाई ८२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. 'आवारापन २'ने ओपनिंग वीकेंडच्या कमाईत अजय देवगणच्या धमाल ४ला मागे टाकले आहे. धमाल ४ने ओपनिंग वीकेंडमध्ये ६७.२१ कोटी रुपयांची कमाई केली होती.'आवारापन २' ने तीन दिवसांत ८२ कोटींची कमाई करत यावर्षीच्या सर्वाधिक ओपनिंग वीकेंड कमाई करणा-या चित्रपटांच्या यादीत तिसरे स्थान मिळवले आहे. यादीत धुरंधर २ ४६६ कोटी रुपयांसह पहिल्या क्रमांकावर, तर बार्डर २ १२९.८९ कोटी रुपयांसह दुस-या क्रमांकावर आहे. तीन दिवसांत ८२ कोटींचा टप्पा पार केल्यानंतर आता 'आवारापन २' १०० कोटींच्या क्लबच्या जवळ पोहोचला आहे. चित्रपटाची सध्याची कमाई पाहता लवकरच तो १०० कोटींचा टप्पा पार करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# राजकारणातील भाषेची घसरती पातळी

भारतीय राजकारणात विरोधकांवर टीका आणि उपरोधिक टोमणे मारणे ही काही नवीन गोष्ट नाही. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वैचारिक संघर्ष नेहमीच राहिला आहे. नेत्यांनी एकमेकांच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अनेकदा तीव्र शब्दांत ताशेरेही ओढले आहेत; पण त्या भाषेला एक मर्यादा होती. शब्द जिव्हारी लागायचे; पण ते अपमानकारक नसायचे. उपरोधाला धार असायची; पण त्यात वैयक्तिक द्वेष क्वचितच दिसून येत असे. नेता आपल्या विरोधकाला कोंडीत पकडायचा; पण राजकारणाचा हा लढा संपल्यानंतर आपल्याला त्याच सभागृहात एकत्र बसायचे आहे, याची जाणीव त्यांना असायची. आजच्या काळात हे चित्र वेगाने बदलत आहे. राजकारणातील भाषेचा स्तर सातत्याने खाली जात आहे. निवडणूक सभांपासून ते दूरचित्रवाणीच्या (टीव्ही) चर्चेपर्यंत आणि सोशल मीडियापासून संसदेपर्यंत अशी भाषा ऐकायला मिळायला लागली आहे, जी कुटुंबासोबत बसून ऐकणे कठीण होते. अनेकदा असे वाटते की, राजकीय विरोध आता विचारांचा संघर्ष राहिलेला नाही, तर एकमेकांना खाली पाडण्याची स्पर्धा बनला आहे. नेता जेवढा आक्रमक आणि वैयक्तिक हल्ला करतो, तेवढाच तो सोशल मीडियावर प्रसारित केला जातो. ज्या वाक्याचा उच्चार करण्यापूर्वी नेता पूर्वी अनेक वेळा विचार करायचा, आज तेच वाक्य कॅमेऱ्यासमोर बोलताना त्याला अजिबात संकोच वाटत नाही. यामुळे पक्षांतर्गतही त्याचे महत्त्व वाढत जाते. या नेत्यांकडे अशा प्रकारे आदराने पाहिले जाते, जणू काही त्यांनी दुसऱ्या देशाच्या सैन्याचा संपूर्ण बीमोड केला आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, ही प्रवृत्ती आता संसदेपर्यंत पोहोचली आहे. संसद ही ती जागा आहे जिथे देशाची धोरणे ठरतात. संविधान, कायदा, अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, सुरक्षा, शिक्षण आणि सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित प्रश्नांवर येथे चर्चा होते. देशातील कोटी लोक संसदेचे कामकाज पाहतात. अशा स्थितीत सभागृहात वापरला जाणारा प्रत्येक शब्द केवळ तिथे बसलेल्या खासदारांपुरताच मर्यादित राहत नाही, तर तो थेट जनतेपर्यंत पोहोचतो. संसदेच्या कामकाजादरम्यान एखाद्या सदस्याचे असंसदीय शब्द नंतर कामकाजातून वगळले जातात. परंतु, थेट प्रक्षेपण (लाईव्ह ब्रॉडकास्ट) सुरू असताना ते शब्द लाखांपर्यंत पोहोचलेले असतात. त्यानंतर सोशल मीडियाचा जमाना आहे. एखादा शब्द कामकाजातून वगळणे म्हणजे त्याचा प्रभाव संपवणे नव्हे. तो व्हिडीओ क्लिपच्या स्वरूपात सोशल मीडियावर फिरत राहतो. कोटी लोकांपर्यंत पोहोचतो. अशाप्रकारे अधिकृत रेकॉर्डमधून शब्द निघून जातो; पण लोकांच्या स्मृतीतून आणि डिजिटल जगतातून तो जात नाही. पावसाळी अधिवेशनादरम्यान संसदेत 'लापता', 'तडीपार' आणि 'अय्याश' यांसारख्या शब्दांवरून वाद निर्माण झाला आहे. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल 'अय्याश' या शब्दाचा वापर केला. त्यांनी आपल्या पुस्तकाचा हवाला देत ही टिप्पणी पुन्हा उच्चारली. यावरून सभागृहात राजकीय गदारोळ झाला. सत्ताधारी पक्षातील कोणाही नेत्याने निशिकांत दुबे यांना असे करण्यापासून रोखले नाही. उलट त्याचे कौतुकच केले. संसदेत माजी पंतप्रधानांविरुद्ध अशा शब्दाचा वापर करणे कोणीही व्यक्ती योग्य ठरवू शकत नाही. याचे समर्थन करणारे कदाचित असे म्हणू शकतात की, विरोधकांच्या धोरणांवर टीका करणे हा आमचा अधिकार आहे. कोणत्याही पंतप्रधानांच्या धोरणांचा आणि निर्णयांचा निषेध करणे हा लोकशाहीचा अधिकार आहे; परंतु टीका आणि वैयक्तिक अपमान यामध्ये फरक असतो. कोणत्याही माजी पंतप्रधानांसाठी अशा भाषेचा वापर केल्याने राजकीय वाद-संवाद मजबूत होऊ शकत नाही. हीच गोष्ट आजच्या सर्व नेत्यांना लागू होते. मग, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत किंवा विरोधी पक्षनेते राहुल गांधी. सोनिया गांधी असोत किंवा अमित शहा. कोणत्याही पक्षाचा मुख्यमंत्री असो वा एखादा खासदार. पदाची गरिमा व्यक्तीपेक्षा मोठी असते. व्यक्तीशी राजकीय मतभेद असू शकतात; परंतु घटनात्मक पदाच्या गरिमेचा सन्मान करणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. भारतीय राजकारणात उपरोधाची एक उत्तम परंपरा राहिली आहे. अटलबिहारी वाजपेयी हे याचे सर्वोत्तम उदाहरण मानले जातात. त्यांच्या भाषणांमध्ये विरोधकांवर टीका करण? याची धारदेखील असायची आणि विनोदही असायचा. ते समोरच्याला चोख उत्तर द्यायचे; पण भाषा अशाप्रकारे ठेवायची की, मुद्दाही पोहोचेल आणि सभागृहाची प्रतिष्ठाही कायम राहील. वाजपेयींच्या राजकारणाचा हाच पैलू आजच्या नेत्यांसाठी शिकण्यासारखा आहे. ते जाणत होते की, शब्द केवळ हल्ला करण्यासाठी नसतात. शब्दांच्या माध्यमातून सूचक संदेशही देता येतो. अनेकदा एकच वाक्य संपूर्ण भाषणापेक्षा अधिक प्रभावी ठरते. याच संदर्भातील एक जुना राजकीय प्रसंग आहे. एकदा राहुल गांधी परदेशात काही अडचणीत सापडले होते. सोनिया गांधींनी वाजपेयींना फोन केला होता. त्यांनी तत्काळ मदत केली आणि राहुल गांधींना त्या संकटातून बाहेर काढले. या गोष्टीला बराच काळ लोटल्यानंतर जेव्हा प्रमोद महाजन यांचे सुपुत्र मोठ्या संकटात सापडले, तेव्हा अटलबिहारी वाजपेयींनी संसदेत आपल्या भाषणादरम्यान इशारे-इशारेमध्ये फक्त एकच ओळ वापरली, ज्याचा शब्दार्थ सोनिया गांधी चटकन समजून गेल्या. ते एवढेच म्हणाले होते की, 'लहान मुले आहेत, चुका होत असतात.' त्यांच्या या बोलण्यानंतर प्रमोद महाजन यांचे सुपुत्र सर्व संकटांतून सहीसलामत बाहेर आले. भाषणाच्या या पद्धती आणि विरोधकांपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी वापरली जाणारी भाषा आजच्या नेत्यांना शिकण्याची गरज आहे. वाजपेयींना हवे असते, तर त्यांनी सभागृहात सोनिया गांधींच्या सुपुत्राला मदत केल्याचा संपूर्ण उल्लेख केला असता. तिकडे सोनिया गांधी किंवा त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना हवे असते, तर त्यांनी प्रमोद महाजन यांच्या सुपुत्राच्या संकटाची सभागृहात चर्चा करून त्याचे राजकीय हत्यार बनवले असते; पण दोन्ही बाजूंनी तसे झाले नाही. निवडणूक राजकारणात भाषा खालावत चालल्याची मोठी यादी आहे. नरेंद्र मोदींच्या विरोधात काँग्रेस नेत? यांकडून 'मौत का सौदागर', 'जहरीला सांप', 'पनौती' आणि 'चौकीदार चोर है' यांसारखे शब्द आणि घोषणा वेगवेगळ्या राजकीय टप्प्यांवर वादाचे विषय ठरल्या आहेत. दुसरीकडे भाजपकडून विरोधी नेत्यांसाठी 'पप्पू', 'शहजादा', 'भ्रष्टाचारी', 'देशद्रोही', 'टुकड़े-टुकड़े गँग' यांसारख्या राजकीय विशेषणांचा वापरही दीर्घकाळापासून होत आला आहे. सत्ताधारी पक्षाचे समर्थक असोत वा विरोधकांचे समर्थक, दोन्ही बाजूंनी शिवीगाळ करणे हाच राजकीय युक्तिवादाचा पर्याय बनवला गेला आहे. समस्या केवळ हीच नाही की, नेते एकमेकांसाठी वाईट शब्दांचा वापर करत आहेत. त? यामुळे राजकीय भाषा हळूहळू समाजाची भाषा बनत चालली आहे. नेते जे बोलतात, त्यांचे समर्थक त्याचे अनुकरण करतात. सोशल मीडियावर तीच भाषा अधिक आक्रमक स्वरूपात समोर येते. त्यानंतर राजकारण आणि समाज यामधील अंतर कमी होत जाते. जी भाषा पूर्वी केवळ राजकीय मंचापर्यंत सीमित होती, ती घरे, शाळा, विद्यापीठे आणि सार्वजनिक संवादाचा भाग बनू लागली आहे. दूरचित्रवाणीवरील राजकीय चर्चांनी या समस्येत आणखी भर घातली आहे. सोशल मीडियाने या प्रवृत्तीला आणखी ताकद दिली आहे. लोकशाहीची ताकद यात आहे की, मतभेद असूनही संवाद सुरू राहावा. म्हणूनच राजकारणाला पुन्हा एकदा भाषेच्या मर्यादेकडे परतण्याची गरज आहे. विरोधकाला हरवण्यासाठी शिवीची गरज नसते, युक्तिवाद पुरेसा असतो. भाषेत सुबुद्धता असेल, तर एकच वाक्य बरेच काही सांगून जाते. संसदेत एखाद्या नेत्याला लहान दाखवण्यासाठी वैयक्तिक टीकेची गरज नसते. त्याची धोरणातील त्रुटीच पुरेशी असते.



# सुशिक्षित बेरोजगारांचा वाली कोण?

सुशिक्षित बेरोजगारांचा वाली कोण? पदवी घेऊनही रोजगार न मिळणारा तरुण अखेर बाइक टॅक्सी चालवतो, ॲप आधारित डिलिव्हरी करतो किंवा टेलिकॉलिंगसारख्या तात्पुरत्या कामात आयुष्य ढकलतो. तरुणाईला सन्मानाने जगता येईल असे रोजगार निर्माण करण्याची योजना नाही. सुशिक्षित बेरोजगारांचा वाली कोण? पदवी घेऊनही रोजगार न मिळणारा तरुण अखेर बाइक टॅक्सी चालवतो, ॲप आधारित डिलिव्हरी करतो किंवा टेलिकॉलिंगसारख्या तात्पुरत्या कामात आयुष्य ढकलतो. तरुणाईला सन्मानाने जगता येईल असे रोजगार निर्माण करण्याची योजना नाही.

अझीम प्रेमजी विद्यापीठाने नुकताच प्रसिद्ध केलेला 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२६' हा अहवाल केवळ आकडेवारीचा गुच्छ नाही, तर तो भारताच्या तथाकथित 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'च्या फुग्याला टोचणारी सुई आहे. गेली अनेक वर्षे केंद्र सरकार जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताचे कौतुक करत आले, पण याच तरुणाईच्या हातांना काम देण्यात सरकार किती सपशेल अपयशी ठरले, याचा हा अहवाल आरसा आहे. विद्यापीठाच्या संशोधकांनी मांडलेली आकडेवारी वाचली की एक प्रश्न उभा राहतो- देशातील कोट्यवधी सुशिक्षित तरुणांचा वाली आहे तरी कोण?

अहवालानुसार, २०२३ मध्ये वीस ते एकोणतीस वयोगटातील बेरोजगार तरुणांमध्ये पदवीधरांचे प्रमाण तब्बल ६७ टक्क्यांवर पोहोचले आहे. २००४ मध्ये हेच प्रमाण अवघे ३२ टक्के होते. म्हणजे गेल्या दोन दशकांत बेरोजगारांमधील पदवीधरांचे प्रमाण दुपटीहून अधिक वाढले. आणखी धक्कादायक बाब म्हणजे १९८३ मध्ये देशात वीस ते एकोणतीस वयोगटातील पदवीधर तरुणांची संख्या जेमतेम पन्नास लाख होती, ती आज सहा कोटी ३० लाखांवर पोहोचली आहे, म्हणजे चार दशकांत तेरा पटींनी वाढ. शिक्षणाचा हा विस्तार वरवर पाहता अभिमानास्पद वाटतो, पण या शिक्षणाला रोजगाराची जोड मिळालीच नाही, हे या अहवालाचे सर्वात भेदक निरीक्षण आहे. संशोधकांनी नोंदवल्याप्रमाणे, २००४-२००५ ते २०२३ या कालावधीत दरवर्षी सरासरी पन्नास लाख पदवीधर बाजारात दाखल होत असताना, त्यांपैकी जेमतेम २८ लाखांनाच काम मिळाले आणि त्याहूनही कमी जणांना कायमस्वरूपी पगारी नोकरी मिळाली. पुरुष पदवीधरांपैकी अवघे साडेसहा ते सात टक्के तरुणांना पदवी घेतल्यानंतर एका वर्षाच्या आत कायमस्वरूपी पगारी नोकरी मिळते आणि पांढरपेशा म्हणजे कार्यालयीन नोकरी मिळणाऱ्यांचे प्रमाण तर अवघे साडेतीन टक्के आहे. वीस ते पंचवीस वयोगटातील पदवीधरांमधील बेरोजगारीचे प्रमाण जवळपास ४० टक्क्यांवर आहे, तर पंचवीस ते एकोणतीस वयोगटात ते २० टक्क्यांच्या घरात आहे. ही आकडेवारी केवळ संख्याशास्त्र नाही, ही करोडो कुटुंबांतील स्वप्नांची राखरांगोळी आहे.

ही आकडेवारी नवी नाही. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि इन्स्टिट्यूट ऑफ ह्यूमन डेव्हलपमेंट यांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केलेल्या 'इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४'मध्येही असेच धक्कादायक चित्र समोर आले होते- देशातील एकूण बेरोजगारांमध्ये तरुणांचे प्रमाण ८३ टक्के इतके प्रचंड आहे आणि माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांचे बेरोजगारांमधील प्रमाण २००० मधल्या पस्तीस टक्क्यांवरून २०२२ मध्ये ६५३ वर गेले आहे. दोन वेगवेगळ्या संस्थांचे, दोन वेगवेगळ्या वर्षांचे अहवाल एकाच निष्कर्षाप्रत येतात, तेव्हा हा योगायोग नसून तो एक संरचनात्मक आजार आहे, हे मान्य करावेच लागेल.

### नोकरी मिळते, पण पगार किती?

आता प्रश्न असा येतो की, ज्यांना नोकरी मिळतेच, त्यांना नेमका किती पगार मिळतो? सरकारी नोकरीचे आकर्षण आजही कायम आहे, कारण तिथे नोकरीची शाश्वती, निवृत्तीवेतन आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळते. पण याच सरकारी भरतीच्या जाहिराती पाहिल्या की वास्तव समोर येते. बँकिंग क्षेत्रातील प्रशिक्षणार्थी पदांसाठी महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपये स्टायपेंड दिला जातो, तर अनेक तांत्रिक सहाय्यक व कनिष्ठ अधिकारी पदांचे पगार महिन्याला पंचाहत्तर हजार ते सव्वा लाखांच्या घरात जाहिरातींमध्ये दाखवले जातात, पण अशा जागा हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच असतात आणि त्यासाठी लाखो अर्जदार रांगेत उभे असतात. दुसरीकडे खासगी क्षेत्रात, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रांत नवख्या अभियंत्यांनाही सुरुवातीलाच लाखांच्या घरात पॅकेज मिळू शकते, हे खरे आहे. पण हे चित्र देशाच्या अवघ्या मूठभर आयटी हब शहरांपुरते आणि मूठभर उच्चशिक्षित अभियंत्यांपुरतेच मर्यादित आहे.

### भांडवल उभारणाऱ्यांचे उखळ पांढरे

फेब्रुवारी २०२६ मध्ये देशभरातील या कंपन्यांच्या चालकांनी पुकारलेला संप हा या असंतोषाचा उद्रेक होता. चालक संघटनांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार, सरासरी चालकाची रोजची कमाई जेमतेम आठशे ते हजार रुपयांच्या घरात आहे. इंधनाचा भडकलेला दर सुमारे शंभर रुपये प्रति लिटर आणि वाहनाच्या देखभालीवर होणारा जवळपास ३० टक्के खर्च वजा केला, तर अनेक चालकांच्या हाती महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपयांपेक्षा जास्त काहीच उरत नाही. फेअरवर्क इंडिया या संस्थेने २०२५ मध्ये दिलेल्या अहवालात उबर आणि ओला या दोन्ही कंपन्यांना न्याय्य वेतनाच्या निकषावर नापास म्हणजे 'एफ' श्रेणी दिली होती आणि ८५३चालक रोज दहा तासांहून अधिक राबूनही जेमतेम तुटपुंजी कमाई करत असल्याचे नोंदवले होते. याउलट, ओला कंपनीने स्वतः आर्थिक वर्ष २०२४ मध्ये चार हजार कोटी रुपयांचे कमिशन कमावल्याचे तिच्याच आर्थिक विवरणपत्रांत नमूद आहे, तर उबर इंडियाने २०२४ मध्ये दोन अब्ज डॉलरची उलाढाल केली. म्हणजे भांडवल गुंतवणाऱ्या कंपन्यांचे उखळ पांढरे होत असताना, रस्त्यावर राबणाऱ्या चालकाच्या ताटात मात्र उपासमारीचे तुकडे उरतात. नीती आयोगाच्या २०२२ च्या अंदाजानुसार देशातील गिग अर्थव्यवस्थेत सुमारे ८० लाख कामगार आहेत आणि २०३० पर्यंत ही संख्या अडीच कोटींवर जाण्याचा अंदाज आहे. याचाच अर्थ उद्याच्या भारतातील बेरोजगार पदवीधरांचा मोठा वाटा मग तो अभियंता असो, वाणिज्य पदवीधर असो वा कला शाखेचा विद्यार्थी याच असुरक्षित, कुठलेही सामाजिक संरक्षण नसलेल्या गिग कामात ढकलला जाणार आहे.

### बेरोजगारी का वाढतेय?

मग तरुण बेरोजगारीचा हा डोंगर एवढा का रचला गेला? याचे पहिले कारण म्हणजे देशाच्या आर्थिक वाढीचा वेग आणि रोजगारनिर्मितीचा वेग यांच्यातील ठळक विसंगती. आयआयएम लखनौचे अर्थतज्ज्ञ डी. त्रिपती राव यांच्या अभ्यासाने हे स्पष्ट केले आहे की, २००४-०५ ते २०१८-१९ या कालखंडात देशाची अर्थव्यवस्था 'जॉबलेस ग्रोथ' म्हणजे रोजगारविरहित वाढ या टप्प्यातून गेली. जीडीपीचे आकडे उंचावत गेले, पण त्याच वेगाने नोकऱ्या निर्माण झाल्या नाहीत. दुसरे कारण म्हणजे उच्च शिक्षणाचा झालेला अनिर्बंध विस्तार. २००४ मध्ये देशातील अवघे १०३ तरुण पदवीधर होते, २०२३ पर्यंत हे प्रमाण अठ्ठावीस टक्क्यांवर गेले. महाविद्यालये आणि तथाकथित 'डीम्ड युनिव्हर्सिटी'चे पीक सर्वत्र आले, पण त्यातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांना रोजगारक्षम बनवणारे कौशल्य शिक्षण मात्र कागदावरच राहिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये मोठा गाजावाजा करत सुरू केलेली 'स्कील इंडिया मिशन' आजही आपले उद्दिष्ट साध्य करू शकलेली नाही आणि 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमानेही रोजगारनिर्मितीत अपेक्षित भर घातलेली नाही, हे या अहवालातील आकडेवारीच सिद्ध करते. तिसरे कारण म्हणजे औपचारिकीकरणाचा अभाव म्हणजे इन्फॉर्मलायझेशन. देशातील जवळपास नव्वद टक्के कामगार अनौपचारिक क्षेत्रात राबतात, जिथे कुठलीही सामाजिक सुरक्षा, भविष्यनिर्वाह निधी किंवा किमान वेतनाची हमी नसते. २०१९ मध्ये संमत झालेल्या 'कोड ऑन वेजेस' कायद्याने आणि २०२० च्या मोटार वाहन ॲग्रिगेटर मार्गदर्शक तत्त्वांनी गिग कामगारांना काहीएक संरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते, पण अंमलबजावणी शून्यवत राहिली.

**हर्षल प्रधान**

## अमृतमहोत्सव ते जागतिक गौरव

भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा उत्साह यंदा केवळ देशाच्या सीमांपुरता मर्यादित न राहता सातासमुद्रापार जागतिक स्तरावर अत्यंत दिमाखदार पद्धतीने पाहायला मिळाला. अमेरिका, युरोप, आखाती देश आणि ऑस्ट्रेलियापर्यंत सर्वत्र अनिवासी भारतीय समुदायाने स्थानिक नागरिकांसह एकत्र येत हा राष्ट्रीय सण साजरा केला. अमेरिकेतील न्यूजर्सी येथे नोंदवला गेलेला आगळावेगळा गिनीज विश्वविक्रम आणि जगातील प्रमुख ऐतिहासिक वास्तूंवर झालेली तिरंगी रोषणाई यामुळे भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाची व सांस्कृतिक ऐक्याची साक्ष जगाला मिळाली. न्यूयॉर्क त्रि-राज्यीय क्षेत्रात यंदाचा स्वातंत्र्यदिन अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरला. भारताचा स्वातंत्र्यदिन आणि अमेरिकेच्या स्थापनेची २५० वर्षे पूर्ण झाल्याचे ऐतिहासिक औचित्य साधून न्यूजर्सीतील वेटरन्स मेमोरियल पार्कमध्ये एका भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ऐतिहासिक विक्रम: या उद्यानात १,३०० हून अधिक अमेरिकी ध्वजांची अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मांडणी करून '२५०' हा आकडा साकारण्यात आला. या भव्य आकड्याच्या भोवती भारताचे राष्ट्रध्वज तिरंगा अत्यंत सन्मानाने आणि आकर्षकरीत्या फडकवण्यात आले. ध्वजदंडांच्या साहाय्याने साकारण्यात आलेल्या जगातील सर्वांत मोठ्या संख्येचा गिनीज विक्रम म्हणून याची अधिकृत नोंद झाली. प्रवासी भारतीय व टेक क्षेत्राचा पुढाकार: न्यूयॉर्कमधील भारतीय महावाणिज्य दूतावास आणि स्थानिक प्रवासी भारतीय संघटनांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. आघाडीची भारतीय टेक कंपनी 'झोहो' ने या ऐतिहासिक उपक्रमाला विशेष सहकार्य दिले. महापौर जोहरान ममदानींचा सहभाग: फ्लोरल पार्क येथे आयोजित 'क्वीन्स भारत दिवस परेड'मध्ये न्यूयॉर्क शहराचे महापौर जोहरान ममदानी यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. त्यांनी सोशल मीडियावर स्वतःचा उल्लेख न्यूयॉर्क शहराचा पहिला भारतीय-अमेरिकी महापौर असा करत भारत आणि अमेरिकेतील सांस्कृतिक बंधांवर भर दिला. टाइम्स स्क्वेअर ते एम्पायर स्टेट बिल्डिंग: टाइम्स स्क्वेअर येथे फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन्सतर्फे भारताचा सांस्कृतिक वारसा दर्शवणारे पारंपरिक नृत्य व संगीत कार्यक्रम पार पडले. तसेच न्यूयॉर्कमधील जगप्रसिद्ध एम्पायर स्टेट बिल्डिंग आणि बोस्टनमधील प्रुडेंशियल सेंटर या गगनचुंबी वास्तू तिरंग्याच्या तीन रंगांमध्ये उजळून निघाल्या.

आखाती देशांपासून युरोप-ऑस्ट्रेलियापर्यंत तिरंग्याची शान

अमेरिकेतील या ऐतिहासिक विक्रमाच्या बरोबरीने जगातील इतर प्रमुख देशांमध्येही भारताचा स्वातंत्र्यदिन मोठ्या दिमाखात साजरा झाला: संयुक्त अरब अमिराती : दुबईतील जगातील सर्वांत उंच इमारत बुर्ज खलिफा संपूर्ण भारतीय तिरंग्याच्या रंगांमध्ये प्रकाशित करण्यात आली. अबुधाबीतील 'अ?ॅडनॉक' मुख्यालयावर भव्य डिजिटल तिरंगी रोषणाई करण्यात आली. दुबई व अबुधाबीमध्ये अनिवासी भारतीयांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र येत राष्ट्रगीत गायले. कॅनडा: टोरांटो येथील प्रसिद्ध सीएन टॉवर आणि जगप्रसिद्ध नायगरा फॉल्स तिरंग्याच्या तीन रंगांत न्हाऊन निघाले. टोरंटो आणि व्हँकुव्हर शहरांमध्ये हजारो नागरिकांच्या उपस्थितीत भव्य 'इंडिया डे परेड' आणि सांस्कृतिक रॅलीचे आयोजन करण्यात आले. युनायटेड किंगडम : लंडनमध्ये इंडिया हाऊस येथील भारतीय उच्चायुक्तालयात ध्वजारोहण करण्यात आले. लंडन आय परिसरात स्थानिक नागरिक आणि अनिवासी भारतीयांनी तिरंगा रॅली काढून देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन केले. ऑस्ट्रेलिया: सिडनी हार्बर आणि सिडनी ऑपेरा हाऊस परिसरात भारतीय समुदायाने भव्य तिरंगा यात्रा काढली. मेलबर्न, ब्रिस्बेन आणि कॅनबेरा शहरांमध्ये भारताच्या विविध राज्यांतील लोककला, पारंपारिक वेशभूषा आणि खाद्यसंस्कृतीचे प्रदर्शन करणारे महोत्सव आयोजित केले गेले. रशिया व इस्त्रायल: मॉस्कोमधील भारतीय दूतावासात भारतीय समुदाय आणि रशियन नागरिकांच्या उपस्थितीत ध्वजारोहण सोहळा झाला. तेल अवीव येथे भारतीय राजदूत आणि तेथील भारतीय वंशाच्या ज्यू नागरिकांनी एकत्र येत भारत-इस्त्रायल मैत्रीचा संदेश दिला.

विविध देशांतील स्थानिक प्रशासनांचा सक्रिय सहभाग, परदेशी नेतृत्वाची उपस्थिती आणि ऐतिहासिक जागतिक वास्तूंवर झळकलेला तिरंगा हे भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रभावाची साक्ष देतात. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय जीवनदृष्टी प्रत्यक्ष कृतीत उतरवत, विविध खंड, भाषा आणि संस्कृतींना एका धाग्यात गुंफणारा हा जागतिक स्वातंत्र्यदिन सोहळा आधुनिक भारताच्या वाढत्या वैभवाचा आणि परराष्ट्र संबंधांतील दृढ बंधांचा सुवर्ण अध्याय ठरला आहे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा

## तुकाराम मुंढेच्या रडारवर आता सेलिब्रेटी

तुकाराम मुंढे यांनी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा कारभार हाती घेतल्यापासून भेसळयुक्त आणि नागरिकांच्या आरोग्याला हानीकारक असलेले खाद्यपदार्थ, उत्पादने आणि हॉटेल्सवर कारवाई करण्याचा धडाका लावला आहे तुकाराम मुंढे यांनी कितीही नावाजलेले हॉटेल किंवा ब्रँड असो, तिथे चुकीच्या गोष्टी आढळल्यास त्यांचे परवाने निलंबित करण्याची धमक दाखवली आहे असेच एका पान मसाल्याच्या जाहिरातीच्या माध्यमातून एका बड्या कंपनीच्या तत्सम उत्पादनाची अप्रत्यक्ष जाहिरात केल्याचा आरोप करत महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने अभिनेता अजय देवगण, शाहरुख खान आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे एफडीएच्या कारवाईचा फटका मुंबई, पुण्यासह राज्यातील अनेक नामांकित आस्थापनांना बसला आहे. आता तुकाराम मुंढे यांनी आता आपला मोर्चा बॉलीवूडमधील प्रसिद्ध सेलिब्रिटींकडे वळवला आहे. अजय देवगण यांच्या जुहू येथील निवासस्थानी, शाहरुख खान यांच्या वांद्रे येथील 'मन्नत' निवासस्थानी, तर टायगर श्रॉफ यांना त्यांच्या एलएलपी प्रॉडक्शन हाऊसमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे. १३ जुलै २०२६ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्रात पान मसाल्याचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर एक वर्षासाठी बंदी घालण्यात आली आहे. अभिनेत्यांची स्टाईल युवा वर्ग करत असतो समाजमनावर त्याचा विपरीत परिणाम होतो त्यामुळे कलाकारांनी अशा जाहिराती करणे चुकीचे असून या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने या तिन्ही अभिनेत्यांना जाहिरातीतील त्यांच्या भूमिके बाबत स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे. या नोटिसला आता अजय देवगण, शाहरुख खान आणि टायगर श्रॉफ काय उत्तर देणार, हे पाहणे मोठे औत्स्युकाचे ठरेल !

**राजू जाधव,**
मांगूर जि. बेळगांव

## 'ॐ नम: शिवाय' कपड्यांवर नकोच !

श्रावण मास सुरु असल्याने सर्वत्रचे वातावरण भक्तिमय झाले आहे. श्रावण मासात शिवभक्त भगवान शिवाची विशेष भक्ती करतात. काही जण प्रत्येक सोमवार निर्जली उपवास करतात तर काही जण श्रावण मास पादत्राणे परिधान करत नाहीत, या मासातील प्रत्येक सोमवारी शिवमंदिरात शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. याच दिवसांत ॐ नम: शिवाय। हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय त सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. करायला हवा.

**जगन घाणेकर,** घाटकोपर,

मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

## विजेचा करंट लागून शेतकऱ्याचा मृत्यू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**कुटुंबाचा आधार गेल्याने गावावर शोककळा..**



**राळेगाव, दि. १७ :** राळेगाव -तालुक्यातील वनोजा येथे जंगली जनावरांचा त्रास टाळण्यासाठी शेतात लावलेल्या विद्युत उपकरणाची वायर तपासताना विजेचा करंट लागून एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना काल दि.१६ ऑगस्ट रोजी घडली.मृत शेतकऱ्याचे नाव मधुकर बापुराव भालेराव,वय ४८ वर्षे असे आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतातील पिकांची जंगली जनावरांकडून नासधूस होत होती. त्यामुळे जनावरे शेतात येऊ नयेत म्हणून मधुकर यांनी शेतात आवाज करणारे विद्युत उपकरण लावले होते.

काल ते उपकरण सुरू झाले नसल्याने वायरमध्ये बिघाड झाला आहे का हे पाहण्यासाठी मधुकर शेतात गेले होते.तपासणी करत असतानाच त्यांना अचानक जोराचा विजेचा धक्का बसला आणि त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि नातेवाईक घटनास्थळी धावले. राळेगाव पोलीस यांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रूग्णालय राळेगाव येथे पाठविला. घराचा कर्ता पुरुष अचानक गेल्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.या घटनेने संपूर्ण वनोजा गावावर शोककळा पसरली आहे,मधुकर यांच्या पश्चात पत्नी व २ मुले असा आप्त परिवार आहे.तसेच भालेराव कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार तात्काळ आर्थिक मदत व मदत निधी मिळावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

### ग्रामस्थांची मागणी

**जंगली जनावरांचा वाढता उपद्रव आणि शेतातील असुरक्षित वीज जोडण्यांमुळे शेतकरी जीव मुठीत धरून शेती करत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वनविभागाने जनावरांचा बंदोबस्त करावा तसेच महावितरणने शेतातील वीज जोडण्यांची सुरक्षा तपासणी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.**

## भाडे मिळेना, उलट घरमालकांनाच त्रास गुलमोहर पार्कात भाडेकरूंच्या वर्तनाने वाद पेटला!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १७ :** गुलमोहर पार्क परिसरात घरमालक आणि भाडेकरूंमधील वाद आता पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचला असून, वाहनाच्या नुकसानीच्या तक्रारीवरून अवधूतवाडी पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध एनसीआर दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, संबंधित जागा भाडेतत्त्वावर दिलेली असतानाही नियमित भाडे मिळत नसल्याचा दावा असून, उलट घरमालकांनाच मानसिक त्रास, वादविवाद आणि दबावाचा सामना करावा लागत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिस नोंदीनुसार, तक्रारदार मोहम्द आसीम मोहम्मद जाबीर असारी (वय ३१) हे गुलमोहर पार्क येथील रहिवासी असून बिल्डिंग मटेरियल सप्लायरचा व्यवसाय करतात. त्यांच्या मालकीचे शेजारील घर मागील चार वर्षांपासून फरीदा शेख लालखान पठान (वय ३५), शेख गुलाम अहेमद हारुन अली (वय ४०) यांना भाड्याने दिले आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार घर खाली करण्यास सांगितल्यानंतर संबंधितांशी वारंवार वाद होत आहेत. या वादाला आणखी गंभीर वळण मिळाले ते २९ जुलै २०२६ रोजी. तक्रारीनुसार, तक्रारदाराच्या MH-२९-AD-१३६७ क्रमांकाच्या मारुती सुझुकी वाहनाला बोलेरो पिकअपने धडक देण्यात आली. या घटनेत सुमारे १८ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात वरील दोघांसह ‘अरबाज’ (पूर्ण नाव माहीत नाही) याचेही नाव तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे भाडेतत्त्वावर दिलेल्या जागेचा ताबा आणि भाडे वसुलीचा प्रश्न. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित जागेचे भाडे मिळत नसतानाही तेथील भाडेकरू घरमालकांवरच दबाव निर्माण करीत असल्याचा आरोप आहे. भाड्याने दिलेल्या जागेवर मालकी हक्क असल्याप्रमाणे वर्तन केले जात असल्याचीही चर्चा परिसरात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, जागा रिकामी करण्यास सांगितल्यावर घरमालक आणि संबंधित व्यक्तींमध्ये अनेकदा वाद झाले आहेत. काही प्रसंगी घरमालकांना धमकावण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा तसेच जागेवर कब्जा करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही करण्यात येत आहे. काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या नावाचा धाक दाखवून घरमालकांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहितीही सूत्रांकडून मिळाली आहे. याशिवाय, घरमालकाला मारहाण करण्याचा प्रयत्न झाल्याचेही सूत्रांकडून सांगण्यात येत असले, तरी या गंभीर आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप पोलिस नोंदीत झालेली नाही. त्यामुळे या आरोपांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

### जागा भाड्याने दिली मात्र घरमालक अडचणी..!

**घर भाड्याने देऊन त्यातून उत्पन्न मिळविण्याऐवजी मालकांनाच त्रास सहन करावा लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाल्याने गुलमोहर पार्क परिसरात या प्रकरणाची चर्चा सुरू आहे. भाडेकरू-घरमालक वादातून वाहनाचे नुकसान, धमकी आणि जागेच्या ताब्याचा प्रश्न निर्माण होत असेल, तर पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, अवधूतवाडी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(३), ३५२ आणि ३२४(२) अन्वये एनसीआर क्रमांक ०६९९/२०२६ दाखल केली आहे. घटनेची माहिती ११ ऑगस्ट रोजी पोलिसांना मिळाल्यानंतर नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.**

## उमरखेड चे सुफिसंत तातार शाह बाबाचा संदल उत्साहात साजरा

**उमरखेड, दि. १७ :** उमरखेड शहराला सुफी संतांची भूमी म्हणुन ओळख आहे. उमरखेड च्या अनेक भागात सुफी संतांची समाधी स्थिरावली आहे. दरम्यान, तातार शाह बाबाचा उर्स दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात साजरा झाला, उमरखेड शहरातील आठवडी बाजार परिसरात आयाजबाबू मुजावर यांच्या घरातून संदल ची रैली शहरात्तील अनेक मार्गातुन मार्गक्रमण करत या संदल मिरवणुकीचा समारोप तातार शहा बाबा यांच्या दरगाह वर करण्यात आला. या संदल रैली मध्ये तातार शाह बाबांचे शेकडो चाहते सहभागी झाले होते, दरम्यान, संदलमध्ये आलेल्या सर्व हिंदू मुस्लिम बांधवांचे आभार मुजावर अयाज बाबू यांनी मानले संदल मिरवणुकीत उमरखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## दहा वर्षांनंतर वणी–शिरपूर बससेवा सुरू; मोहदा येथे उत्साहात स्वागत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. १७ :** नागपंचमीच्या शुभप्रभाती वणी–शिरपूर–वेडाबाई–मोहदा–नेरड–पूरड या मार्गावरील बससेवा पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील नागरिक,विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील तब्बल दहा वर्षांपासून बंद असलेली बससेवा सुरू होण्यासाठी विजय भाऊ पिदुरकर यांच्या पुढाकारासह वर्षा राजुरकर,सरपंच मोहदा आणि सचिन रासेकर,उपसरपंच मोहदा यांच्या सातत्यपूर्ण मागणी व पाठपुराव्याला यश आले.


या बससेवेचा स्वागत समारंभ मोहदा बसस्थानक येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ग्रामस्थ,विद्यार्थी, नालंदा विद्यालय वेडाबाई येथील शिक्षक,महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बससेवा सुरू झाल्याबद्दल विजय पिदुरकर माजी जिल्हा परिषद सदस्य,तसेच बसचे चालक चंदू मेश्राम आणि वाहक सचिन भगत यांचा ग्रामस्थ,विद्यार्थी,सरपंच वर्षा राजुरकर व उपसरपंच सचिन रासेकर यांच्या उपस्थितीत शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दहा वर्षांपासून बंद असलेली बस पुन्हा सुरू झाल्यामुळे विशेषतः शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे.तसेच मोहदा,वेडाबाई, नेरड,पूरड व परिसरातील नागरिकांना दैनंदिन प्रवास, शिक्षण,रोजगार,बाजारपेठ तसेच शासकीय कामांसाठी ये-जा करणे सुलभ होणार आहे. “सातत्यपूर्ण मागणी, पाठपुरावा आणि लोकहिताची भूमिका यामुळे अखेर दहा वर्षांनंतर बससेवा सुरू झाली,” अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. बससेवा नियमितपणे सुरू राहावी,अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली. या बससेवेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. नागपंचमीच्या दिवशी मिळालेली ही बससेवेची भेट.

## नागपंचमी व श्रावणी सोमवारच्या शुभयोगावर श्री शिपिनाथांच्या दर्शनासाठी टाकळीत हजारोंचा जनसागर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले





**फुलसावंगी, दि. १७ :** श्रावण महिन्यातील शुद्ध पंचमी ही पूर्वापार नागपंचमी म्हणून या कृषीप्रधान देशात अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी केली जाते. यंदा नागपंचमी आणि श्रावण महिन्यातील पहिलाच सोमवार असा दुर्मिळ व पवित्र योग एकाच दिवशी जुळून आल्याने टाकळी (ई) येथील ऐतिहासिक श्रद्धास्थान असलेल्या श्री शिपिनाथ मंदिरात भाविकांची अलोट गर्दी झाली होती.

दरवर्षीप्रमाणे यंदाही नागपंचमीच्या दिवशी पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी भक्तांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. टाकळीसह संपूर्ण पंचक्रोशीतील व दूरवरून आलेल्या हजारो भाविकांनी श्री शिपिनाथ महाराजांच्या चरणी फुले, दूध आणि बेल अर्पण करून दर्शन घेतले. भक्तांच्या या निस्सीम श्रद्धेमुळे आणि ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने संपूर्ण टाकळी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती. या सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात सुंदर व आकर्षक सजावट करण्यात आली होती. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून गावातील नवयुवक मंडळ आणि ग्रामस्थांनी एकत्र येत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता आणि गर्दीचे नियोजन केले. महिला, वृद्ध आणि लहान मुलांसाठी स्वतंत्र रांगा व बैठकीची व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थ व युवक मंडळाच्या या नियोजनामुळे सामाजिक एकात्मतेचे एक उत्तम उदाहरण दिसून आले.

## थोडक्यात



### युवकांच्या कलागुणांना देशभक्तीची धार..!

**वक्तृत्व अन् कराओके गायन स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद**

**पांढरकवडा :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून युवा परिवर्तन क्लबच्या वतीने आयोजित वक्तृत्व आणि ‘आझादी के तराने’ देशभक्तीपर कराओके गायन स्पर्धेला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘विकसित भारतासाठी युवकांचे योगदान’ या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत अ गटात श्रावणी खडसे, देवांश चिंचोळकर व प्रियदर्शनी वाटगुरे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. ब गटात गायत्री भांडेकर, आशिष मेश्राम व दुर्गेश सलाम विजेते ठरले.

गायन स्पर्धेच्या अ गटात स्वरा वारेकर, साईशा घावडे व प्राप्ती बुट्टेकर, तर ब गटात प्रज्ञा रामटेके, शेख जमीर व योगिता कोंडावार यांनी अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळवले. विजेत्यांना रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, तर सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग पदक देण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन युवा परिवर्तन क्लबचे संयोजक प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. वक्तृत्व व गायन स्पर्धेचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांनी केले. युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ देत आत्मविश्वास आणि देशभक्तीची भावना जागविणाऱ्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.



### ‘हर घर तिरंगा’त शिवरामजी मोघे महाविद्यालयाचा राष्ट्रभक्तीचा जागर

**पांढरकवडा :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ९ ते १५ ऑगस्टदरम्यान ‘हर घर तिरंगा’ अभियान उत्साहात राबविण्यात आले. अभियानात देशभक्तिपर सांस्कृतिक कार्यक्रम, शपथविधी, तिरंगा सेल्फी, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली आणि जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थी, स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रध्वजाचा सन्मान, राष्ट्रीय एकात्मता आणि ‘राष्ट्र प्रथम’चा संदेश विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यावर भर देण्यात आला. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी अभियानाचे नियोजन केले.



### समग्र शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व दप्तर वाटप.!

**पुसद :** नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्र.२, लोहार लाईन, पुसद येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश व दप्तर वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची सुविधा मिळावी आणि त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात या उद्देशाने शाळेतील शिक्षकांच्या वतीने विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्यामध्ये शाळेविषयी आपुलकी व उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष फारुकअहमद चव्हाण उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड उपस्थित होते मुख्याधिकारी यांनी आपले भाषणात शाळेचे भौतिक सुविधा व इतर कामाबद्दल दुरुस्ती करण्याबद्दल आश्वासन दिले व शाळेची लक्षणीय पटसंख्या वाढल्याबद्दल मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे कौतुक केले तसेच नगरपालिका महानगरपालिका शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष सुनील जाधव सर, समाजसेवक हाजी अब्दुल गफ्फार भाई कुरेशी, जनाब वकील भाई गौरी उपस्थित होते कार्यक्रमात पालक गण बहुसंख्यत उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक मोहम्मद शारिक सर,अब्दुल रब सर,सादिक खान सर ,वहिदा रहमान बाजी, मदतनीस मुस्कान सदफ सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## रक्तदानातून जपले यवतमाळकरांनी ऋणानुबंध..!

### ८० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग, ८०व्या स्वातंत्र्यदिनी ‘चला रक्तदान करूया

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १७ :** स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी उत्साह केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता यवतमाळकरांनी तो सामाजिक बांधिलकीतून कृतीत उतरविला. ८०व्या स्वातंत्र्यदिनी एस.के. ऑटो डील व शैलेश करिहार मित्र परिवारासह विविध सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून शिवशक्ती लॉन, स्टेट बँक चौक येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिरात ८० युवक-युवती व नागरिकांनी रक्तदान करून गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्याचा संकल्प केला.

‘चला रक्तदान करूया, नातं नव्याने घडवूया’ या संकल्पनेतून सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत झालेल्या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध व जैन समाजातील बांधवांनी तसेच दाम्पत्यांनी एकत्र रक्तदान करून सामाजिक एकतेचा संदेश दिला. आमदार बाळासाहेब मंगुळकर, माजी आमदार कीर्ती गांधी, किशोर बाबू दर्डा, तहसीलदार योगेश देशमुख, संतोष ढवळे, वाहतूक शाखेचे निरीक्षक ज्ञानोबा देवकते, नीलिमा मंत्री यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शिबिराला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेत योग्य रक्तगट उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे रक्तदान ही केवळ सामाजिक सेवा नसून थेट जीवन वाचविणारी लोकचळवळ आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शैलेश करिहार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराला यवतमाळ का राजा सेवा परिवार, यवतमाळ ब्लड डोनर असोसिएशन, इनरव्हील क्लब, विविध फाउंडेशन, महिला मंडळे, सेवाभावी संस्था व सामाजिक संघटनांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन विजयकुमार बुंदेला यांनी केले.

## ‘भारत माता की जय’च्या घोषणांनी दुमदुमली जाजू इंटरनॅशनल स्कूल

### स्वातंत्र्यदिना सोबत विद्यार्थी नेतृत्व मंडळाचा पदग्रहण सोहळा उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. १७ :** भारत माता की जय, वंदे मातरम् आणि देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन तसेच विद्यार्थी पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या देशभक्तीने आणि नेतृत्वगुणांच्या दर्शनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाला टीडीआरएफचे प्रमुख हरिश्चंद्र राठोड, टीडीआरएफ विदर्भ प्रमुख अभय गुप्ता, दैनिक जनमाध्यमचे जिल्हा प्रतिनिधी विवेक वानखडे, युवा ॲडव्होकेट शुभम जाधव, युगसत्ताचे संपादक विशाल बावनथडे यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जाजू, सचिव आशिष जाजू, कोषाध्यक्ष व डायरेक्टर प्रिन्सिपल शिल्पा जाजू, प्राचार्य बेनी सॅम्युअल व उपप्राचार्य सुचिता पारेख उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने प्रारंभ झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. वंडर किड्सच्या विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे हरिश्चंद्र राठोड यांनी विद्यार्थ्यांनी देशाचे जबाबदार नागरिक बनून राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन केले. शिल्पा जाजू यांनीही विद्यार्थ्यांना जबाबदारी स्वीकारून ती सक्षमपणे पार पाडण्याचा संदेश दिला. विद्यार्थी नेतृत्व मंडळाच्या निवड प्रक्रियेत प्रशिक्षण, मुलाखती व सादरीकरणांद्वारे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांची कसोटी घेण्यात आली. हेड बॉय आरुष अग्रवाल, हेड गर्ल लब्दी कोठारी, डेप्युटी हेड बॉय कौतुक खडसे, डेप्युटी हेड गर्ल निर्भया मनवर यांची निवड झाली. स्पोर्ट्स कॅप्टन म्हणून जोएल डेव्हिड व अनया जाजू यांची नियुक्ती करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सॅश व बॅच प्रदान करून शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनन्या गवळी व अर्चना दांडगे यांनी केले. पालक, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुहम्मद (सल्ल.) फॉर ऑल’ अभियानाचा यवतमाळात शुभारंभ..! न्याय, करुणा व सामाजिक सलोख्याचा संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १७ :** स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया (SIO) महाराष्ट्र नॉर्थ झोन, जिल्हा यवतमाळतर्फे ‘मुहम्मद (सल्ल.) फॉर ऑल’ या राष्ट्रव्यापी अभियानाचा शुभारंभ रविवारी यवतमाळ जिल्हा मुख्यालयात करण्यात आला. १६ ते ३० ऑगस्टदरम्यान राबविण्यात येणाऱ्या या अभियानातून पैगंबर मुहम्मद (सल्ल.) यांच्या जीवनचरित्र, शिकवण, नैतिक मूल्ये आणि मानवसमाजासाठीच्या योगदानाची व्यापक ओळख करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

रबीउल अव्वल महिन्याच्या निमित्ताने आयोजित या अभियानात पैगंबर मुहम्मद (सल्ल.) यांच्या जीवनाकडे केवळ धार्मिक दृष्टिकोनातून नव्हे, तर न्याय, सामाजिक समता, मानवाची प्रतिष्ठा, करुणा आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या मूल्यांच्या संदर्भातून पाहण्यावर भर देण्यात येणार आहे. अभियानांतर्गत जनजागृती उपक्रम, संवाद कार्यक्रम, प्रदर्शन, साहित्य वितरण, शैक्षणिक चर्चा आणि सामाजिक संपर्क कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेषतः युवक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक घटकांमध्ये परस्पर आदर, सामाजिक जबाबदारी आणि मानवी मूल्यांवर सकारात्मक संवाद घडवून आणण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. सामाजिक ध्रुवीकरण व वाढता अविश्वासाच्या पार्श्वभूमीवर न्याय, करुणा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे SIOच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले. शुभारंभप्रसंगी जमाते इस्लामी हिंदचे जिल्हाध्यक्ष मिर्झा अकिल बेग, मिर्झा नवेद बेग, SIOचे जिल्हा सचिव अहमद अब्दुल मोईज, तसेच आवेस अहमद खान, अबुजर शादाब व शेख मुनीब उपस्थित होते. अभियानाशी विद्यार्थी, बुद्धिजीवी, माध्यम प्रतिनिधी, सामाजिक नेते आणि नागरिकांनी जोडावे, असे आवाहन करण्यात आले.

## गोदावरी अर्बन सोसायटीतर्फे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**झरी, दि. १७ :** सहकार क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, नांदेडच्या मुकुटबन शाखेतर्फे संस्थेच्या ६ व्या वर्धापनदिनानिमित्त व स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून प्राथमिक शाळा, राजूर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गोदावरी अर्बनचे संस्थापक आ. हेमंत पाटील व अध्यक्षा राजश्री पाटील , व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर , उपमहाव्यवस्थापक दवे मॅडम , तसेच सहायक महाव्यवस्थापक विजय शिर्मेवार ,रवी इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम घेण्यात आला तसेच मुकुटबन शाखेचे शाखाधिकारी धम्मपाल निमसरकार, उपव्यवस्थापक दिप्ती मल्लूरवार, अधिकारी चेतन ठाकरे, तुषार ठाकरे, सहायक अधिकारी रविंद्र तावाडे,सचिन जुनगरी, विपिन गावंडे यांच्यासह सर्व कर्मचारी व प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगून नियमित अभ्यास, शिस्त व मेहनतीच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन करण्यात आले.

## मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर बैठकीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे साकडे

**यवतमाळ, दि. १७ :** मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी तातडीने बैठक घेऊन दिनांक व वेळ निश्चित करावी, अशी मागणी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, जिल्हा यवतमाळ शाखेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष आनंद भगत, कार्याध्यक्ष आनंद कांबळे आणि सरचिटणीस प्रफुल्ल मनवर यांच्या स्वाक्षरीचे हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहे. निवेदनात निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यामार्फत मागणी करण्यात आली आहे. महासंघाच्या म्हणण्यानुसार, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या समस्या व प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी संघटनेने यापूर्वी पत्रव्यवहार केला होता. संबंधित पत्र दिनांक ११ मे २०२६ रोजी देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही बैठकीसाठी दिनांक व वेळ निश्चित करण्यात आलेली नाही. तब्बल सहा-सात महिने उलटूनही बैठक घेण्यासाठी वेळ न मिळाल्याने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून त्यावर सकारात्मक चर्चा होणे आवश्यक असल्याचे महासंघाने म्हटले आहे.

# ''विजयी विश्व तिरंगा प्यारा, झेंडा उंचा रहे हमारा''

## नागरिकांच्या सहभागातून स्वच्छ, सुंदर, प्रगत चांदूर रेल्वे घडविणार : नगराध्यक्ष प्रा. प्रियंका विश्वकर्मा



**चांदूर रेल्वे :** देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त चांदूर रेल्वे नगरपरिषदेत देशभक्तिपूर्ण वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. नगराध्यक्ष प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावून तिरंग्याला मानवंदना देण्यात आली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना नगराध्यक्ष प्रा. प्रियंका विश्वकर्मा म्हणाल्या की, असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, संघर्ष आणि बलिदानातून मिळालेले स्वातंत्र्य हा देशाचा अमूल्य वारसा असून, तो जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला बळ देण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांचेही मोठे योगदान राहिले आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारख्या राष्ट्रीय नेत्यांनी नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकसेवेची वाटचाल केली. त्यामुळे नगरपालिका ही केवळ रस्ते, दिवाबत्ती व नागरी सुविधा पुरविणारी संस्था नसून लोकशाहीची पायाभरणी करणारी आणि समाज घडविणारी महत्त्वाची संस्था आहे.

चांदूर रेल्वे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपरिषद कटिबद्ध असून, नागरिकांच्या गरजा ओळखून लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभार करण्यास प्राधान्य दिले जाईल. शहरातील प्रत्येक भागाला विकासाच्या प्रवाहात समान न्याय मिळावा आणि प्रत्येक नागरिकाचा आवाज ऐकला जावा, यासाठी प्रयत्न केले जातील. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक विकास या क्षेत्रांना प्राधान्य देताना महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विद्यार्थी, कामगार, व्यापारी, शेतकरी यांच्यासह समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा लक्षात घेऊन शहर अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

नगरपरिषदेमार्फत होणाऱ्या विकासकामांमध्ये पारदर्शकता, योग्य नियोजन, वेळेचे भान आणि उत्तरदायित्व यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल.

शहराच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असून, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांनी समन्वयाने काम केल्यास चांदूर रेल्वेच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'नगरपालिका ही केवळ नगराध्यक्ष किंवा नगरसेवकांची संस्था नसून ती प्रत्येक नागरिकाची नगरपालिका आहे. स्वच्छ, सुंदर, प्रगत आणि आदर्श चांदूर रेल्वे घडविण्यासाठी नागरिकांनी आपली सामाजिक जबाबदारी ओळखून नगरपरिषदेला सहकार्य करावे,' असे आवाहनही नगराध्यक्षांनी केले.

यावेळी नगरपरिषदेचे उपाध्यक्ष बच्चू वानरे, नगरसेवक निलेश विश्वकर्मा, मो. अनिस सौदागर, हर्षल वाघ, सुमेध सरदार, अरिहंत गेडाम, पप्पू भालेराव, प्राविण्य देशमुख, अनिल मोटवानी, गजानन ठाकरे, अंकित कदम, अ‍ॅड. किर्ती इमले, कल्पना लांजेवार, प्रियंका वरठे, पुनम कोकाटे, शेख निलोफर, वंदना हजारे, ममता रॉय, दुर्गा भूत, शालिनी राऊत, आंचल प्रधान आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## VIDA च्या पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पातुन शहीदांना हरित मानवंदना



**अमरावती:** देशाच्या स्वातंत्र्यासाठी तसेच देशाच्या अखंडता, सार्वभौमत्व आणि सुरक्षेसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर जवानांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या बलिदानाला कृतज्ञतापूर्वक अभिवादन म्हणून स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून व्हिजन इंटेग्रीटी डेव्हलपमेंट असोसिएशन, अमरावतीच्या वतीने डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज, मार्डी रोड, अमरावती येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत या उपक्रमांतर्गत १५० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली.

स्वातंत्र्यदिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे आणि देशाच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. त्यांच्या त्यागातून मिळालेल्या स्वातंत्र्याचे जतन करताना देशाचे पर्यावरण सुरक्षित ठेवणे आणि भावी पिढ्यांसाठी निरोगी व स्वच्छ भारत निर्माण करणे हीदेखील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. याच भावनेतून शहीद जवानांच्या स्मरणार्थ हा वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. विदा पदाधिकारी व सदस्य तसेच डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत ब्रेड्‌ चे संस्थापक अध्यक्ष प्रितेश सुर्यकांत वाघमारे यांनी उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाची शपथ दिली व त्यानंतर वृक्षारोपण कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते मार्डी रोडपर्यंतच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी कडुलिंब, वड, पिंपळ, चिंच, आवळा, कडू बदाम, उंबर आणि बेहडा आदी विविध प्रजातींच्या १५० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. दरम्यान, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजचे कॅम्पस डेव्हलपमेंट ऑफिसर विशाल पाटील यांनी उपक्रमाचे कौतुक करित लावण्यात आलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी आम्ही पूर्णपणे प्रयत्न करू' असे आश्वासन दिले. पर्यावरण संवर्धनाच्या अशा मोहीमा देशभर व्यापक झाल्यास संपूर्ण देश प्रदूषणमुक्त व निरोगी करण्याच्या दिशेने आपण प्रभावी पाऊल उचलू शकतो असे मत वृक्षारोपण कार्यक्रमाला उपस्थित असलेले मौलाना मुबस्सीर साहब यांनी व्यक्त केले.

## वडूरा जि. प. मराठी शाळा



**खल्लार -** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा वडूरा येथे येथे ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व प्रथम गावातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय वडुरा येथे कार्यालयात ध्वजारोहणाला उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

वडूरा येथील शाळेच्या प्रांगणामध्ये शाळेचे विद्यार्थी, अंगणवाडी केंद्रातील लहान मुले, गिरीजा शंकर विद्यालयाचे शिक्षक वृंद मुख्याध्यापक वानखडे वाटाणे शिंगणे ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष, सभासद, पालक वर्ग, महिला मंडळ तरुण उत्साही मंडळ, गिरजाशंकर विद्यालय वडूराचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय गीताचे गीत गायन करुन शाळेचे मुख्याध्यापक विजय मकेश्वर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर आधारित कवायतीचे प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी स्वयं स्फुर्तीने स्वातंत्र्य दिनानिमित्त उन्नती तायडे, माही शिरसाट जिविका भोरखडे श्रुती भोरखडे, नंदिनी भोरखडे यांनी भाषणे दिली. शाळेला लोकसहभागातून ज्यांनी ज्यांनी आर्थिक स्वरूपात मदत व आपले योगदान व सहकार्य दिले, शाळेला मदत केली, त्यांचा सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धाचे उपस्थित पाहुण्यांचे हस्ते प्रथम, द्वितीय, आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात आले.

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये तिरंगा रॅली



**अमरावती -** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या या रॅलीत संस्थेतील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी तसेच मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हातात तिरंगा घेऊन सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या रंगात रंगून गेला.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' यांसह विविध देशभक्तिपर घोषणा देत उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. तिरंग्याचा सन्मान, राष्ट्राची एकता आणि अखंडता यांचा संदेश देत रॅली मार्गक्रमण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रॅलीला विशेष आकर्षण प्राप्त झाले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत स्वातंत्र्याचे महत्त्व, राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका आणि देशाप्रती असलेली जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले.

युवकांनी शिक्षणासोबतच राष्ट्रहित, सामाजिक बांधिलकी आणि देशाच्या विकासासाठी योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

तिरंगा रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. संपूर्ण रॅलीदरम्यान निर्माण झालेले देशभक्तीमय वातावरण हे या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

## करजगावात विद्यार्थ्यांनी घेतली 'अक्षरमुक्त गाव'ची शपथ



**तिवसा -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करजगाव येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त 'अक्षरमुक्त गाव'ची शपथ घेण्यात आली. विविध शैक्षणिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांनी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत मुख्याध्यापक अविनाश गंजीवाले सर यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत गायन केले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांच्या सहभागातून गावातून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' तसेच देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण गावाचा परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन उत्स्फूर्तपणे रॅलीत सहभाग नोंदविला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि राष्ट्राप्रती असलेल्या कर्तव्यांविषयी प्रभावी भाषणे केली. यावेळी नवभारत साक्षरता अभियानांतर्गत 'अक्षरमुक्त गाव' शपथ घेण्यात आली. गावातील प्रत्येक व्यक्ती साक्षर व्हावी, निरक्षरता दूर व्हावी आणि शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचावा, असा संकल्प यावेळी करण्यात आला. याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या 'निपुण मातांचा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला.

## मिलिंद विद्यालय गौरखेडा (चांदई)



**खल्लार -** नजिकच्या गौरखेडा (चांदई) येथिल मिलिंद विद्यालयात भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. बी. वानखडे, प्रमुख पाहुणे प्रतिष्ठित नागरिक सुधाकर धुरंदर, भरत गावंडे, माजी पोलीस पाटील अवधूतराव रहाटे, सज्जन गावंडे, रवि मोहोड प्रमिलाबाई वानखडे, शालिनीताई वानखडे, पोलीस पाटील गजानन धुमाळे, जितेंद्र तायडे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व अध्यक्ष यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुंदर संगितमय कवायत आणि देशभक्तीपर गीत गायन व भाषणे पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचे स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे दिपक कावरे आभार प्रदर्शन प्रशांत वानखडे व सूत्रसंचालन अमोल बोबडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता व कार्यक्रमाचे सौंदर्य वाढविण्यासाठी सुशोभीकरण करण्यासाठी विद्यालयातील विद्यार्थी प्रशांत वानखडे, दिपक कावरे अमोल बोबडे वासुदेव भांडे, मनिषा गावंडे, चित्रा राऊत, पूजा काळे रोषणा इंगळे दिपक रहाटे, संजय आठवले, आनंद खंडारे, गणेश आंबोरे, मुमताज पठाण यांनी परिश्रम घेतले.

## सुरवाडी येथील मतिमंद विद्यालय



**तिवसा -** निवासी मतिमंद विद्यालय, सुरवाडी, तिवसा येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ध्वजारोहणाने करण्यात आली. प्रमुख अतिथी समाज सेवक धीरज केने यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वांनी वंदे मातरम, राष्ट्रगीत व राज्य गीताचे सामूहिक गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण केली.

यावेळी शाळेतील संचालक मंडळ सुद्धा उपस्थित होते. विशेष विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते, भाषणे व गीते म्हणून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी विद्यार्थ्यांना पाहुण्यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व, देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग तसेच देशाप्रती असलेली आपली कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## श्री गुरुदेव सेवाश्रमातर्फे शिक्षक राजेश सावरकर यांचा सत्कार



**भातकुली-** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून पंचायत समिती भातकुली अंतर्गत उत्तमसरा येथील श्री गुरुदेव सेवाश्रमाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेचे आदर्श शिक्षक तथा प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश दादाराव जी सावरकर यांचा शाल व श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उत्तमसरा येथे स्वातंत्र्यदिनाचा ८०वा ध्वजारोहण सोहळा मोठ्या उत्साहात व देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त उत्तमसरा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, श्री गुरुदेव सेवाश्रम तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे ध्वजारोहण करण्यात आले.

श्री गुरुदेव सेवाश्रमाचे अध्यक्ष गुन्नुसिंग मालवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीताचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी महात्मा गांधी, लोकमान्य गंगाधर टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, शहीद वीर भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, साने गुरुजी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पोलीस पाटील सचिन सवाई, माजी सदस्य सुदाम मेहरे, ग्रामपंचायत प्रशासक धर्मेंद्र मेहरे, राजेंद्र सवाई, सुभाष सवाई, श्रीमती विमल सवाई, गजानन सायंके, गोवर्धन मेश्राम, शिवदास पवार, विजय शेवतकर, अनिल मेहरे आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमानिमित्त विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख तथा जिल्हा परिषद शाळेचे आदर्श शिक्षक राजेश सावरकर, जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक संतोष कुर्हेकर, स्वच्छता कामगार अरविंद मावंदे, पाणीपुरवठा कर्मचारी शुभम अवचार, ग्रामपंचायत लिपिक अमित पेढेकर, संगणक परिचालक पल्लवी राऊत, आशा वर्कर सुरेखा सवाई व संगीता निंभोरकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बबनराव सवाई, गोपाल झाडे, राजेंद्र सवाई, विद्या मालधुरे, चंद्रकला पवार, वंदना सवाई, डॉ. सोनाली देशमुख, विनायक सवाई तसेच श्री गुरुदेव सेवाश्रमाचे अध्यक्ष गुन्नुसिंग मालवे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन येलोने व प्रमोद कांबळे यांनी केले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी उत्तमसरा गावातील नागरिक, शिक्षक, कर्मचारी, अधिकारी आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेंट



**लेहेगाव:** विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेंट लेहेगाव येथे आज, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. उद्धवराव चिमोटे, गिरीश जाणायांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वज पूजन करण्यात आले. यावेळी. आशिष इंगळे सर (शाखा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया, लेहेगाव) यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. स्वातंत्र्य दिनाचे महत्व व त्यामागील बलिदान, त्याग याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत स्वातंत्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते, प्रभावी भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला अधिक रंगत आणली...ाळेच्या शिक्षिका मनीषा मनोहरे व निशा यादव यांनी संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व, देशाप्रती असलेली जबाबदारी तसेच राष्ट्रप्रेम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगण्यात आले की, सुशिक्षित आणि संस्कारक्षम विद्यार्थी हेच देशाचे खरे भविष्य आहेत. शिक्षणाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, जबाबदारी आणि समाजसेवेची भावना विकसित होते, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्याने ज्ञानाबरोबरच चांगले संस्कार देण्याचे कार्य करावे, असेही प्रतिपादन करण्यात आले.

## राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय

**अचलपुर-** शिक्षणाचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेली अचलपूर शहरातील पब्लिक वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी पब्लिक वेल्फेअर सोसायटीचे उपाध्यक्ष नरेश खंडेलवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी पब्लिक वेल्फेअर सोसायटीचे सदस्य माणिक देशपांडे, कचरूसेठ पटवारी, राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वेश राठी, प्र. पर्यवेक्षिका स्वाती सवाई,



ज्येष्ठ शिक्षक प्रकाश भगत, सचिन घवळे, दिलीप बोबडे, शिक्षक प्रतिनिधी तथा शिक्षकेत्तर प्रतिनिधी, सांस्कृतिक कार्यक्रमांचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते या प्रसंगी विद्यार्थ्यांनी समूह गीत गायन सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सचिन घवळे व आभार प्रदर्शन प्रभारी पर्यवेक्षिका स्वाती सवाई यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.

## तक्षशिला महाविद्यालय



**अमरावती -** श्याम नगर येथील श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टद्वारा संचालित तक्षशिला महाविद्यालयात भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ट्रस्टचे विश्वस्त डॉ. राजेंद्र गवई यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी ७.४५ वाजता एनसीसीच्या पथकाने शिस्तबद्ध संचलन व प्रात्यक्षिक सादर करीत मान्यवरांना मानवंदना दिली. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताच्या सादरीकरणाने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. प्रितेश पाटील, हिंमत ढोले, डॉ. रविंद्र तायडे, डॉ. नवल पाटील, डॉ. संदीप हाडोळे, डॉ. सनोबर कहकशा, डॉ. वर्षा गावंडे, डॉ. प्रणाली पेठे, डॉ. प्रवीण वानखडे, डॉ. रुपेश बेलसरे, डॉ. आनंद देशमुख, निरूपमा भोरे, मोनाली पाटील, सचिन कुमरे आदी उपस्थित होते.

# जलसुरक्षित भविष्य घडवा !

जलसुरक्षितता व जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे आता काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे. या जलसंधारण दिनाचे महत्त्व सांगणारा हा विशेष लेख...

आपल्या देशाच्या आणि पर्यायाने महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत माती आणि पाणी या दोन नैसर्गिक संसाधनांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा थेट संबंध या दोन्ही घटकांशी आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद या छोट्याशा तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारे दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना राज्यासमोरील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान केवळ मोठ्या धरणांच्या माध्यमातून सोडविता येणार नाही, हे ओळखले. पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, तो जमिनीत मुरविणे आणि स्थानिक पातळीवरील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र दिला. पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण, पाझर तलाव, गाव तलाव, नाला बांध, माती बंधारे आणि अन्य छोट्या जलसंधारण संरचनांवर त्यांनी भर दिला. जलसंधारणाला स्वतंत्र प्रशासकीय दिशा देत त्यांनी या विषयाला लोकसहभागाशी जोड दिली.

१९९१ ते १९९३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि जलसंधारणाची कामे यांची सांगड घालून त्यांनी जलस्रोत निर्मितीला चालना दिली. जलसंधारण हे केवळ अभियांत्रिकीचे काम नसून गावागावातील नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे अभियान आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्ट झाली. आज जलयुक्त शिवार, भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

त्यांच्या याच योगदानाची दखल घेत दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा २००३ पासून जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जात होता. मात्र, स्मृतिदिनाऐवजी जन्मदिवस अधिक उत्साहपूर्ण आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, या विचारातून यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे मृद व




जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विभागातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांशी चर्चा करून २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी यास मान्यता दिल्यानंतर शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्राच्या जलसंधारण चळवळीचा महत्त्वपूर्ण दिवस ठरणार आहे.

यंदाचा जलसंधारण दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता त्याला व्यापक जनसहभागाची जोड देण्यात आली आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानात व्यापक लोकसहभाग अपेक्षित आहे.

या अभियानातील सर्वात आकर्षक उपक्रम म्हणजे 'महा वॉकेथॉन २०२६- वॉक फॉर वॉटर'. २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी तीन किलोमीटरची महा वॉकेथॉन आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा हजार नागरिकांच्या सहभागाचे उद्दिष्ट असून, राज्यभरातून तीन लाखांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष सहभागी होण्याची अपेक्षा आहे. नागरिक, युवक-युवती, विद्यार्थी, महिला, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, 'माय भारत', क्रीडा संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, कलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

ही केवळ चालण्याची स्पर्धा नसून जलसंधारणासाठी जनजागृतीची सामूहिक पावले उचलणे आहेत. वॉकेथॉनच्या प्रारंभी सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, मातीची धूप रोखणे, पावसाचे पाणी अडविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' हा यंदाच्या अभियानाचा मुख्य संदेश आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेशही या चळवळीला दिशा देणार आहे. युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येणार आहे. 'रील फॉर सॉईल ?ण्ड वॉटर कन्झर्वेशन' या उपक्रमातून १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी मिळणार आहे. ३० ते ६० सेकंदांच्या इन्स्टाग्राम रिल्सच्या माध्यमातून मातीची धूप, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर संदेश देता येणार आहे. अभिनय, संगीत, विनोद, लघुपट, ?निमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन दृश्ये किंवा अन्य नाविन्यपूर्ण माध्यमांचा वापर करून युवकांना आपली कल्पकता सादर करता येणार आहे. क्षर्एनएदर्स्ट्रर्एॅ हा अधिकृत हॅशटॅग वापरून राज्यभरातून मोठ्या प्रमाणात रिल्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

जलसंधारणाचा संस्कार पुढील पिढीवर व्हावा यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर, वादविवाद स्पर्धा, जलसंधारणाची शपथ, 'एक शाळा–एक शोषखड्डा', जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना जलसंधारणाशी जोडले जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या जलसंधारणविषयक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

अभियानाच्या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागात प्रत्यक्ष जलसंधारणाच्या कामांनाही गती दिली जाणार आहे. विविध योजनांतर्गत कामांचे भूमिपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, शेततळी व जलस्रोतांची पाहणी, अमृत सरोवरांच्या परिसरात वृक्षारोपण, नाला, तलाव, विहीर आणि पाझर तलावांची लोकसहभागातून स्वच्छता अशा उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक यांसारख्या उपक्रमांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. जलसंधारणाच्या कामात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव, लोकसहभागातून श्रमदान, जलस्रोतांचे संवर्धन आणि जनजागृती या माध्यमातून शासन आणि समाज यांच्यातील सहभाग अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समन्वय साधून कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.आज हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीतील घट आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. अशा परिस्थितीत सुधाकरराव नाईक यांनी दशकांपूर्वी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. जलसंधारणाची कामे किती झाली यापेक्षा ती किती परिणामकारक ठरली, पाणी किती काळ टिकले आणि पुढील पिढीसाठी आपण किती जलसाठा निर्माण केला, हा खरा प्रश्न आहे.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, माती आणि पाणी ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असून त्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

२१ ऑगस्टचा 'जलसंधारण दिन' त्यामुळे केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा दिवस न राहता महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी सामूहिक संकल्पाचा दिवस ठरला पाहिजे. सुधाकरराव नाईक यांना खरी आदरांजली त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात नाही, तर त्यांच्या विचारांना कृतीची जोड देण्यात आहे. प्रत्येक गावात जलस्रोत जपला, प्रत्येक शेतात पाण्याचा थेंब अडविला, प्रत्येक शाळेत जलसंधारणाचा संस्कार रुजविला आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याची जबाबदारी स्वीकारली, तरच 'जलसंधारण दिना'चा खरा उद्देश साध्य होईल.माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर जीवन सुरक्षित राहील आणि लोकसहभाग वाढला तर महाराष्ट्र जलसंपन्न बनेल. चला, सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणाच्या विचारांना कृतीची जोड देऊया-'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा!'


**विभागीय माहिती**
कार्यालय,अमरावती

# भक्तासाठी वळलेला महादेव - औंढा नागनाथ

'भक्तीपाशी देव घालितसे उडी, धुत असे घोडी अर्जूनाची' या काव्यातून भक्त आणि भगवंताचे नाते उलगडते. शुद्ध भक्तीचा भुकेला असलेल्या भगवंतांनी अनेकदा, भक्ताकडे जाऊन दर्शन दिले आहे. भगवंताच्या या प्रेमाचा अनुभव अनेक संतांनी याची देही अनुभवला. महाराष्ट्रातील औंढा नागनाथ हे देखील भक्तप्रेमाचेच एक उदाहरण. मात्र, या मंदिरामध्ये भक्ताबरोबर इतिहास, साम्राज्य आणि भक्ती चळवळींचाही इतिहास दिसून येतो. या मंदिराच्या सर्वांगसुंदरतेचा मागोवा घेणारा हा लेख...

देवाच्या दर्शनासाठी भक्त मंदिराकडे जातो हे आपण नेहमीच पाहिले आहे. पण, महाराष्ट्रात एक मंदिर असे आहे, जिथे लोकपरंपरा एक विलक्षण कथाच सांगते. भक्ताला देवापासून दूर केले गेले, तेव्हा जणू देवानेच आपले मंदिर भक्ताकडे वळवले. मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदिर केवळ बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मानले जाते म्हणून महत्त्वाचे नाही; त्याच्या दगडांमध्ये शैव परंपरा, मध्ययुगीन महाराष्ट्राचे स्थापत्य, नाथ-सिद्धांचा विचार आणि पुढे महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या भक्ती चळवळीचा विलक्षण प्रवासही एकत्र नांदताना दिसतो.

'शिवपुराणा'तील 'कोटिरुद्र संहिते'त वर्णिलेल्या बारा ज्योतिर्लिंगांमध्ये, 'नागेश' अथवा 'नागेश्वर' ज्योतिर्लिंगाचा उल्लेख दारुकावनात असल्याचे दिसते. या



दारुकावनाचे नेमके स्थान कोणते, याबद्दल मात्र विद्वानांमध्ये एकमत नाही. गुजरातमधील द्वारकेजवळचे नागेश्वर, उत्तराखंडमधील जागेश्वर आणि महाराष्ट्रातील औंढा नागनाथ अशा विविध परंपरा आपापला दावा मांडतात. त्यामुळे औंढा हेच पुराणातील दारुकावन असल्याचा निर्विवाद ऐतिहासिक दावा करण्यापेक्षा, औंढ्याला नागेश ज्योतिर्लिंग मानणारी महाराष्ट्रातील प्राचीन आणि दृढ श्रद्धा-परंपरा समजून घेणे अधिक योग्य ठरते.

औंढ्याचा इतिहास मात्र या ज्योतिर्लिंगाच्या दाव्यापेक्षाही अधिक रोचक असाच आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन संदर्भांमध्ये हा परिसर 'अमरदक' किंवा 'अमर्दक' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या, एका महत्त्वाच्या शैव केंद्राशी जोडला जातो. दहाव्या शतकापासून विविध शिलालेखांमध्ये, अमरदक परंपरेशी संबंधित शैव आचार्यांचे उल्लेख आढळतात. पुढे संशोधकांनी, अमरदकची ओळख औंढा नागनाथशी जोडली आहे. विशेष म्हणजे, अमरदक है शैव सिद्धान्ताच्या आचार्य परंपरेतील महत्त्वाचे केंद्र. म्हणजेच, आज आपण ज्या औंढ्याकडे प्रामुख्याने तीर्थक्षेत्र म्हणून पाहतो, ते कधीकाळी शैव तत्त्वज्ञान, साधना आणि आचार्य परंपरेचेही प्रभावी केंद्र असावे.

आज दिसणाऱ्या मंदिराच्या बांधकामाचा निश्चित शिलालेख उपलब्ध नाही. स्थापत्य आणि शिल्पशैलीच्या आधारे अभ्यासक त्याचा काळ साधारण बारावे-तेरावे शतक, म्हणजे देवगिरीच्या यादवांच्या प्रभावाचा काळ मानतात. औंढा त्याकाळात राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा होताना दिसतो. काही पुराव्यांनुसार बाराव्या शतकात अर्धापूरच्या रट्ट सरदारांच्या सत्तेशी, या प्रदेशाचा संबंध होता. पुढे तो प्रदेश यादवांच्या अधिपत्याखाली आला. त्यामुळे मंदिराकडे केवळ 'हेमाडपंथी' असा एक शब्द लावून पुढे जाण्यापेक्षा, मध्ययुगीन दख्खन मधील अनेक स्थापत्य आणि धार्मिक प्रवाहांचा परिणाम म्हणून पाहणे अधिक योग्य ठरते.

मंदिरासमोर उभे राहिल्यावर त्याची भव्यता लगेच जाणवते.

**इंद्रनील बंकापुरे**

# डाकिया डाक लाया.....


फार पूर्वी मानवी संवादाचे साधन म्हणून पत्राचा उपयोग केल्या जात होता.पत्राचा इतिहास प्राचीन आहे.कागदाचा शोध लागण्यापूर्वी कापड,पाने, ताम्रपट इत्यादीचा वापर करून संदेश पाठविण्यात येत होता.काही वेळा कबुतराद्वारे किंवा राजे आपल्या गुप्त हेराद्वारे निरोप पाठवीत होते पण यामध्ये बराच अवधी लागायचा.कालांतराने पोस्ट खात्याची निर्मिती झाली आणि निरोप पत्राचे स्वरूप बदलले.एक काळ होता तो पत्र व्यवहाराचा.आपला संदेश एकमेकांना पोहोचवण्याचा आणि वर्तमान परिस्थिती दर्शविण्याचा. पत्र दोन प्रकाराचे होते.औपचारिक आणि अनौपचारिक.औपचारिक पत्राचा वापर प्रामुख्याने शासकीय कार्यालये,शाळा,उद्योग इत्यादीत करीत होते.या पत्रातील भाषा मुद्देसूद ,काटेकोर,अर्थपूर्ण असायची.समोरील व्यक्तीला पत्रातील मजकुराचा अर्थबोध होत होता तर अनौपचारिक पत्राचा उपयोग आई,वडील,मित्र,प्रियशी करीता होता.वडीलधारी व्यक्तीकरिता तीर्थरूप किंवा तीर्थस्वरूप शब्द वापरून सुरुवात होत होती पुढे राज मान्य राजश्री किंवा नमस्कार लिहित होते.यामध्ये भाषा जिव्हाळ्याची, प्रेमाची होती तर कित्येकदा अभिनंदन,कौतुक पत्राद्वारे होत होते.मुलगा,मुलगी किंवा कुटुंबातील सदस्य घराबाहेर गावी गेले की ते पत्र पाठवित होते . तीन-चार दिवसांनी ते पत्र येत होते.पत्रात लिहित होते की आम्ही सुखरूप पोहचलो आणि समाधान होत होते. पत्र म्हणजे दोन व्यक्ती मधील जणू भेटच समजत होते. पत्र मिळताच वाचून आनंदही खूप होत होता.

त्यावेळी फोन नव्हते, मोबाईल नव्हते व्हाट्सअप नव्हते. आपल्या घरासमोर पोस्टमन जात असताना त्याला आम्ही पत्रा विषयी विचारात असे.आमच्या घरचे पत्र असल्यास तो देत असे.पोस्टमन आला की आनंद होत असेल आता आपल्याला पत्र आले आणि त्यामध्ये निश्चितच चांगल्या संदेश असेल म्हणून.काही ठिकाणी निरक्षर व्यक्तीकडे पत्र आल्यास पोस्टमन पत्र वाचून दाखवीत असे. पोस्टमन पत्रातील सर्व मजकूर समोरच्या व्यक्तीस सांगत असे. राजेश खन्नाच्या पालकोकी छाओं में चित्रपटात राजेश खन्ना पोस्ट मन म्हणून पत्र वाटप करतांना गीत म्हणत असतो, डाकिया डाक लाया खुशिका पयाम कही दर्द नाकापाया। तर आम्ही हायस्कूल मध्ये असताना हिंदीच्या पुस्तकात मुंशीराम डाकिया नावाचा धडा होता.

पोस्ट ऑफिस जवळ पत्र टाकण्याचा लाल डबा असायचा.वर पत्र टाकण्याकरता छोटीशी झडप असायची आणि डब्यात पत्र जमा झाले की खाली पत्र काढण्याकरता छोटे फाटक असायचे आणि त्याला कुलूप असायचे. पोस्टमन दुपारी किंवा सायंकाळी तो पूर्ण डबा खाली करायचा अर्थात पूर्ण पत्र काढायचा.

पत्र हे कार्ड,अंतर्देशीय पत्र यावर मजकूर लिहिल्या जात होता पण कार्डवर गोपनीयता नसायची त्यामुळे कार्ड वरील मजकूर कोणीही वाचू शकत असायचा त्यामुळे गोपनीयता नसायची.काही गोपनीय मजकूर असल्यास अन्तर्देशीय पत्राचा वापर करण्यात येत होता. हे पत्र लिफाफ्या सारखे बंद असायचे. तर काही वेळा कागदावर पत्राचा मजकूर लिहून तो लिफाफ्या मध्ये पोस्ट करण्यात येत होते.त्यामुळे आतील मजकूर वाचता येत नव्हता पण आंतरदेशीय पत्राची किंमत कार्डच्या तुलनेत अधिक असायची तर लिफाफा त्यापेक्षाही महाग असायचा.शेजाऱ्याकडे पत्र आले आणि ते जर चुकून दुसऱ्या शेजाऱ्याच्या हाती लागले तर काही लोक ते चोरून पत्र वाचायचे त्यामुळे त्यांना अधिक आनंद व्हायचा आणि त्यांच्या शेजाऱ्याच्या कुटुंबातील सगळी माहिती त्यांना न सांगता मिळत होती. पत्र व्यवहारांमध्ये अंतर जरी असले तरी त्यामध्ये एकमेकांना जोडण्याचे साधन होते. आपले सुख दुःख सांगण्याचे सामर्थ होते पण आता आपलेपणा राहिला नाही. पोस्टमनला सुद्धा मानसन्मान होता. सर्व शासकीय व्यवहार त्यावेळी पोस्टद्वारे होत होते पण आता हे कोठेही पाहायला मिळत नाही. आता त्याची जागा मेलने घेतली आहे. त्यामुळे लिखाण करणे आता कालबाह्य झाले आहे. पोस्टद्वारे पैसे सुद्धा मनीऑर्डरने पाठवण्याची सुविधा होती. पैसे पाठवायचे आणि त्यावर मजकूर असायचा. तीन-चार दिवसात पैसे पुढील व्यक्तीला मनी ऑर्डरने मिळत होते आणि पैसे मिळण्याची पोच पावती परत पाठवीत असायचा. त्यामुळे पैसे पाठविणाऱ्या पुढील व्यक्तीस पैसे मिळाले याचा पुरावा मिळत असेल पण आता ही जागा ऑनलाईन गुगल पे ,यूपीआय यांनी घेतली आहे. त्यानंतरचा प्रवास टेलिग्राम चा होता .तात्काळ निरोप पाठवण्याची सुविधा म्हणजे टेलिग्राम होता. पण टेलिग्राम बहुतांश मृत्यूची बातमी करता होता. टेलिग्राम म्हटले की हृदयाचे ठोके थोडे जास्तच वाढायचे. एखाद्या वेळेस मुलाखतीसाठी सुद्धा टेलिग्राम असायचा पण त्याची जागा आता मेलनी घेतली आहे.

जगात डिजिटल क्रांती झाली त्यामुळे जग एकमेकांशी जोडल्या गेले. कोणताही संदेश क्षणातच मिळतो. मेल, व्हाट्सअप, भ्रमणध्वनी, इंस्टाग्राम इत्यादी. जग जरी जुळल्या गेले तरी त्यामध्ये स्नेह आत्मियता दिसून येत नाही. व्हाट्सअप, इंस्टाग्रामवर एखाद्या पोस्टला लाखो लाईक करतात पण त्यापैकी किती लोक संबंधित व्यक्तीच्या कामी येतात ? इंस्टाग्राम वर एखादी पोस्ट पाठवली तर अनेक त्याला लाईक करतात. कदाचित त्या पोस्टला लाईक करतात पण त्या व्यक्तीला लाईक करतात का? याचा अनुभव कदाचित अनेकांना आला असेल. व्हाट्सअप वर तर अशा अनेक पोस्ट येतात.अनेकदा आपण काही विचार न करता त्या इतरांना पाठवतो. बऱ्याच वेळा त्याचा विपरीत परिणाम सुद्धा होतो. डिजिटल क्रांती झाली खरी पण त्यातून बालकांवर विपरीत परिणाम झाला.आई लहान मुलांना रडत असताना किंवा त्यांचे रडणे थांबण्यासाठी त्या मुलाला मोबाईल देतात आणि तो अनेक चांगल्या वाईट पोस्ट पाहतो.



**डॉ. संजय साळीवकर,**
अमरावती.
९४२३४२४८५१

# तीन चिमुकल्या स्वप्नांची राख... आणि आपल्या हातातील दुचाकीची चावी

हिंगणघाटच्या काळजाला चटका देणाऱ्या दुर्घटनेनंतर आता तरी जागे होण्याची वेळ, पालक, शाळा, महाविद्यालये आणि समाजाने जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन

काही घटना केवळ बातम्या राहत नाहीत, त्या संपूर्ण समाजाच्या काळजावर कायमच्या कोरल्या जातात. काही मृत्यू आकडेवारीत नोंदले जातात, पण काही मृत्यू संपूर्ण समाजाच्या विवेकाला प्रश्न विचारून जातात. १५ ऑगस्टचा दिवस हिंगणघाटसाठी असाच प्रश्न घेऊन आला. देशभर तिरंगा डौलाने फडकत असताना, स्वातंत्र्याचा उत्सव साजरा होत असताना तीन अल्पवयीन विद्यार्थिनींचा भीषण अपघातात मृत्यू झाला. दुचाकीवर तिघी प्रवास करत असताना अचानक कुत्रा आडवा आल्याने वाहनाचा तोल गेला आणि मागून येणाऱ्या ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली त्या सापडल्या. या घटनेने संपूर्ण शहरावर शोककळा पसरली.

तीन मुली, तीन कुटुंबे, तीन आईंच्या कुशा आणि तीन वडिलांच्या डोळ्यांतील हजारो स्वप्ने.

आज त्या घरांमध्ये शांतता असेल. कालपर्यंत ज्या घरात शाळेची बॅग, पुस्तके, हसण्याचे आवाज आणि उद्याच्या भविष्याची चर्चा होती, तिथे आता आठवणींचे सावट आहे. आई अजूनही दाराकडे पाहत असेल. वडिलांच्या मनात कदाचित एकच प्रश्न घोंगावत असेल, माझी मुलगी मला सोडून एवढ्या लवकर का गेली?

या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नाही.

पण या घटनेतून पुढचा प्रश्न मात्र आपण नक्की विचारू शकतो, आपण आता तरी जागे होणार आहोत का?

कारण श्रद्धांजलीच्या दोन शब्दांपेक्षा एखाद्या पुढच्या जीवाला वाचवणे मोठे आहे.आज प्रत्येक पालकाने आपल्या हातातील दुचाकीची चावी पाहावी आणि स्वतःला विचारावे, ही चावी मी माझ्या मुलाला देत आहे की नकळत एखादा धोका त्याच्या हातात सोपवत आहे?मुलगा कॉलेजला जातो, क्लासला जातो, मित्रांसोबत फिरतो. त्याला वेळेची बचत हवी असते. पालकांनाही त्याची गैरसोय नको असते. प्रेमापोटी वाहन दिले जाते. पण रस्त्यावर अपघाताला पालकांचे प्रेम, मुलाचे भविष्य किंवा घरची स्वप्ने माहीत नसतात. एका क्षणाची चूक संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य बदलून टाकते.

म्हणून मुलाचा दोन दिवसांचा राग सहन करणे सोपे आहे, पण मुलाला आयुष्यभरासाठी गमावण्याची वेदना कोणताही पालक सहन करू शकत नाही.

मुलाला दुचाकी देणे हे प्रेम नाही, त्याला सुरक्षित ठेवणे हेच खरे प्रेम आहे.

शाळा, महाविद्यालये आणि खासगी शिकवणी वर्गांचीही या प्रश्नात तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तके, परीक्षा आणि गुण नव्हेत. जबाबदारीने जगणे, नियम पाळणे आणि स्वतःचा जीव सुरक्षित ठेवणे हेही शिक्षणाचाच भाग आहे. संस्थांच्या परिसरात अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या दुचाकी नियमितपणे दिसत असतील, तर ही पालकांची जबाबदारी आहे म्हणून व्यवस्थापनाने हात झटकणे योग्य नाही. विद्यार्थ्यांचे समुपदेशन, पालकांशी संवाद, वाहतूक सुरक्षेवरील मार्गदर्शन आणि आवश्यकतेनुसार प्रशासनाची मदत करणे ही संस्थांचीही सामाजिक जबाबदारी आहे.याच भावनेतून १८ ऑगस्टपासून हिंगणघाट शहरात अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या दुचाकी वापराविरोधात जनजागृती आणि प्रतिबंधात्मक मोहीम सुरू करण्याचा निर्धार युवा परिवर्तन की आवाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते राहुल कालिंदी रमेशराव दारुणकर यांनी व्यक्त केला आहे. शाळा, महाविद्यालये आणि खासगी शिकवणी वर्गांच्या परिसरात अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या दुचाकी आढळल्यास संबंधित संस्थेचे लक्ष वेधून आवश्यकतेनुसार प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

मात्र ही मोहीम विद्यार्थ्यांना बदनाम करण्यासाठी नसावी. एखाद्या मुलाचा फोटो काढून सोशल मीडियावर टाकणे, नाव जाहीर करणे किंवा त्याला सार्वजनिकपणे अपराधी ठरवणे हा उपाय नाही. चूक करणाऱ्या मुलाला समाजातून दूर करण्याऐवजी त्याला योग्य मार्गावर आणणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे.

ही मोहीम कोणत्याही राजकीय पक्षाविरुद्ध नाही. कोणत्याही शाळेविरुद्ध नाही. कोणत्याही महाविद्यालयाविरुद्ध नाही. ही आपल्या समाजाच्या निष्काळजी मानसिकतेविरुद्धची हाक आहे.

हिंगणघाटमधील सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, युवक संघटना, महिला संघटना, शिक्षक, पालक, पत्रकार आणि जागरूक नागरिकांनी या विषयावर एकत्र येणे आवश्यक आहे. राजकारणाचे झेंडे वेगळे असतील, विचारधारा वेगवेगळ्या असतील, पण मुलांच्या सुरक्षिततेचा झेंडा एकच असला पाहिजे.

विद्यार्थ्यांनो, तुमच्यासाठीही हा संदेश आहे. वेग म्हणजे शौर्य नाही. स्टंट म्हणजे पराक्रम नाही. नियम मोडणे म्हणजे स्वातंत्र्य नाही. मित्रांमध्ये मोठे दिसण्यासाठी जीव धोक्यात घालणे ही शहाणपणाची गोष्ट नाही. सोशल मीडियावरील काही सेकंदांच्या व्हिडिओसाठी मिळणारे हजारो लाईक्स तुमच्या आईच्या आयुष्यभराच्या अश्रूंपेक्षा मोठे असू शकत नाहीत.

तुमचा खरा विजय हा सुरक्षितपणे घरी परतण्यात आहे.

प्रशासनानेही या घटनेकडे केवळ अपघात म्हणून न पाहता व्यापक रस्ता सुरक्षा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नियमित जनजागृती, पालक बैठका, वाहतूक नियमांचे मार्गदर्शन, आवश्यक तपासणी आणि नियमभंगाविरोधात कायदेशीर कारवाई यासोबतच समुपदेशनावर भर दिला पाहिजे. विशेषतः शैक्षणिक संस्थांच्या परिसरात सुरक्षित वाहतूक व्यवस्था, वाहनांची गर्दी आणि अल्पवयीन वाहनचालकतेवर लक्ष देणे आवश्यक आहे.तीन चिमुकले जीव आता परत येणार नाहीत.त्यांच्या घरातील हसू पूर्वीसारखे होणार नाही.त्यांच्या शाळेच्या बाकावरची जागा रिकामी राहील.त्यांच्या आईच्या कुशीतली पोकळी कधीच भरून निघणार नाही.

पण त्यांच्या मृत्यूने जर एखाद्या पालकाने आपल्या मुलाच्या हातातील चावी थांबवली, एखाद्या विद्यार्थ्याने नियम पाळण्याचा निर्णय घेतला, एखाद्या शिक्षकाने एका मुलाला समजावले, एखाद्या संस्थेने स्वतःहून सुरक्षा नियम लागू केले आणि प्रशासनाने एका संभाव्य दुर्घटनेला आधीच रोखले, तर त्या तीन निष्पाप जीवांच्या स्मृतीला त्यापेक्षा मोठी श्रद्धांजली कोणती?

म्हणूनच आज प्रश्न दुचाकीचा नाही, प्रश्न चावीचा नाही, प्रश्न आपल्या मानसिकतेचा आहे.

आपण मुलांना सुविधा देताना त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणार आहोत का?

आपण माझ्या मुलाला काही होणार नाही या भ्रमातून बाहेर पडणार आहोत का?

आपण अपघात झाल्यानंतर जागे होण्याऐवजी अपघात होऊच नये यासाठी प्रयत्न करणार आहोत का?

उत्तर हो असेल, तर या दुःखाला अर्थ मिळेल.तीन जीव गेले, पण त्यांच्या जाण्याने हजारो जीव वाचले पाहिजेत.आज एक चावी थांबवूया.आज एक हट्ट नाकारूया.आज एका मुलाला सुरक्षिततेचा धडा देऊया.कारण मुलाचा आजचा राग आपण सहन करू शकतो, पण त्याच्या उद्याच्या अनुपस्थितीचे दुःख कधीच सहन करू शकत नाही.आज दुचाकीची चावी थांबवूया, उद्याचे अश्रू थांबवूया.

**राहुल कालिंदी रमेशराव दारुणकर**
प्रदेशाध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ता
युवा परिवर्तन की आवाज
संघटना, महाराष्ट्र राज्य

# अकोल्यातील युवकाचा बुडून मृत्यू, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

## धोधानी धबधब्यावर अंघोळीस व पोहण्यास बंदी घाला, सुरक्षा व्यवस्था वाढवा – फरहान अमीन

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर तालुक्यातील पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास आलेल्या धोदानी धबधब्यावर वारंवार घडणाऱ्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ कठोर सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सचिव मो. फरहान अमीन यांनी केली आहे.



पावसाळ्यामुळे धोदानी धबधब्यावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. मात्र, वाढलेला पाण्याचा प्रवाह, निसरडे दगड, पर्यटकांची गर्दी आणि काही पर्यटकांकडून मद्यप्राशन करून पाण्यात उतरण्याचे प्रकार यामुळे येथे जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. कालच धोदानी धबधब्यावर अकोला येथील एका युवकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने धबधबा परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर फरहान अमीन यांनी पातूर तहसीलदार यांना निवेदन देऊन धोधानी धबधब्यावर अंघोळ व पोहण्यास तात्काळ बंदी, शनिवार-रविवार व सुट्टीच्या दिवशी पोलीस बंदोबस्त, धोक्याचे सूचना फलक, मद्यप्राशन करणाऱ्यांवर कठोर कारवाई तसेच कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. 'धोदानी धबधबा पर्यटनस्थळ म्हणून विकसित व्हावा, मात्र तो पर्यटकांसाठी मृत्यूचा सापळा ठरू नये. नागरिकांच्या जीविताशी तडजोड अजिबात सहन केली जाणार नाही,' असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. प्रशासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही न केल्यास राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असे फरहान अमीन यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष नातीक शेख, सैय्यद फैझान आदी उपस्थित होते.

> '१७आगस्ट रोजी एका युवकाचा जीव गेला आहे. या पुर्वी सुद्धा या धोधानी धबधब्यात अशा घटना घडल्या आहेत. आता णखी किती जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार? दुर्घटना घडल्यानंतर पंचनामा करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रशासनाने आजच ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे,'
>
> **मो. फरहान अमीन**
> प्रदेश सचिव: राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेस, महाराष्ट्र

# राष्ट्रध्वज अभिवादन बाईक रॅलीला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोट ■

**■ देशभक्तीपर घोषणांनी अकोट शहर दुमदुमले**
**■ महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन**



देशाच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त वंचित बहुजन युवा आघाडी अकोट तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रध्वज अभिवादन बाईक रॅलीला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशभक्तीपर गीतांसह 'स्वातंत्र्य दिन चिरायू हो'च्या घोषणांनी अकोट शहरातील प्रमुख मार्ग दुमदुमून गेले.

रॅलीची सुरुवात अकोट रेल्वे स्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, युवा आघाडीचे जिल्हा महासचिव राजकुमार दामोदर तसेच भारिप बहुजन महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप वानखडे यांच्या उपस्थितीत रॅलीला प्रारंभ झाला. रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली. येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास, तर सोमवार वेस परिसरात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मार्गावर विविध ठिकाणी नागरिकांनी रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी नागेश उमाळे, सूरज दामोदर, आकाश जंजाळ, अकोट तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुंडकर, निलेश झाडे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे, युवा तालुकाध्यक्ष आशिष रायबोले, तालुका महासचिव अमन गवई, काशीराम साबळे, मंदाताई कोल्हे, महिला आघाडी तालुकाध्यक्ष सुनीता हिरोळे, शहराध्यक्ष लता कांबळे यांच्यासह वंचित बहुजन आघाडी, युवा आघाडी व महिला आघाडीचे पदाधिकारी, सर्कल अध्यक्ष तसेच आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी युवा आघाडीच्या तालुका पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# व्यापारीक समस्यांच्या निराकरण साठी पाठपुरावा - खा धोत्रे



**अकोला :** व्यापारी व उद्योजकांच्या समस्याच्या निराकरणसाठी आपण योग्य तो पाठपुरावा करू यासाठी व्यापारी वर्गाचे सहकार्य ही अपेक्षित असल्याचे मत खा अनुप धोत्रे यांनी व्यक्त केले. शतकोत्तर वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. श्रावगी टॉवर येथील विदर्भ चेंबरच्या सभागृहात संपन्न या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून खा. अनुप धोत्रे बोलत होते. चेंबरचे अध्यक्ष निरव वोरा यांच्या अध्यक्षतेत सम्पन्न झालेल्या या कार्यक्रमात सर्वप्रथम खा. अनुप धोत्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येऊन सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत सामूहिक राष्ट्रगीत होऊन राष्ट्रीय तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. खा धोत्रे यांनी चेंबरच्या रचनात्मक व्यापार व औद्योगिक सेवा कार्याचे कौतुक करीत चेंबरच्या या यशात सर्व पदाधिकारी वर्गाचे योगदान असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्यात.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाला ३०० कोटींचा निधी प्राप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला ?३०० कोटींचा निधी नुकताच महामंडळाच्या खात्यात जमा झाला असून, प्रलंबित व्याज परतावा थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वितरित करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे, अशी माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंग देशमुख यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

या व्याज परतावा योजनेंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी शासनाकडून एकूण ?७५० कोटी मंजूर करण्यात आला होते. पहिला हप्ता २० मे २०२६ रोजी ?१५० कोटी प्राप्त झाला होता आणि योजनेतील लाभार्थ्यांना तो वितरित करण्यात आला. त्यानंतर ३ ऑगस्ट २०२६ च्या शासन निर्णयानुसार ३०० कोटीचा निधी नव्याने मंजूर करण्यात आले, जे ९ ऑगस्ट २०२६ रोजी महामंडळाच्या बँक खात्यात जमा झाले. आतापर्यंत चालू आर्थिक वर्षात एकूण ?४५० कोटीचा निधी महामंडळास प्राप्त झाला आहे. तसेच १० ऑगस्ट २०२६ रोजी एकाच दिवसात पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात २१ कोटींचा व्याज परतावा जमा करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांसाठी कार्यवाही सुरू महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, उर्वरित पात्र आणि प्रलंबित प्रकरणांची प्रशासकीय व तांत्रिक तपासणी अंतिम टप्प्यात आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच उर्वरित रक्कमही कोणत्याही मध्यस्थाविना थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT द्वारे) जमा केली.

# १६ वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी; खंडेलवाल ज्वेलर्सचा अनोखा उपक्रम

**अकोला :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून खंडेलवाल ज्वेलर्सने गेल्या १६ वर्षांपासून सुरू असलेल्या आपल्या कर्मचारी कल्याण उपक्रमाचा विशेष उल्लेख केला. 'र्ण्पूबुँग्र्हेूं प्दस' या विचारातून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाला सातत्याने आर्थिक व शैक्षणिक आधार दिला जात आहे.

गेल्या १६ वर्षांपासून खंडेलवाल ज्वेलर्स आपल्या कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची १०० टक्के शैक्षणिक फीची जबाबदारी घेत आहे. यासोबतच विद्यार्थ्यांना शाळेची फी, शालेय गणवेश, स्कूल बॅग, पुस्तके, वह्या, स्टेशनरी आणि आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले जाते. म्हणजेच, पात्र व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या प्रमुख शैक्षणिक खर्चाची जबाबदारी खंडेलवाल ज्वेलर्सकडून घेतली जाते.

## ब्रिलियंट चेस अकादमीच्या विविध खेळ स्पर्धा संपन्न

**अकोला :** स्थानीक गोरक्षण रोड येथील ब्रिलियंट चेस अकादमीत मुला मुलींसाठी विविध खेळ स्पर्धा संपन्न झाली. यात बुध्दीबळ, कॅरम, टेबल टेनिस आदी क्रीडा प्रकार ठेवण्यात आले होते. १० व १८ वर्ष आतील मुला मुलींसाठी आयोजित या स्पर्धेचा प्रारंभ प्रो कोड अकादमीच्या संस्थापक फाउंडर वर्षा पटेल व जितेन्द्र अग्रवाल याच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत बुद्धिबळ मध्ये १० वर्ष आतील स्पर्धकात प्रथम अधिराज चव्हाण, द्वितीय आर्यन गुटे, तृतीय वचन भाला, चतुर्थ सार्थक चिनी, पाचवा अनिरूद्ध लहुळकर विजयी ठरले. या स्पर्धेचे बक्षिस वितरण जितेन्द्र अग्रवाल व आयवीन जैम्स याच्या हस्ते करण्यात आले.

# 'विज्ञानाच्या गवाक्षातून' पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन


## विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन देणाऱ्या पुस्तकाची मान्यवरांकडून प्रशंसा

■ प्रतिनिधी | अकोट ■

विज्ञान शिक्षिका सौ. उज्वला किसन तायडे लिखित 'विज्ञानाच्या गवाक्षातून' या पुस्तकाचे प्रकाशन स्वातंत्र्यदिनाच्या पावन पर्वावर उत्साहपूर्ण वातावरणात समाजसेवक शालीग्राम सावळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एम.जी.एम. कॉलेज, नवी मुंबईचे प्रा. डॉ. निशांत सावळे आणि इंजि. आशुतोष दाभाडे (मुंबई) यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रकाशन सोहळ्यास डॉ. किसनराव तायडे, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते नागोराव तायडे, प्रा. प्रशांत सावळे, राजेश वानखडे, उद्योजक सारंगधर दाभाडे, डॉ. अतुल सावळे (मुंबई), महेंद्र वानखडे, डॉ. शामल दाभाडे, सविता दाभाडे, अनुराधा वानखडे, कविता सावळे, अश्विनी सावळे, मेघाली वानखडे, लक्ष्मी तायडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

'विज्ञानाच्या गवाक्षातून' हे पुस्तक विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे असून, ज्ञान, विज्ञान आणि ललित लेखन यांचा सुंदर त्रिवेणी संगम या पुस्तकातून अनुभवायला मिळतो. विज्ञान म्हणजे




केवळ प्रयोगशाळेतील उपकरणे, सूत्रे किंवा पाठ्यपुस्तकातील संकल्पना नव्हेत, तर दैनंदिन जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागील कारण समजून घेण्याची दृष्टी म्हणजे विज्ञान, हा विचार लेखिकेने प्रभावीपणे मांडला आहे. दैनंदिन जीवनातील साध्या-सोप्या घटनांकडे कुतूहलाने पाहत त्यामागील वैज्ञानिक कारणांचा शोध घेण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना या पुस्तकातून मिळते. त्यामुळे विज्ञान विषयातील संकल्पना केवळ अभ्यासापुरत्या मर्यादित न राहता त्या प्रत्यक्ष जीवनाशी जोडल्या जातात.

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३४७/२०२६ — प्रोसेस नं.१०३९६/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. दिपक भगीरथ चांडक रा. विकास, एनसीसी ऑफिस जवळ, आळशी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. २. अर्चना मनोहर राठी रा. बानोसा, दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. भगीरथ सुरजमल चांडक २. श्रीमती. वसंतीबाई भगीरथ चांडक
**पत्ता :-** रा. विकास, एनसीसी ऑफिस जवळ, आळशी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भगीरथ सुरजमल चांडक यांचे दि. २०/०९/२०१९ रोजी व मयत श्रीमती. वसंतीबाई भगीरथ चांडक यांचे दि. ०६/११/२००४ रोजी राहत्या घरी आळशी प्लॉट, अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब बारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३४३/२०२६ — प्रोसेस नं.१०३९५/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. अनुसया शंकरराव मानकर रा. सावरगाव, वार्ड नं. ३, पो. सावरगाव, ता. नरखेड, जि. नागपूर. २. गजानन नागोराव मेहरे रा. अनंत कपाद केंद्र, मोठी उमरी, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला. ३. राजेंद्र नागोराव मेहरे रा. प्रांजली नगर, आनंद कापड केंद्राच्या मागे, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ४. पुरूषोत्तम नागोराव मेहरे मयत चे वारस ४अ. हर्षल पुरूषोत्तम मेहरे रा. मु. पो. केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला. ४. राणी पुरूषोत्तम मेहरे रा. मु. पो. केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जनाबाई नारायण चांदूरकर
**पत्ता :-** रा.व्दारा राजेंद्र नागोराव मेहरे रा. प्रांजली नगर, आनंद कापड केंद्राच्या मागे. मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जनाबाई नारायण चांदूरकर यांचे दि. २९/१०/१९९७ रोजी उमरी प्र. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३४६/२०२६ — प्रोसेस नं.१०४६६/२०२६
चौ.ता. २९/०९/२०२६ — दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. विजया संजय सावरकर रा. रूख्मिनी नगर, मु. पो. गुडधी, अकोला. ता. जि. अकोला. २. वंदना प्रवीण गोमासे रा. वेद मंगल कार्यालय जवळ, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला. ३. मनोज दादाराव चतरकर रा. कापशी तलाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. दादाराव आनंदराव चतरकर २ प्रमिला दादाराव चतरकर
**पत्ता :-** रा. कापशी तलाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दादाराव आनंदराव चतरकर यांचे दि. ११/१०/२०२० रोजी व मयत प्रमिला दादाराव चतरकर यांचे दि. २०/१०/२०२४ रोजी कापशी तलाव, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय का स्तर बाळापुर**
**एम. एस. बारी यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर, बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/२१३/२०२६
नंदा भिमराव शेळके वि. कोणीही नाही
पुढिल तारिख २२-०९-२०२६

**अर्जदार :** १. नंदा भिमराव शेळके वय में ५६वर्ष धंदा घरकाम रा. मु.पो. मनारखेड ता. बाळापूर जि. अकोला २. रजनी अनुभव सिंह वय अ ४६ वर्ष धंदा घरकाम रा. ऑरमेट कॅलिस्टो, ए विंग ३०७, टेमघर, भिवंडी, दांडेकरवाडी, ठाणे ३. वृंदा संजय गाढवे वय अं ५२वर्ष धंदा घरकाम रा. टिचर कॉलनी, पारस, ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट ञ्च्छ् १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत शंकर मानाजी पवार हे दिनांक २६.१२.२०१७ रोजी रा. पारस ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. तसेच मयत कमलाबाई शंकर पवार या दिनांक १४.०४.२०२३ रोजी मौजे मनारखेड, ता. बाळापूर जि. अकोला मरण पावली. वरील नमुद अर्जदार हे मय्यत शंकर मानाजी पवार व मयत कमलाबाई शंकर पवार यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुद्ध इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक २२/०९/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १२.०८.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय क. स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३६२/२०२६ — प्रोसेस नं.१०४६९/२०२६
चौ.ता. ३०/०९/२०२६ — दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. नितीन विनोद गुप्ता रा. लाला लजपतराय हाउसिंग सोसायटी, जवाहर नगर, गोकुळ कॉलनी, अकोला, ता. जि. अकोला. २. सौ. उषा गोविंद भागेरिया रा. सोनाळा, ता. जि. बुलढाणा. ३. सौ. लक्ष्मी गिरीष अग्रवाल रा. खामगाव रोड, आदर्श नगर, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विनोद हरीराम गुप्ता
**पत्ता :-** रा.लाला लजपतराय हाउसिंग सोसायटी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विनोद हरीराम गुप्ता यांचे दि. ०४/०७/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२७६/२०२६ — प्रोसेस नं.९९४२/२०२६
चौ.ता. २२/०९/२०२६ — दिनांक : ०१/०८/२०२६

**अर्जदार :** १. कांचनबाई नवलचंद जैन २. प्रविणचंद नवलचंद जैन ३. प्रदीपकुमार नवलचंद जैन ४. राजेशकुमार नवलचंद जैन अर्जदार क. १ ते ४ रा. लक्ष्मी नगर, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. शिला अतुलकुमार जैन रा. १७३/५, एमएलए रेस्ट हाउसच्या समोर, टागौर नगर, रायपूर, छत्तीसगढ़.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नवलचंद चंपालाल जैन
**पत्ता :-** रा. निशु नर्सरी जवळ, लक्ष्मी नगर, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नवलचंद चंपालाल जैन यांचे दि. १०/०७/२०२६ रोजी मिलेनियम लाइफ केअर रिसर्च सेंटर नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२६९/२०२६ — प्रोसेस नं.१०१३३/२०२६
चौ.ता. १६/०९/२०२६ — दिनांक : ०५/०८/२०२६

**अर्जदार :** सुलोचना अवधुत लांडगे रा. हरिहर पेठ, राहुल नगर, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९०२८१३९६७९

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मनोज अवधुत लांडगे
**पत्ता :-** रा. हरिहर पेठ, राहुल नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मनोज अवधुत लांडगे यांचे दि. २०/०५/२०२६ रोजी हरिहर पेठ, राहुल नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३२४/२०२६ — प्रोसेस नं.१०३००/२०२६
चौ.ता. २२/०९/२०२६ — दिनांक : १०/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. दिपाली गणेश भटकर २. श्रीमती. कमलाबाई श्रीमंत भटकर रा. मु. पो. केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला. ३. उत्कर्ष गणेश भटकर ४. कु. दिव्यानी गणेश भटकर अर्जदार क. १, ३ व ४ रा. जिल्हा परिषद शाळा जवळ, कौलखेड, अकोला. चांदूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गणेश श्रीमंत भटकर
**पत्ता :-** रा. जि. प. शाळेजवळ, कौलखेड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गणेश श्रीमंत भटकर यांचे दि. ०८/०७/२०२६ रोजी निरामय हॉस्पिटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११४०/२०२६ — प्रोसेस नं.९१२१/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ — दिनांक : १८/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. रेखा दयानंद गायकवाड रा. ख्रिश्चन कॉलनी, धोबी खदान, मिशन मराठी शाळेजवळ, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. रोहिनी रूशल माने उर्फ रोहिनी दयानंद गायकवाड रा. आनंद नगर, ख्रिश्चन कॉलनी, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दयानंद मासाजीराव गायकवाड
**पत्ता :-** रा. ख्रिश्चन कॉलनी, धोबी खदान, मिशन मराठी शाळेजवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दयानंद मासाजीराव गायकवाड यांचे दि. २२/०५/२०१५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## बोरगावात घरफोडी; १.४५ लाखांचा ऐवज चोरी

**वर्धा** - बोरगाव (मेघे) येथील हरिरामनगर परिसरातील श्रीराम टाऊनमध्ये घरफोडी करून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने व रोकड असा तब्बल १ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना १३ ऑगस्टच्या रात्री घडली. याप्रकरणी नीलम तेलंग (३८) यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरटा घरात शिरला. घरातील बॅग घेऊन तो पसार होत असताना नीलम यांच्या निदर्शनास आला. अचानक चोरटा दिसल्याने त्या घाबरल्या. मात्र, स्वतःला सावरत त्यांनी घरातील कपाटाची पाहणी केली असता दागिने व रोकड चोरीस गेल्याचे समोर आले.चोरट्याने एकूण १ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.घटनेनंतर नीलम तेलंग यांनी शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पुढील तपास सहायक फौजदार दिनेश गायकवाड करीत आहेत.

## लाल्याने (कुत्रा) माजवली शहरात दहशत



**वर्धा/ जनमाध्यम**

शहरातील नागरिक शनिवार आणि रविवार असे सलग दोन दिवस एका बेवारस श्वानाच्या दहशतीखाली राहिले. या श्वानाने तब्बल ५९ नागरिकांना चावा घेऊन जखमी केल्याने शहरात खळबळ उडाली. यातील ३५ जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली, तर काहींनी खासगी रुग्णालयांत उपचार घेतल्याची माहिती आहे. अखेर रविवारी लोकप्रतिनिधींच्या सतर्कतेनंतर नगर पालिका प्रशासनाने मोहीम राबवून या श्वानाला पकडले.

शनिवार १५ ऑगस्ट रोजी सकाळपासूनच लाल रंगाच्या श्वानाने शास्त्री चौकात नागरिकांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. दिवसभरात सुमारे ३२ जणांना त्याने चावा घेतला. त्यानंतर दुपारच्या सुमारास आणखी १६ नागरिकांना त्याने लक्ष्य केले. त्यामुळे शहरातील विविध भागांत नागरिकांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली.

रविवारी १६ ऑगस्टलाही हा धुमाकूळ थांबला नाही. सकाळीच सुमारे ११ नागरिकांवर हल्ला करून श्वानाने त्यांना जखमी केले.बजाज चौकातील ऑटो स्टँड, शास्त्री चौक, रामनगर, कृष्णनगर, अग्निहोत्री कॉलेज परिसर, निर्मल बेकरी चौक, दयाल नगर तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरासह शहरातील विविध भागांत या श्वानाने नागरिकांवर हल्ले केल्याचे सांगण्यात येते. जखमींची संख्या वाढत गेल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात डॉग बाईटच्या रुग्णांची गर्दी झाली होती.सलग दोन दिवस नागरिकांवर हल्ले होत असल्याने पालिका प्रशासनाने श्वानाचा शोध सुरू केला. अखेर रविवारी दुपारी पालिकेच्या पथकाला श्वान पकडण्यात यश आले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मात्र, एकाच श्वानाने दोन दिवसांत ५९ नागरिकांना चावा घेण्याची घटना शहरातील भटक्या श्वानांच्या समस्येचे गांभीर्य अधोरेखित करणारी ठरली आहे. भटक्या श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी पालिका प्रशासन आणखी किती नागरिक जखमी होण्याची वाट पाहणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**श्वानाच्या हल्ल्यात लहान मुले, ज्येष्ठही जखमी**

श्वानाने चावा घेतलेल्यांमध्ये तरुणांसह लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश आहे. अचानक श्वान हल्ला करीत असल्याने अनेक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ३५ जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली.

**एक कुत्रा... संपूर्ण शहराला भारी!**

सलग दोन दिवस सुरू असलेल्या या हल्ल्याने वर्ध्यातील भटक्या श्वानांच्या प्रश्नावर पालिका प्रशास नाच्या उपाय योजनांवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

## यश स्वतःपुरते नको; समाजासाठी झिजवा - खा.काळे



**वर्धा/ जनमाध्यम**

एखाद्या व्यक्तीने मिळवि लेले यश केवळ त्याचे वैयक्तिक यश नसते. त्या यशामागे आई-वडिलांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे कष्ट आणि समाजाच्या शुभेच्छा असतात. त्यामुळे यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतर समाजाकडे पाठ न फिरवता त्याच समाजासाठी काहीतरी देण्याची भावना प्रत्येकाच्या मनात असली पाहिजे, असा संदेश खासदार अमर काळे यांनी दिला.

मला नोकरी हवी या विचारापेक्षा मला ज्ञान हवे, कौशल्य हवे आणि माझ्यासोबत इतरांसाठीही रोजगार निर्माण करायचा आहे, अशी तरुणाई घडली तर भारताला विकसित राष्ट्र बनण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. कष्ट करा, ज्ञान मिळवा, संशोधन करा, नवनिर्मिती करा आणि आपल्या यशाचा उपयोग समाजासाठी करा, असे आवाहन त्यांनी केले.

ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम, विश्व सिंधी सेवा संगम, स्नेहालय संस्था तथा सत्याश्रम मंडळ, वर्धा यांच्या वतीने हॉटेल वृंदावन सभागृहात डॉ. पलाश मोहन गौरशेट्टीवार यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून खासदार काळे बोलत होते.

डॉ. पलाश गौरशेट्टीवार यांनी पीएच.डी. पदवी मिळवून केवळ शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन केले नाही, तर शिक्षण, संशोधन, प्रशासन, नवोन्मेष आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाचा समन्वय साधत समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. ज्ञान मिळवून ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हीच खऱ्या अर्थाने यशाची सार्थकता असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार रविंद्र चांदेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. पलाश यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचे संस्कार आणि कुटुंबीयांचे योगदान मोठे आहे. त्यांचे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबाचा अभिमान नसून संपूर्ण वर्धा शहरासाठी अभिमानाची बाब आहे, असे नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ यांनी सांगितले.

यावेळी ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही यांनी डॉ. पलाश यांच्या कार्याचा गौरव करत शिक्षणासोबत संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला त्यांनी दिलेले महत्त्व उल्लेखनीय असल्याचे सांगितले. डॉ. मिलिंद सवाई, डॉ. विद्या कळसाईत, डॉ. प्रिती सत्यम आणि डॉ. शांतीलाल कोचर यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मिलिंद सवाई, रविंद्र चांदेकर, डॉ. प्रिती विजय सत्यम, डॉ. शांतीलाल कोचर गोल्डी, डॉ. विद्या

### डॉ. पलाश गौरशेट्टीवार यांचा गुणगौरव

कळसाईत, प्रा. डॉ. अनिस बेग, नवीन आहुजा, मोहन गौरशेट्टीवार, इमरान राही, किरण फुलझेले, विजय नाखले आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची प्रस्तावना विलास कुळकर्णी यांनी केली. ॲड. इब्राहिम बख्श आझाद यांनी सूत्रसंचालन केले, तर भगवानदास आहुजा यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक -प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष -१४ अंक -२६१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**
**मुख्य कार्यालयः-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

## प्रारंभीक अधिसूचना

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचे कार्यालय**
क्र.स.म.अ/भू.स/उवप्र/कावि-९४२/२०२६
दिनांक १२.०८.२०२६

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना**

भुसंपादन प्रकरण क्रमांक - ०७/एलएक्यू-४७/२०२५-२६, मौजा - रिंगणी, ता.सेलू, जि.वर्धा

ज्याअर्थी, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/(भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त अधिसूचना** असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त जमीन** असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, सदर्हु प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त नियम** असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**
**जमिनीचे वर्णन२५-२६१९-२०**
**मौजा - रिंगणी, ता.सेलू, जि.वर्धा**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १. | १० | ०.००१ |
| २. | १२/१, १२/२ | ०.०८ |
| ३. | १३ | ०.०३ |
| ४. | १४ | ०.५६ |
| ५. | १७ | ०.३९ |
| ६. | १८ | १.०३ |
| ७. | १९ | १.०५ |
| ८. | २० | १.४९ |
| ९. | २१ | ०.१२ |
| १०. | २२ | ०.८२ |
| ११. | २३ | ०.२७ |
| १२. | २५ | ०.६१ |
| १३. | ४४/१, ४४/२, ४४/३ | १.५५ |
| १४. | ४७ | ०.९० |
| १५. | ४८ | ०.१४ |
| १६. | ६५/१ ६५/२ | ०.०१ |
| १७. | ६६ | ०.०३ |
| १८. | ६७/१, ६७/२ | ०.९६ |
| १९. | ६८ | ०.३६ |
| २०. | ६९ | ०.१५ |
| २१. | ७० | ०.६१ |
| | **एकुण** | **११.१६१** |

**अनुसूची दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | - | वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या लिंक-१ अंतर्गत मुख्य कालव्याच्या बांधकाम करण्याकरीता |
| सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन | - | वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या लिंक-१ अंतर्गत मुख्य कालव्याच्या बांधकाम करण्याकरीता |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार पायाभूत सुविधा, सोयी सुविधा, याबाबत व इतर लाभासंबंधात) | - | या प्रकल्पामुळे ता.सेलू जि.वर्धा येथील २२६.२० हे.आर. जमिनीस सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सिंचनाकरीता व सार्वजनिक पाणी पुरवठा होणार असल्यामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचबरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे. |

**अनुसूची - तीन**

| | | |
|---|---|---|
| बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे | - | कुणीही व्यक्ती किंवा कुटूंब विस्थापित होत नाही. |

**अनुसूची - चार**

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) | - | मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क.भूसंपादन/कार्या-४(१)/कावि-३५७/२०२६ दि.२८.०७.२०२६ अन्वये भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ६(२) व कलम १० चे परंतुकानुसार प्रकरण दोन व तीन च्या तरतुदी लागू होत नाहीत. |

**अनुसूची - पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**--- निरंक ---**

**विशेष नोंद -**
उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

दिनांक - १२.०८.२०२६
ठिकाण - वर्धा

**(क्र.विमाका-वर्धा/११८/२०२६-२०२७)**

**स्वाक्षरी/-**
**जिल्हाधिकारी, वर्धा**

# आमदार सोनवणे यांच्या विरोधात पत्रकार आक्रमक

## जुन्नरमधील पत्रकार सुरेश वाणी यांना धमकावल्याचा निषेध



**अमरावती/प्रतिनिधीः-**
जुन्नर तालुक्यातील अंजनावले गावात शेतकऱ्यांच्या समस्या मांडत असलेल्या पत्रकार सुरेश वाणी यांना आमदार शरद सोनवणे यांनी शिवीगाळ करत धमकावल्याच्या घटनेचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या प्रकरणी संघाच्या प्रतिनिधी मंडळाने आज सोमवार १७ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आमदारांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. माहितीनुसार, जुन्नर तालुक्यातील अंजनावले गावातील आश्रम शाळेमध्ये अदाणी प्रकल्पग्रस्त प्रश्न मांडण्यासाठी पत्रकार सुरेश वाणी तेथे गेले होते. त्याचवेळी तेथे आलेल्या आमदार शरद सोनवणे यांनी पत्रकार वाणी यांना असंसदीय भाषेत शिवीगाळ केली आणि धमकी दिली. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. व्हिडिओ मध्ये आमदार सोनवणे पत्रकाराला स्पष्टपणे धमकावताना ऐकू येत आहेत.या घटनेचा निषेध करताना पत्रकार संघाने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आमदारांवर त्वरित कारवाई करावी, राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन त्यांना संरक्षण द्यावे. जर आमदार शरद सोनवणे यांनी या घटनेबद्दल सार्वजनिकरित्या माफी मागितली नाही, तर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. निषेध करणाऱ्यांमध्ये मध्ये विदर्भ प्रदेश अध्यक्ष नयन मोंढे यांच्या सह विनोद इंगळे, अमोल खडसे, नकुल नाईक, नितीन मुळे, सोमेश्वर जेवडे, मनीष गुडधे, प्रतिक्षा गजभिये, उल्हास अडसड, सतिश पाटील, पंकज मेश्राम, आणि खोजयमा खुर्रम आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशांत नगर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

अमरावती/प्रतिनिधीः-
स्वातंत्र्य दिनाच्या उत्साहाने १५ ऑगस्ट २०२६ ला सकाळी ८:१५ वाजता अतिशय सुशोभित व्यवस्थेसह Healthy Breakfast studio Nutrition world संचालित रमेश रामटेके प्रशांत नगर चौक अमरावती येथे विविध राष्ट्र हिताचे कार्यक्रम , राष्ट्रगीते , मान्यवरांचे विषयावर विचारांनी कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाला प्रामुख्याने



सेंटर संचालित रमेश रामटेके सहपरिवार हजर होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष एस. बी. खोब्रागडे (शिक्षणाधिकारी से. नि.) तथा मान्यवराच्या विचारांनी कार्यक्रमाचे महत्त्व विषद करण्यात आले.

# कपडे वाळत टाकताना दुसऱ्या माळ्यावरून पडून महिलेचा मृत्यू

अमरावती/प्रतिनिधीः-
कपडे वाळत टाकण्यासाठी घराच्या दुसऱ्या माळ्यावर गेलेल्या ५५ वर्षीय महिलेचा अचानक पाय घसरून तोल गेला आणि त्या उंचावरून खाली कोसळल्या. डोक्याला व शरीराच्या अन्य भागांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, रविवारी रात्री उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने मोतीनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अरुणा फाटे (वय ५५, रा. मोतीनगर, अमरावती) असे मृत महिलेचे नाव आहे. रविवारी (१६ ऑगस्ट) सायंकाळी सहा ते साडेसहाच्या सुमारास त्या नेहमीप्रमाणे कपडे वाळत टाकण्यासाठी घराच्या दुसऱ्या माळ्यावर गेल्या होत्या. याचवेळी अचानक त्यांचा पाय घसरला. क्षणात तोल गेल्याने त्या दुसऱ्या माळ्यावरून खाली कोसळल्या. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला तसेच हात-पायांना गंभीर दुखापत झाली. आवाज ऐकून नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनी धाव घेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. सुरुवातीला शहरातील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच त्यांची प्रकृती अधिक खालावली आणि अखेर मृत्यूशी सुरू असलेली झुंज अपयशी ठरली. अरुणा फाटे यांच्या निधनाची बातमी समजताच नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला.घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळाची माहिती घेतली. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांकडून अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत.


**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात**

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी 2025**

मान्य दिनांक : 20/07/2026
प्रसिद्धी दिनांक: 24/07/2026

संस्थेचे नाव :- (270713SC013) SHREE RAMCHANDRA EDUCATION (Secondary / Higher Secondary) - With Interview
शैक्षणिक स्तर :- Secondary / Higher Secondary

SHREE RAMCHANDRA EDUCATION या व्यवस्थापनाच्या श्री [illegible] विद्यानिकेतन मोझरी ता. तिवसा जि.अमरावती या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अनु. जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 2 | एसईबीसी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| | | | | | | | | एकूण | 02 |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दिनांक : २०/०७/२०२६

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिक्षणविषयाचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/ CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(6-8) | Consolidated PAY-GT 6-8 (16000) | Aided | Language (English) | — | Graduation | Diploma / Graduation | TET PAPER 2 (Any Subject)/ CTET PAPER 2 (Any Subject) | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated PAY-GT 9-10 (18000) | Aided | Mathematics | Marathi | Graduation | Graduation | ---- | 1 |
| | | | | | | | | | Total | 2 |

सर्वसाधारण सुचना :- 1) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-2025 (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराने पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर [illegible] नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

अध्यक्ष / सचिव
श्री रामचंद्र युवक कल्याण संस्था मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती


**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१६३४/२०२६
Afsari + ५-वि-निरंक
पुढील ता.०९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Afsari Bano D/o. Sayed Badroddin**
   Age 50 years. Occu.: Household
   R/o. Near Rathi Clinic, Nagpur Gate, Amravati
2. **Sayed Anisuddin S/o. Sayed Badroddin,**
   Aged 48 years, Occu.: Labour
   R/o. Near Rathi Clinic, Nagpuri Gate, Amravati
3. **Sayed Fahimoddin S/o. Sayed Badroddin,**
   Aged 43 years, Occu.: Labour
   R/o. Near Miskin Shah Masjid, Nagpuri Gate, Amravati
4. **Sayed Hafizuddin S/o Sayed Badroddin,**
   Aged 42 years, Occu.: Labour
   R/o. Near Dr. Rathi Hospital, Nagpuri Gate, Amravati
5. **Nadimuddin S/o. Sayed Badruddin**
   Aged 42 years, Occu.: Labour
   R/o. Near Nazim Pan Center, Nagpuri Gate, Amravati
6. **Syed Nazimoddin S/o. Sayed Badroddin**
   Aged 35 years, Occu.: Labour
   R/o. Near Miskin Shah Masjid, Nagpuri Gate, Amravati

विरुध्द

गैरअर्जदार - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Mehrunnisa Sayed Badroddin** हया दिनांक १३.०७.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Afsari Bano D/o. Sayed Badroddin + 5** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Afsari Bano D/o. Sayed Badroddin + 5** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१४४२,
मंगला + ४-वि-निरंक
पुढील ता.२१.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Sau. Mangala W/o. Manohar Thakre,**
   Age 59 years. Occu.: Household,
   R/o. 13/A, type-4, Sector 5, CTC Chandrapur Ord Factory
   Sub-District Chandrapur- 442501
2. **Pradip S/o. Pundlikrao Sahare**, Aged 56 Yrs.
   R/o. Ward No. 6, Budhvar Bazar, Shivaji Ward,
   Dhamangaon Railway, Dist. Amravati
3. **Deceased Gajanan s/o. Pundlikrao Sahare**,
   by his legal heirs
3- **i) Shrimati Ranjana wd/o. Gajanan Sahare**
   Age 43 years, Occ.- Household
   **ii) Ku. Anushka Gajanan Sahare**, Age 22 years, Occ.- Education
   **iii) Ku. Apurva Gajanan Sahare**, Age 20 years, Occ.- Education
   **iv) Aryan Gajanan Sahare,** Age 18 years, Occ.- Education
   Applicants No. 3) (I) to 3 (IV) are
   R/o. Telipura, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati
4. **Sau. Rekha w/o. Pandurang Bhajbhuje**
   Age 55 years,. Occu. - Household,
   R/o. Hanuman Ward, Shegaon Buj, Warora,
   Dahegaon, Chandrapur- 442901
5. **Sau Jyoti w/o. Vinod Bharadkar**
   Age 52 years,. Occu. - Household
   R/o. Guru Govind Swami Mandir, Samachi Ward No.2
   Chandrapur - 442401

विरुध्द

गैरअर्जदार - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Pundlikrao Vishnaji Sahare** हया दिनांक १२.०३.२०१४ रोजी अमरावती येथे मयत झाले. तसेच **Lilabai Pundlikrao Sahare** या दि.०४.०३.२०२१ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Sau. Mangala Manohar Thakare+4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sau. Mangala Manohar Thakare+4** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२३२/२०२६ — ने.ता.१५.०९.२०२६

**१. प्रविण विश्वंभर भेंडे**
**२. भानुदास विश्वंभर भेंडे**
**३. चंद्रभान विश्वंभर भेंडे** — सर्व रा.निमसवाडा, पो.वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
**४. रेखा हरिभाऊ भोंबे** — रा.धानोरा गुरव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.यवतमाळ

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत विश्वंभर सदाशिव भेंडे** यांचा **मृत्यू दि.३१.०८.२०१८** मध्ये निमसवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे आई नामे **इंदू विश्वंभर भेंडे** यांचा **मृत्यू दि.२०.०५.२०२१** मध्ये निमसवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ते ३ ही मुले असून अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १४ ऑगष्ट २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१८४/२०२६ — ने.ता.१५.०९.२०२६

**१. हिरुबाई राजेंद्र सोमकुवर**
रा.मांजरी म्हसला , ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी, **मयत प्रफुल गजेंद्र सोमकुवर** यांचा **मृत्यू दि.०३.०५.२०२६** मध्ये डॉ. **राजेंद्र गोळे रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ही आई आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १४ ऑगष्ट २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६३२/२०२६
Syed Aasimuddin S/o Sayed Sharifuddin+2 **-वि- निरंक**
पुढील ता.१७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Syed Aasimuddin S/o Syed Sharifuddin, Aged 45 Yrs. Occu.: Labour
   R/o Near Madrasi Baba, Haidar Pura, Amravati
2. Syed Waseemuddin S/o Syed Sharifuddin, Aged 42 Yrs. Occu.: Labour
   R/o Near Madrasi Baba, Haidar Pura, Amravati
3. Asma Aliya W/o Sarfaraz Khan, Age 39 Yrs. Occu.: Household
   R/o Near Sadiq Waermen House, Taj Nagar No.1, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shed Sharifoddin Syed Gyasoddin हे दिनांक 22.09.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Syed Aasimuddin S/o Syed Sharifuddin+Others यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Syed Aasimuddin S/o Syed Sharifuddin+Others वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२२०/२०२६ — ने.ता.०८.०९.२०२६

**१. मुनेश्वर पांडूरंग मेश्राम**
**२. मिनानाथ पांडुरंगजी मेश्राम**
दोन्ही रा.सुलतानपुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत पांडूरंग लक्ष्मणराव मेश्राम** यांचा **मृत्यू दि.०५.०५.२०१३** मध्ये सुलतानपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे पत्नी नामे **जनाबाई पांडुरंगजी मेश्राम** यांचा **मृत्यू दि.२७.०९.२०१६** मध्ये **सुलतानपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ते २ ही मुले आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १४ ऑगष्ट २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६२९/२०२६
**लीना अविनाश कोकाटे -वि- निरंक**
पुढील ता.१७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Leena Avinash Kokate
Aged about 47 Yrs. Occu.: Housewife
R/o Karatwadi, Tq. Akot, Dist. Akola

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Mamta Chaitanyaprabhu Armal हे दिनांक 29.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Leena Avinash Kokate यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Leena Avinash Kokate वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.२३४/२०२६ — ने.ता.१६.०९.२०२६

**अर्जदार :**
१. शिला शंकरराव गुल्हाने
२. मंगेश शंकरराव गुल्हाने
३. रोशन शंकरराव गुल्हाने
४. किरण शंकरराव गुल्हाने, रा.पापळ. ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
५. रुपेश शंकरराव गुल्हाने,
रा.वार्ड नं.२ पापळ. ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **शंकर नारायण गुल्हाने** यांचा मृत्यू दि.**०६.०६.२०१९** रोजी **पापळ,** ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार २, ३, ५ ही मुले असून अर्जदार नं.४ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**५३ वा वार्षिक अहवाल सन २०२५-२०२६**
**राष्ट्रीय इलेक्ट्रीकल रुरल वर्कर्स को-ऑप क्रेडिट सोसायटी**
**लि.अमरावती र.नं. १६३**
**वार्षिक साधारण सभेची सुचना**

जावक क्र. २०/२०२६

कार्यालय
नमुना गल्ली नं.२, अमरावती
दिनांक - १६/०८/२०२६

**सम्माननीय सभासद,**
**सस्नेह नमस्कार**

राष्ट्रीय इलेक्ट्रीकल रुरल वर्कर्स को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.अमरावती र.नं. १६३ या संस्थेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.०६/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता, रंगोली मंगल कार्यालय, कठोरा नाका, अमरावती** येथे संस्थेचे अध्यक्ष **श्री नितिन अ.करडे** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करुन ठराव मंजुर करण्याकरिता आयोजित केली आहे. तरी सर्व सम्माननीय सभासदांची उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**एच.बी.भोंबे**
सचिव
संचालक मंडळाचे आदेशान्वये

**टिप :-** वार्षिक सभेची विषय सुची संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेला आहे.

**विशेष सुचना :-** **१)** कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच विषयावर त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
**२)** सभेत ज्यांना प्रश्न विचारावयाचे असतील किंवा सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्यांचे प्रश्न/सुचना संस्थेच्या कार्यालयात सभेपूर्वी तीन दिवस अगोदर लेखी पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य होणार नाही.

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.२३३/२०२६ — ने.ता.१५.०९.२०२६

**अर्जदार :** १. सुशिला उकंडराव लाहे
रा.भगवान सुतार चाळ, रुम नं.७७,
सुनिल जनरल स्टोअर्स मागे, शिरवाने गांव,
नवी मुंबई ठाणे, ता.जि.ठाणे

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **उकंडराव दमडाजी लाहे** यांचा मृत्यू दि.**०६.०६.२०१९** रोजी **पिंपळगांव बैनाई,** ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे **अन्नपूर्णा उकंडराव लाहे** यांचा मृत्यू दिनांक **०२.०६.२०२१** मध्ये **पिंपळगांव बैनाई,** ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताची अर्जदार ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Sharad Balbhim Kaldate
Jt.C.J.J.D.J.M.F.C. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES**
**(0.5, R, 1, 5)**

R.C.S./53/2019
**Raju @ Rajkumar Sheetaldas Zambani - Vs - Ravindra Narayan Bhatkar 7**
**Next Date 29.09.2026**

To,
1. Shobha Dnyaneshwar Umbarkar, Amravati.
New Hanuman Nagar,Tq.Dist.Amravati (Maharashtra)
2. Nilesh Ramesh Suryawanshi
New Hanuman Nagar, Amravati.

Whereas **Raju @ Rajkumar Sheetaldas Zambani** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 29.09.2026 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice, that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 16.07.2026

शिक्का
**Jt.C.J.J.D. J.M.F.C. Amravati**

**Notice :** 1. Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, you can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2. If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

‘दैनिक जनमाध्यम’ मध्ये स्कूल बस मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा दृष्टीने प्रकाशित विविध वृत्तांची

# अचलपूर पं. स. शिक्षण विभागाने घेतली दखल

**अचलपूर / वार्ताहर**

दैनिक जनमाध्यम मध्ये अचलपूर तालुक्यातील स्कूल बस मधील विद्यार्थी सुरक्षेचा प्रश्नासंदर्भात विविध वृत्त प्रकाशित झाले होते.याची तत्काळ दखल घेत अचलपूर पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे परतवाडा शहरातील एस.जी.बॉइज अँड गर्ल्स हायस्कूल मध्ये १३ ऑगस्ट रोजी तालुकास्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा व मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अचलपूर तालुक्यातील खाजगी व शासकीय शाळेचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते .यावेळी अचलपूर पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी नंदकिशोर खरात,स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे विजय गराड, आरटीओ विभागाचे यश वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते प्रवीण तोंडगावकर प्रामुख्याने उपस्थितीत होते.अचलपूर तालुक्यातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित स्कूल बस मध्ये अग्निशमन यंत्र आणि प्राथमिक आरोग्य पेटी सह सीसीटीव्ही , कागदपत्रे व विद्यार्थी संख्या आदी नियमाचे पालन करण्याचे मान्यवरांनी उपस्थितीत मुख्याध्यापकांना सूचना केल्या. एकीकडे दैनिक जनमाध्यम मध्ये स्कूल बस संदर्भात वृत्त प्रकाशित झाल्यानंतर अचलपूर स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील खाजगी व शासकीय शाळेची स्कूल बसची तपासणी मोहीम प्रारंभ झाली .आणि १३ ऑगस्ट रोजी अचलपूर पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे परतवाडा शहरातील एस.जी.बॉइज अँड गर्ल्स हायस्कूल मध्ये तालुकास्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा व मार्गदर्शन सभा संपन्न झाली.यावेळी उपस्थितीत मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.यानंतर मान्यवरांनी रिद्धपूर येथे घडलेल्या त्या घटनेचा उल्लेख केला.यावेळी स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे विजय गराड यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखा अचलपूर चे अधिकारी - कर्मचारी यांनी चिखलदरा रस्ता ,अंजनगाव सुर्जी मार्ग सोबतच बैतूल




मार्गावर तैनात होऊन स्कूल बस वाहनाची तपासणी करीत आहे .आणि यामुळे शासकीय नियमाचे उल्लंघन करणाऱ्या स्कूल बस वाहनावर वर कारवाई केली जात आहे.यामध्ये काही स्कूल बस वाहनाकडे कागदपत्रांचा अभाव , अधिक क्षमतेने विद्यार्थी बस मध्ये असल्याचे गंभीर बाबी समोर आल्याचे सुद्धा त्यांनी याप्रसंगी नमूद केले.यामुळे ही मोहीम यापुढे ही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.आणि अचलपूर तालुक्यातील सर्व स्कूल बस मध्ये अग्निशमन यंत्र आणि प्राथमिक आरोग्य पेटी सह सीसीटीव्ही ची सुविधा तत्काळ उपलब्ध करण्याचे त्यांनी सांगितले .यानंतर अचलपूर पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी नंदकिशोर खरात यांनी सांगितोर की ,अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर सारखी घटना अचलपूर तालुक्यात ही भविष्यात घडू नये यासाठी तालुक्यातील अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये सर्व वाहतूक नियमाचे पालन करण्याचे त्यांनी सांगितले. तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रवीण तोंडगावकर यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,अचलपूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातून जुळ्या शहरातील अनेक खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने संबंधित स्कूल बस मधून दररोज ये - जा करतो. मात्र या सर्व खाजगी स्कूल बस मध्ये महिला मदतनीस ची विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा दृष्टीने बस मध्ये प्रवेश आणि परत घरी जात असताना विद्यार्थ्यांना सुखरूप बस मधून उतरविण्यासाठी नियुक्ती ची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.सोबतच आरटीओ विभागाचे यश वाघमारे यांनी सांगितले की,तालुक्यातील खाजगी स्कूल बस ची कागदपत्रे,त्या बस मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे,अग्निशमन यंत्र आणि प्राथमिक आरोग्य पेटी उपलब्ध राहणे आवश्यक आहे.शासनाने राज्यातील स्कूल अपघाताच्या अनुषंगाने शालेय स्कूल बस धोरण मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.सर्व स्कूल बसमधील आसन क्षमता, कंत्राटी स्कूल बससाठी वाहनांचा रंग, शाळेचे नाव, प्रवास करणाऱ्या मुलांची यादी, घरापासून शाळेपर्यंतचा प्रवास आदी मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे त्यांनी सर्व उपस्थितांना सांगितले . एकीकडे रिद्धपूर येथे घडलेल्या त्या घटनेनंतर पालक आणि विद्यार्थी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.विद्यार्थी वाहतुकीबाबत वारंवार घडणाऱ्या घटनां ना आळा घालण्यासाठी ही सभा महत्वपूर्ण ठरणार आहे .आणि यासभेतील सूचना आता उपस्थितीत सर्व अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील मुख्याध्यापक आपआपल्या शाळेतील विद्यार्थी वर्ग व पालक सभेत पालकांना देणार आहे .यामुळे अमरावती जिल्ह्यात रिद्धपूर येथे घडलेल्या त्या दुर्दैवी घटनेनंतर जिल्ह्यासह अचलपूर तालुक्यातील एकही निष्पाप विद्यार्थ्यांचा बळी जाऊ नये यासाठी दैनिक जनमाध्यम मध्ये स्कूल बस संदर्भात प्रकाशित होत असलेली वृत्ता ची दखल अचलपूर पंचायत समिती शिक्षण विभागाने घेऊन ही सभा आयोजित केल्याने दैनिक भास्कर चे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ग्रामसभा न घेतल्याने पळसखेडमध्ये नागरिक आक्रमक; ग्रामपंचायतीला ठोकले कुलूप



**चांदूर रेल्वे / वार्ताहर**

चांदूर रेल्वे तालुक्यातील पळसखेड येथे स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी ग्रामसभा न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली. दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभा घेण्याची परंपरा असताना यंदा ग्रामसभा आयोजित करण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयात एकत्र येत आक्रमक भूमिका घेतली. ग्रामसभा होणार असल्याने अनेक नागरिक सकाळपासून ग्रामपंचायत कार्यालय परिसरात उपस्थित झाले होते. मात्र, ग्रामसेवक तसेच सरपंच यांच्यापैकी कोणीही उपस्थित न राहिल्याने ग्रामस्थांचा संताप वाढला. अखेर नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकत निषेध नोंदविला. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयातील टेबल-खुर्चाही बाहेर काढण्यात आल्या. ग्रामसभेच्या माध्यमातून गावातील विकासकामे, निधीचा वापर, विविध योजनांची अंमलबजावणी आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत नागरिकांना माहिती मिळणे अपेक्षित असते. मात्र, ग्रामसभा न घेतल्याने गावकऱ्यांना प्रश्न आणि विचारण्याची ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा हिशोब मागण्याची संधी मिळत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, ग्रामसभा न घेतल्याच्या मुद्यावरून ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनामुळे पळसखेडमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. स्वातंत्र्यदिनी ग्रामसभा घेण्याचे कुठलेही नियोजन नव्हते व नोटीस सुद्धा काढली नव्हती. ३० तारखेपर्यंत ग्रामसभा घेता येते व याचे नियोजन पुढे करण्यात येईल.

> स्वातंत्र्यदिनी ग्रामसभा घेण्याचे कुठलेही नियोजन नव्हते व नोटीस सुद्धा काढली नव्हती. ३० तारखेपर्यंत ग्रामसभा घेता येते व याचे नियोजन पुढे करण्यात येईल.
>
> **लता गजानन महल्ले,**
> प्रशासक सरपंच, पळसखेड

### श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात ‘हर घर तिरंगा’ अभियान

**अमरावती**- स्थानिक श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती (१६२) येथे ‘हर घर तिरंगा’ अभियानाच्या अनुषंगाने विविध देशभक्तीपर उपक्रम व कार्यक्रमांचे १३ ऑगस्ट ला आयोजन करण्यात आले.माय भारत पोर्टलवर नोंदणी - या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांची (माय भारत) पोर्टलवर यशस्वीरीत्या नोंदणी करण्यात आली.देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर हुतात्म्यांना आणि क्रांतिकारकांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

## कुरेशी मोहल्ल्यात पोलिसांची दोन ठिकाणी धडक कारवाई



### तीन आरोपींना अटक ऐकवून ७६० किलो गोमांस जप्त, शहरात खळबळ

**धामणगाव रेल्वे / वार्ताहर**

दत्तापूर पोलिसांनी स्थानिक आठवडी बाजार परिसरात दोन ठिकाणी धडक कारवाई करत ७६० किलो गोमांस जप्त केले आहे. या कारवाईने शहरात खळबळ माजली आहे. या प्रकरणात पोलिसांनी घटस्थळावर दोन तर फरार झालेला आरोपी असे एकूण तीन आरोपींना अटक केली आहे.

पोलीस स्टेशन दत्तापुर येथे गोपनीय माहिती मिळाली की, कुरेशी मोहल्ला आठवडी बाजार दत्तापुर येथे दोन ठिकाणी अवैधरित्या गोवंशाची कत्तल करणे चालू आहे, अशा माहिती वरून पोलीस स्टाफ व पंचा सह जाऊन रेड केली असता आरोपी मोहम्मद जावेद गुलाम नेबी वय ५४ वर्ष आठवडी बाजार दत्तापुर, यांच्या घरात २३० किलो गोवंश मास, किंमत ४६००० रु व गोमांस कापन्या करीत वापरलेले लोखंडी सुरा, कुऱ्हाड असा माल मिळून आला तसेच दुसऱ्या ठिकाणी आरोपी १ तहीर अहेमद मोहम्मद सादिक, वय ३४ वर्षे, २ मोहम्मद फझील मोहम्मद झाकीर, वय २७ दोन्ही रा आठवडी बाजार दत्तापुर हे जागीच मिळून आले आरोपी क्र ०३ मोहम्मद साजिद मोहम्मद साबीर, रा आठवडी बाजार दत्तापुर हा घटनास्थळ वरून पळून गेला, सदर ठिकाणा वरून ५३० किलो गौमास, व कापण्याकरिता वापरले लोखंडी सुरे,कुऱ्हाड , लाकडी ठोकला असा एकूण १०६३५० रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, पोलीस स्टेशन दत्तापुर येथे प्राणी संरक्षण अधिनियम कायद्या अंतर्गत आरोपी विरुद्ध दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे, फरार आरोपी मोहमद साजिद मोहम्मद साबीर यास सुद्धा अटक करण्यात आली

सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक सा, अमरावती ग्रामीण व मा उपविभागीय पोलीस अधीकरी सा चांदुर रेल्वे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गजानन मेहेत्रे, सपोनि गजानन गजभारे, पोउपनी हरिहर गोरे, पोलीस हेड कॉन्स्टेबल हरिहर वैद्य, अतुल पाटील, दीपक पंधरे, प्रवीण चौधरी, सोनू भालेराव, मयुर धवक, उमेश यादव, अभय जाधव,राम सोळंके, दुर्गा झेले, जयश्री ताथड, चालक मनोज धोटे यांनी केली.

## महिला महाविद्यालयाद्वारे स्तनपान जनजागृती उपक्रम




**अमरावती/का.प्र.**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय अमरावती येथील गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने संत गजानन महाराज पब्लिक स्कूल, पांढरी येथे स्तनपान सप्ताह निमित्त स्तनपान जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. पांढरी परिसरातील गर्भवती महिला, स्तनदा माता यांना विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या पोस्टरच्या साह्याने स्तनपान व आहारासंबंधी माहिती दिली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या संचालक मा. विद्या माहोरे तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. कीर्ती गांधी आणि प्रा. डॉ. श्रुती रत्नपारखी या होत्या. डॉ.कीर्ती गांधी स्तनपान सप्ताहाबद्दल आपले विचार व्यक्त करताना म्हणाल्या की ’स्तनपान म्हणजे फक्त आहार नाही तर प्रेम सुरक्षा आणि बालकाच्या निरोगी भविष्याची खात्री आहे’ प्रा. डॉ. श्रुती रत्नपारखी गर्भवती महिला व स्तनदा माता यांना स्तनपान सप्ताह विषयी मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की ’आपल्या बालकांच्या निरामय आयुष्याच्या सुरुवातीसाठी स्तनपान अतिशय आवश्यक आहे. त्याला अधिक बळकट करा’ या विषयाला अनुसरून त्यांनी महिलांमधील स्तनपानाविषयीच्या चुकीच्या समजुती दूर करून स्तनपानाविषयी व आहाराविषयी योग्य मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेच्या संचालक विद्या माहोरे यांनी गर्भवती महिला व स्तनदा माता यांनी या काळामध्ये बालकांच्या आरोग्याबाबत जागरूक असणे आवश्यक आहे असे सांगितले.

कार्यक्रमानंतर गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या हस्ते खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजल भोकरे आणि आभार प्रदर्शन मीनाक्षी पडळकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. शितल हिवे, प्रा. प्रियंका चौधरी आणि प्रा. पूजा धर्माळे यांनी परिश्रम घेतले. हा उपक्रम प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर व गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. भावना वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली गृहअर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी राबविला. नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या सन्माननीय कार्यकारिणीने कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता सर्वांचे अभिनंदन केले.

## विशाल पणपालिया यांची लॉयन्स क्लबच्या अध्यक्षपदी निवड



**धामणगाव रेल्वे :**येथील लॉयन्स क्लबचा ३३ वा पदग्रहण सोहळयात शहरातील सुप्रसिद्ध समाजसेवी लॉयन विशाल पणपालिया यांची धामणगाव लॉयन्स क्लबच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

समाजसेवेच्या अग्रगण्य संघटनांपैकी एक असलेल्या लॉयन्स क्लब चा पदग्रहण सोहळा प्रभू श्रीरामांच्या पावन नगरी अयोध्या येथे शुक्रवारी ७ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला. या पदग्रहण सोहळ्यात शहराच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.यावेळी शहर व तालुक्यातील विविध सामाजिक कार्यात सहभागी असलेले युवा उद्योजक लॉयन विशाल पणपालिया यांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.विशाल पणपालिया येथील साई मंदिर संस्थांचे संचालक असून आपल्या मृदू व मनमिळावू स्वभावाने सर्वपरिचित आहेत.दरम्यान लॉयन्स क्लब च्या अध्यक्ष म्हणून त्यांची निवड ही त्यांच्या सामाजिक कार्याची दखल असल्याचे यावेळी लॉयन्स क्लबचे माजी अध्यक्ष अतुल भोगे यांनी सांगितले. यावेळी लॉयन मनोज मुंधडा यांची सचिव तर लॉयन प्रफुल्ल (बाळा) पोळ यांची कोषाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.कार्यक्रमाला रीजन चेअरपर्सन लॉयन विलास बुटले तसेच साप्ताहिक नया भारतचे संपादक अशोक मुंधडा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी रमेशचंद्र चांडक, रामराव अतकरे, सुरेश लोहिया,रामेश्वर चांडक,अतुल भोगे, आशीष मुंधडा, प्रसन्न भंडारी, कमल टावरी,मेहेर निस्ताने, आशीष पणपालिया, मुस्तफा बोहरा,पवन राठी, राजू पुरोहित,संजय वर्मा, योगेश मुंधडा, रमेशठाकरे व लॉयन विजय रोगे यांच्यासह अनेक लॉयन्स क्लब सदस्य उपस्थित होते.

## महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन



**अमरावती** - महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन अमरावती तर्फ एम एच डि ए सभागृह बडनेरा रोड अमरावती येथे ८० वा स्वातंत्र्य दिन सकाळी ८.०० वाजता उत्साहात साजरा करण्यात आला .या वेळीसंघटनेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती लबडे -पडोळे,सचिव डॉ. नंदकिशोर भूतडा, घ्झ्इ डॉ. अशोक उमप, उपाध्यक्ष डॉ. मनोज चौधरी, प्रकल्प प्रमुख डॉ. विपुल भट्टड , लेडीविंग चेअरपर्सन व सहप्रकल्प प्रमुख डॉ. शितल आचार्य व पूर्वाअध्यक्ष व संपूर्ण कार्यकारिणी यांच्या समवेत अध्यक्षा डॉ स्वाती पडोळे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्या आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन राष्ट्रीय गीत व राष्ट्रगान म्हणण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प प्रमुख डॉ .विपुल भट्टड यांनी केले. मंचावर संघटनेच्या अध्यक्षा, सचिव आय पी पी , पूर्वअध्यक्ष डॉक्टर अनिल खेरडे, लेडी विंगचेअर पर्सन , प्रकल्प प्रमुख उपस्थित होते . दीपप्रज्वलन व सॅम्युएल हॅनिमन यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाला संघटनेचे पूर्वाध्यक्ष डॉ. अनिल खेरडे, डॉ. वाठोडकर, डॉ. गजानन राऊत , डॉ. आशिष धर्माळे, डॉ संजय कथलकर, डॉ. राजीव रोडे, डॉ. प्रताप ठोके, डॉ. एन एस नईम , डॉ. जावेद अन्वर, डॉ. वडनेरकर,डॉ .पंडित सवई, डॉ. दहिकर , डॉ.प्रदीप लढा, डॉ. दीपक करवा, डॉ. श्रीराम राठी,डॉ.हमीद अली, डॉ. पवन साबू, डॉ. गजानन कुंभालकर, डॉ. संदीप बुटे, डॉ. अभिजित रंगे, डॉ. विकी पिंजानी, डॉ. विकास हटवार, महिला कार्यकारिणी डॉ. माया इंगळे, डॉ. प्रिया मोहोड, डॉ .वैशाली टेंभे,डॉ .प्रज्ञा घाटोळ, डॉ. स्नेहा पिंजानी उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिव डॉक्टर नंदकिशोर भुतडा यांनी केलेकार्यक्रमाची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ. वैशालीटेंभे व सहप्रसिद्धी प्रमुख डॉ. प्रज्ञा घाटोळ यांनी माध्यमांना कळविले.

## संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्था अंतर्गत अमरावतीत ‘वाचन कट्टा’



**अमरावती:** संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट छत्रपती संभाजी महाराज चौकयेथे दुसऱ्या ’वाचन कट्टा’ उपक्रमाचे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. समाजातील नागरिकांमध्ये वृत्तपत्रे आणि पुस्तके वाचण्याची आवड निर्माण व्हावी, त्यांना देश-विदेशातील घडामोडींची माहिती मिळावी आणि त्यांचा वेळ सत्कारणी लागावा, या मुख्य उद्देशाने संस्थेने हा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.अमरावतीच्या मा खा नवनीत राणा यांचे स्वीय सहाय्यक विनोदजी गुहे आणि पोलीस भरती २०२६ परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले समाज बंधू कवठाळे यांच्या शुभहस्ते या दुसऱ्या वाचन कट्ट्याचे उद्घाटन पार पडले. यापूर्वी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून श्री छत्रपती शिवाजी महाराज गेटजवळ, महाजनपुरा, अमरावती येथे पहिल्या वाचन कट्ट्याची स्थापना करण्यात आली होती. पहिल्या वाचन कट्ट्यास नागरिकांकडून मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून संस्थेने संभाजी महाराज चौक परिसरात या उपक्रमाचा विस्तार केला आहे.हा सोहळा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी श्री शुभमदादा गायकवाड यांचे विशेष सहकार्य लाभले. संस्थेचे अध्यक्ष शुभम सावरकर यांच्या नेतृत्वात उपाध्यक्ष अतुल बोरकर, सचिव रुपेश नांदुरकर, कोषाध्यक्ष मुकेश बोरकर, सहसचिव मनोज विजयकर, तसेच सदस्य जय सावरकर, कुणाल नांदुरकर, नयन विजयकर, आदित्य सावरकर, सागर बोरकर, विकी गायकवाड आणि स्वयंसेवक समीर सावरकर, आयुष सावरकर व चेतन नांदुरकर यांनी परिश्रम घेतले.

## न.प. जिजामाता प्राथमिक शाळा



**चांदूर रेल्वे-** नगर परिषद जिजामाता प्राथमिक कन्या शाळा चांदूर रेल्वे येथे १५ ऑगस्ट ला स्वातंत्र्य दिनानिमित्त स्वातंत्र्य उत्सव साजरा करण्यात आले.दुर्गा रतनलाल भूत यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण कार्यक्रम झाले. कार्यक्रमाला अनिल प्रतापजी मोटवानी, वंदना अजय हजारे ,ममता राजेश रॉय,अलका प्रवीण मसराम, आरती प्रकाश खरुले , मंगल चव्हाण,सन्मा.अजयभाऊ हजारे आणि मोठ्या संख्येत पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्रीराम भिकुजी जाधव यांनी केले. आभार मुक्ता मुरलीधर लाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी करिता , आरती प्रकाश खरुले ,नीलिमा रुपराव रघुते, श्रीराम भिकुजी जाधव, सारिका सुरेशसिंग ठाकूर मुक्ता मुरलीधर लाड,अनिता वाडेकर, बेबीबाई पेठे यांचे सहकार्य लाभले.

## महाराष्ट्र मुस्लिम गवळी समाज संघटना



**अमरावती** - गेल्या २० वर्षापासून, सामाजिक कार्यकर्ते सलीमभाई मीरावाले फ्रेझरपुरा येथील मुस्लिम गवळी समाज भवन परिसरात देशभक्तीचा संदेश देत आहेत. १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन असो किंवा २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिन, या परिसरात मोठ्या उत्साहात राष्ट्रध्वज फडकवला जातो.

सलीमभाई मिरावालेच्या प्रयत्नांतून साकार झालेले मुस्लिम गवळी समाज भवन आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अन्वर खान अलीम साहिब यांनी भूषवले आणि मुस्लिम गवळी समाजाचे एक प्रतिष्ठित सदस्य इमामभाई नंदगीवाले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांमध्ये करीमभाई लालूवाले, घस्सुभाई उर्फ गनीभाई चौधरी, रमजानभाई कालीवाले, मदन चौधरी, कालूभाई बेनीवाले, चंदू चौधरी, रहीम रायलीवाले, अन्वर चौधरी, जुम्माभाई लालूवाले आणि मन्नाभाई जानीवाले यांचा समावेश होता.

ध्वजारोहणानंतर ध्वजाला सलामी देण्यात आली आणि सर्वांनी राष्ट्रगीत गायले.या कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन सलीमभाई मिरावाले यांनी केले होते. मोठ्या संख्येने शाळकरी मुले उपस्थित होती, प्रत्येकाच्या हातात तिरंगा होता. कार्यक्रमात अयुबभाई चौधरी, बब्बूभाई उर्फ हमजाभाई नंदावाले, मलखान मांजरे, राजू चौधरी, जावेद परसुवाले, वजीर लुचाईवाले, कमरूभाई, अब्दुल लालूवाले, अरबाज लालूवाले, सिद्दीक बेनीवाले, जाफर बेनीवाले, सिकंदरभाई परसुवाले, शेरूभाई परसुवाले यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# ४८ कोटींच्या दंडवसुलीला आता 'जप्ती-लिलाव'चा मार्ग खुला!

## चांडक यांच्या मालमत्ता जप्ती व निलामीसाठी तहसीलदारांचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे

## १५ दिवसांच्या खलबतानंतर उपजिल्हाधिकारी खेमणार यांच्या टेबलवर -निर्णयाला किती वेळ?

**विशेष प्रतिनिधी**
**अकोला** : गाजीपूर येथील गौण खनिजाच्या अतिरिक्त उत्खननप्रकरणी ठोठावण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीचा मुद्दा आता निर्णायक वळणावर आला आहे.




दंडाची रक्कम कायम झाल्यानंतर मालमत्तांवर बोजा चढविण्यापुरती मर्यादित राहिलेली कारवाई आता थेट मालमत्ता जप्ती आणि निलामीच्या टप्प्यावर पोहोचली आहे. अकोट तहसीलदारांनी दंडग्रस्त संतोष चांडक यांच्या मालमत्ता जप्त करून निलामी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे परवानगी मागणारे पत्र २९ जुलै रोजी पाठविले असून, तब्बल पंधरा दिवसांच्या प्रशासकीय खलबतानंतर हा प्रस्ताव आता उपजिल्हाधिकारी (महसूल) श्री. खेमणार यांच्याकडे सादर झाल्याची माहिती आहे.त्यामुळे आता ४८ कोटींच्या वसुलीला प्रत्यक्ष जप्ती-लिलावाचा हातोडा कधी पडणार? याकडे अकोटसह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील गौण खनिजाच्या अतिरिक्त उत्खननप्रकरणी जमीनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्यावर ३० जानेवारी २०२४ रोजी तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. दंडवसुलीसाठी संबंधित मालमत्तांवर बोजा चढविण्यात आला. मात्र, 'बोजा' नोंदविल्यानंतर पुढची प्रत्यक्ष वसुली कधी? हा प्रश्न सातत्याने उपस्थित होत होता.

दरम्यान, दंडग्रस्त चांडक यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. न्यायालयाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २४७ अन्वये अपिलीय प्राधिकरणाकडे दाद मागण्याची संधी दिली होती. निर्धारित मुदतीत अपील दाखल न झाल्यानंतर विलंबाने दाखल झालेल्या अपिलावर सुनावणी झाली. सुमारे साडेतीन महिन्यांच्या सुनावणीनंतर अपील फेटाळण्यात आल्याने तहसीलदारांनी ठोठावलेला दंड कायम राहिला.

यानंतरही वसुलीची प्रक्रिया वेगाने पुढे जात नसल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले होते. 'बोजा चढवून फाईल थंडबस्त्यात?' असा सवालही उपस्थित झाला होता. मात्र आता तहसीलदारांनीच मालमत्ता जप्ती आणि निलामीसाठी परवानगी मागितल्याने प्रकरणाला नवा वेग मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### ■ ४८ कोटींचा प्रश्न; आता निर्णयाच्या 'टायमिंग'कडे लक्ष-

४८ कोटी रुपये ही किरकोळ थकबाकी नसून शासनाच्या महसुलाशी संबंधित मोठी रक्कम आहे. त्यामुळे प्रस्ताव एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहण्यापेक्षा त्यावर निश्चित कालमर्यादेत निर्णय होणे अपेक्षित आहे. तहसीलदारांनी जप्ती-निलामीसाठी परवानगी मागितली आहे, तर आता सक्षम प्राधिकरणाकडून त्यावर काय निर्णय होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.जप्तीची परवानगी मिळणार का? निलामीची प्रक्रिया कधी सुरू होणार? आणि ४८ कोटींचा शासन महसूल प्रत्यक्ष तिजोरीत कधी जमा होणार? या तीन प्रश्नांभोवती आता संपूर्ण प्रकरण फिरत आहे.

### आदिवासी जमिनीवरील उद्योगांबाबतही असाच प्रस्ताव कधी?

गाजीपूर आणि रुधाडी परिसरातील आदिवासी जमिनीवर शासनाच्या आवश्यक परवानग्या न घेता कथितरीत्या उद्योग उभारण्यात आल्याचा मुद्दाही पुन्हा ऐरणीवर आला आहे. सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या या परिसरात आदिवासी बांधवांच्या जमिनीवर स्टोन क्रशर, हॉटमिक्स प्लांट व अन्य उद्योग सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या प्रकरणाची विशेष बाब म्हणजे, आदिवासी जमिनीच्या वापराबाबतचा मुद्दा काही वर्षांपूर्वी विधिमंडळात लक्षवेधीद्वारे चर्चेत आला होता. मात्र त्यानंतर अपेक्षित प्रशासकीय कारवाई झाली का, याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम ३६-अ अंतर्गत आदिवासी जमिनीच्या हस्तांतरणासंदर्भात असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने या संपूर्ण व्यवहाराची चौकशी होणे गरजेचे आहे. केवळ भाडेपट्टा, बॉंड अथवा करारनामा झाला म्हणून आदिवासी जमिनीचा औद्योगिक वापर आपोआप वैध ठरत नाही. त्यासाठी आवश्यक वैधानिक परवानग्या घेतल्या आहेत का, याची महसूल विभागाने पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे जसा ४८ कोटींच्या दंडासाठी जप्ती-निलामीचा प्रस्ताव पुढे आला, तसाच गाजीपूर-रुधाडीतील आदिवासी जमिनीवरील कथित उद्योगांबाबतही तातडीने सर्वेक्षण करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वस्तुनिष्ठ अहवाल व प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### ■ २९ जुलैचे पत्र; १५ दिवसांनी पुढे सरकली फाईल

सक्तीची दंडवसुली करण्यासाठी चांडक यांच्या मालमत्ता जप्त करून त्यांची निलामी करण्याबाबत परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे पत्र अकोट तहसीलदारांनी २९ जुलै रोजी जिल्हा प्रशासनाकडे पाठविले होते. या पत्रावर सुमारे पंधरा दिवस प्रशासकीय पातळीवर चर्चा व प्रक्रिया झाल्यानंतर प्रस्ताव आता उपजिल्हाधिकारी (महसूल) श्री. खेमणार यांच्याकडे आला आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष प्रस्तावावर होणाऱ्या निर्णयाकडे लागले आहे. एवढ्या मोठ्या रकमेचा शासनाचा महसूल थकीत असताना प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी आणखी किती कालावधी जाणार, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे.

### विभागीय आयुक्तांकडे पोहोचले प्रकरण

दरम्यान गाजीपूर येथील गौण खनिजाच्या अतिरिक्त उत्खननप्रकरणी ठोठावण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीचा मुद्दा आता अमरावती विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्यापर्यंत पोहोचला आहे. अकोला जिल्हा प्रशासनाकडून आतापर्यंत झालेल्या दप्तरदिरंगाईबाबत देखील त्यांना अवगत करण्यात आले आहे. विभागीय आयुक्तांनी या प्रकणात आपण स्वतः लक्ष देणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

# बसची धडक लागून एकाचा मृत्यू, दोन जखमी

### दर्यापूर-अमरावती मार्गावर आराळा फाट्याजवळ भीषण अपघात



**खल्लार/प्रतिनिधीः-** नागपंचमीच्या दिवशी दर्यापूर-अमरावती मार्गावरील खल्लार पोलिस स्टेशन हद्दीत आज (दि.१७) सायंकाळी आराळा फाट्याजवळ साडेसहा ते सात वाजताच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात ३० वर्षीय इसमाचा मृत्यू झाला असून दोघे जण गंभीर जखमी झालेत.

माहितीनुसार,खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील आराळा-बोराळा रस्ता क्रॉस करत असताना अमरावती येथून दर्यापूरकडे जाणाऱ्या एसटी बसची दुचाकीला धडक बसली. धडक इतकी जोरदार होती की या अपघातात छोटेलाल सुखलाल डिकारे (वय ३०जि.बैतुल,मध्यप्रदेश), या व्यक्तीचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर प्रेमदास बाजीलाल कासदेकर व हिरालाल बारसकर दोघे गंभीर जखमी झाले. मृतक व जखमी हे आदिवासी मजूर असल्याची माहिती समोर आली आहे. हे मजूर दर्यापूर येथे शेतीकामासाठी आले असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच रुग्णसेवक विकी होले आणि सचिन शेलारे यांनी क्षणाचाही विलंब न करता अवघ्या पाच मिनिटांत सुमारे १२ किलोमीटर अंतर पार करून घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना तातडीने दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यापैकी एका व्यक्तीला मृत घोषित केले.

अपघाताची घटना समोर येताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दर्यापूर-अमरावती मार्गावर दोन्ही बाजूंना वाहनांच्या ☞(पान २ वर)

# रिंग रोडवर स्कार्पिओची ऑटोला धडक; सहा जखमी



### रहाटगाव परिसरात घटना; ऑटोचालकाची प्रकृती गंभीर

**नांदगाव पेठ /प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रिंग रोड, रहाटगाव येथे रविवारी (१६ ऑगस्ट) सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास ऑटो रिक्षाला मागून येणाऱ्या स्कार्पिओ वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोचालकासह पाच प्रवासी जखमी झाले. ऑटोचालकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऑटोचालक सय्यद साजिद सय्यद रऊफ (वय ५०, रा. नांदगाव पेठ) हे प्रवाशांना घेऊन रिंग रोडमार्गे नांदगाव पेठकडे जात होते. दरम्यान, मागून भरधाव वेगाने आलेल्या स्कार्पिओ वाहनाने ऑटोला जोरदार धडक दिली. धडकेमुळे ऑटोचे मोठे नुकसान झाले असून त्यातील चालकासह प्रवासी गंभीर जखमी झाले.

जखमींमध्ये फरजाना बानो (वय ५४, रा. अलीमनगर), नाझिया परवीन (वय ३३, रा. गुलिस्ता नगर), ☞(पान २ वर)

# टाकळी तलावात तिघांचा बुडून मृत्यू

## दोन दिवसांत पाच जणांना जलसमाधी

**-यवतमाळ शहरालगतची धक्कादायक घटना**

**-आपत्ती व्यवस्थापन पथकाने तिन्ही मृतदेह बाहेर काढले**



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** शहरालगत टाकळी येथील तलावात सोमवारी (दि. १७ ऑगस्ट) सायंकाळी तीन मुले बुडाल्याची धक्कादायक घटना घडली. सायंकाळी सुमारे चार वाजता ही माहिती मिळताच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागासह प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. सुमारे तीन तासांच्या शोधमोहिमेनंतर रात्री सात वाजताच्या सुमारास तिन्ही मुलांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले.

मृत मुलांची ओळख बालाजी मंगल कार्यालय परिसर, यवतमाळ येथील रहिवासी पियुष यादव, प्रथमेश यादव आणि प्रसाद सातपुते अशी झाली आहे. तिन्ही मुले तलाव परिसरात फिरण्यासाठी अथवा पोहण्यासाठी गेली असावीत☞(पान २ वर)

### जलाशयांपासून मुलांना दूर ठेवण्याचे आवाहन

पावसाळ्यात तलाव, धरणे व अन्य जलाशयांमध्ये पाण्याची पातळी अचानक वाढते. पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने दुर्घटनांचा धोका वाढतो. त्यामुळे पालकांनी मुलांना अशा ठिकाणी एकटे जाऊ देऊ नये, तसेच नागरिकांनी जलाशयांमध्ये पोहण्याचा किंवा धोकादायक ठिकाणी जाण्याचा मोह टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मुथूट फिनकॉर्प फसवणूक प्रकरणात

# १.३४९ किलो सोने जप्त, तीन आरोपी अटकेत

### -फरार सराफाच्या शोधात पोलिसांची पथके



**अमरावती/प्रतिनिधीः-** विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्पच्या शाखेत उघडकीस आलेल्या गोल्ड लोन गैरव्यवहाराच्या तपासाला आता वेग आला आहे. सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे शहरातील सराफा व्यावसायिकांकडे तारण ठेवण्यात आलेले तब्बल १ किलो ३४९.२ ग्रॅम सोन्याचे दागिने आतापर्यंत हस्तगत केले आहेत. यातील १ किलो २६० ग्रॅम सोने नीलेश चव्हाण याच्याकडून जप्त करण्यात आले असून, त्याची अंदाजे किंमत १ कोटी ८९ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा तपास शालिनी काशीनाथ नागरगोजे यांच्या तक्रारीवरून सुरू झाला. तपासात ग्राहकांनी मुथूट फिनकॉर्पमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याचा परस्पर गैरवापर करून ते अन्य सराफांकडे गहाण ठेवण्यात आल्याचा संशय समोर आला. याप्रकरणी पोलिसांनी शुभम रविंद्र वासेवाय, सुरज अनिल खेरकर आणि धीरज पंचमराव सिरसाट ☞(पान २ वर)

# तीन महिन्यांपासून फरार खुनाच्या प्रयत्नातील आरोपी जेरबंद

### फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई; चाकू, दुचाकी व मोबाईल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** उधारीचे सहा हजार रुपये परत मागितल्याच्या कारणावरून तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला करून गेल्या तीन महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. इझानोद्दीन पठाण हकीमोद्दीन पठाण (वय २२, रा. इंदला, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेला चाकू, दुचाकी व मोबाईल असा एकूण ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील फिर्यादी आदिल खान अखिल खान (वय १९, रा. ताजनगर, बिलाल मशीदजवळ, अमरावती) याने इझानोद्दीन पठाण याला ६ हजार रुपये उधार दिले होते. आठ दिवसांत पैसे परत देण्याचे आश्वासन देऊनही त्याने पैसे परत केले नाहीत. त्यामुळे १३ मे २०२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास आदिलने फोन करून उधारीचे पैसे मागितले. त्यावेळी इझानोद्दीनने त्याला राजुरा नाका येथील सायबर कॅफेजवळ बोलावले. आदिल तेथे पोहोचल्यानंतर त्याने पैसे मागितले असता इझानोद्दीनने पैसे देण्यास नकार दिला. तसेच, 'तू माझे पैसे दिले नाही तर मी तुझी गाडी घेऊन जाईल,' असे म्हणत तो तेथून निघून गेला. त्यानंतर आदिल तपोवन गेट येथील सोनू ज्यूसच्या हातगाडीसमोर थांबला असताना इझानोद्दीनचा त्याला फोन आला. त्याने आदिलला तेथेच थांबण्यास सांगितले. काही वेळाने रात्री सव्वानऊच्या सुमारास इझानोद्दीन हा सात ते आठ साथीदारांसह तेथे आला. या सर्वांनी आदिलला घेरले. 'तूने गाडी उठाने की बात कैसे की?' असे म्हणत इझानोद्दीनने चाकू काढून आदिलच्या पोटात, मांडीवर आणि कमरेवर वार केले. त्याच्यासोबत असलेल्या साथीदारांनी आदिलला काठ्या व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. गंभीर जखमी झालेल्या आदिलच्या शरीरातून ☞(पान २ वर)

# २०० सीसीटीव्हींच्या तपासातून नागपुरी गेट घरफोडीचा छडा

### विधीसंघर्षित बालक ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरफोडी करून लाखो रुपयांचे सोने आणि रोकड लंपास करणाऱ्या विधीसंघर्षित बालकाला गुन्हे शाखा युनिट-२ने ताब्यात घेतले. नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या या घरफोडीचा तपास करताना पोलिसांनी शहरातील तब्बल २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यानंतर तांत्रिक विश्लेषण आणि मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले.

नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत ९ ऑगस्ट रोजी घरफोडी झाली होती. चोरट्याने घरातील सुमारे ४९८ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि दोन लाख रुपये रोख असा मुद्देमाल लंपास केला होता. घटनेची गंभीर दखल घेत पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे शाखेला तपासाचे निर्देश दिले.

गुन्हे शाखा युनिट-२चे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली. त्याचबरोबर यवतमाळ, नांदेड, चंद्रपूर, अकोला, बुलडाणा तसेच हैदराबादपर्यंत तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली. तांत्रिक माहिती आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे या घरफोडीत अकोला येथील एका विधीसंघर्षित बालकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. चोरीचा मुद्देमाल घेऊन संबंधित बालक सोमवारी वेलकम पॉइंट परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने परिसरात सापळा रचला. बालक तेथे येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. ☞(पान २ वर)

# जेवण मिळण्यास उशीर झाल्याने हॉटेलमध्ये वाद

### ग्राहक जखमी, बनारसी भोजनालयातील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सिटी कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील सरोज चौक येथील बनारसी भोजनालयात जेवण मिळण्यास उशीर झाल्याने वाद झाला. वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. या घटनेत एका ग्राहकाच्या डोक्याला मार लागल्याने त्याला जिल्हा रुग्णालयात☞(पान २ वर)

# गवळीपुरात अवैध दारू विक्रीवर फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी फ्रेजरपुरा पोलिसांनी गवळीपुरा परिसरात कारवाई करत तीन अवैध दारू विक्रेत्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत देशी, विदेशी तसेच गावठी दारूसह एकूण १५ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई रविवारी (१६ ऑगस्ट) करण्यात आली.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील अवैध व्यवसाय, गावठी दारूची निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार फ्रेजरपुरा पोलिसांनी गवळीपुरा परिसरात अवैध दारू विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविली. या कारवाईत रीजवाना भोजा चौधरी (वय ४५, रा. गवळीपुरा) हिच्याकडून एम.डी. कंपनीच्या १४ दारूच्या बाटल्या, आय.बी. कंपनीच्या १३ बाटल्या तसेच संत्रा बॉबी देशी दारूच्या ४८ बाटल्या, असा एकूण ११ हजार ५५० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत बानो गंगू रायलीवाले (वय ६०, रा. गवळीपुरा) हिच्याकडून प्लास्टिकच्या डब्यांमध्ये साठवून ठेवलेली २६ लिटर गावठी दारू, किंमत २ हजार ६०० रुपये, जप्त करण्यात आली. तर तिसऱ्या कारवाईत अस्लम खननु रायलीवाले (वय ३४, रा. गवळीपुरा) याच्याकडून बॉबी संत्रा देशी दारूच्या १८० मिलीच्या २० बाटल्या, किंमत १ हजार ८०० रुपये, जप्त करण्यात ☞(पान २ वर)